ISSN-0971-8397

विकास समर्पित मासिक

# योजना


वर्ष ४३ अंक ८ पाने ५६ जून २०१६ मूल्य २२ रु.

## "भारताची आश्वासक वाटचाल"

''ई-गव्हर्नन्स : लोकाभिमूख गतिमान शासन''
डॉ. रणजीत मेहता

''कौशल्य विकास आणि खाजगी क्षेत्र''
प्रमोद भसिन

फोकस
''कृषी आणि कृषीकल्याणाची सद्यस्थिती''
जे.पी.मिश्रा



### योग विशेष

''योग आणि निरोगी, तणावविरहीत आयुष्य''
डॉ. ईश्वर एन. आचार्य /राजीव रस्तोगी

''योगाचे आरोग्य फायदे आणि आंतरराष्ट्रीय महत्त्व''
डॉ. ईश्वर. व्ही. बसवरेड्डी

विशेष लेख
''योग प्रशिक्षकांचे मूल्यमापन आणि प्रमाणीकरण''
डॉ. रवी पी. सिंह, डॉ. मनीष पांडे

मराठी मासिक

# योजना

## योजना घरी आणा.
## आजच वर्गणी भरा.




विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न आणि चालू घडामोडी प्रसिध्द करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी लिहिलेले अभ्यासपूर्ण व अचूक माहिती देणारे लेख असतात. त्यामुळे आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील बिनचुक माहिती मिळते.

हे मासिक विद्यार्थीवर्ग व विद्वत्‌जनांचे आवडते आहे .स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्यांनी योजना वाचणे आवश्यक आहे. यातील माहिती साधारणत: इतरत्र प्रकाशित होण्याआधीच आपल्यापर्यंत येते.

### वर्गणीचे दर

| | |
|---|---|
| नियमित अंक मूल्य | २२.०० रुपये |
| विशेषांक | ३०.०० रुपये |
| वार्षिक वर्गणी | २३०.०० रुपये |
| द्विवार्षिक वर्गणी | ४३०.०० रुपये |
| त्रिवार्षिक वर्गणी | ६१०.०० रुपये |

वर्गणी, मनीऑर्डर
किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे संपादक,योजना (मराठी)यांचे नावाने
७०१, ''बी'' विंग (७ वा मजला) केंद्रीय सदन,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
या पत्त्यावर पाठवावी. किंवा www.bharatkosh.gov.in/product
येथे ऑनलाईन भरावी.

**वर्गणी मनीऑर्डरने पाठविताना आपले नाव, पत्ता व संपर्क क्रमांक कूपनमध्ये सुवाच्य अक्षरात लिहा.**

विक्रीचे ठिकाण : ७०१ सी, ७०१बी, केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

योजना मासिक भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिध्द केले जाते.

# योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४३ ❖ ❖ अंक ८ ❖ ❖ जून २०१६ ❖ ❖ मूल्य २२ रु. ❖





मुख्य संपादक
**दिपीका कच्छल**

संपादक
**उमेश उजगरे**

उप संपादक
**अभिषेक कुमार**

मुखपृष्ठ
**जी.पी. धोपे**



## अनुक्रमणिका



| | | |
|---|---|---|
| ■ सबलीकरणातून भारताचा विकास | चरण सिंग | ५ |
| ■ ई-गव्हर्नन्स: लोकाभिमूख गतिमान शासन | डॉ रणजीत मेहता | १३ |
| ■ कौशल्य विकास आणि खाजगी क्षेत्र | प्रमोद भसिन | १७ |
| ■ राजनैतिक सुज्ञपणा आणि सर्वंकश विकास | अचल मल्होत्रा | २१ |
| ■ कृषी आणि कृषीकल्याणाची सद्यस्थिती | जे.पी.मिश्रा | २७ |
| ■ योग आणि निरोगी, तणावविरहीत आयुष्य | डॉ. ईश्वर एन. आचार्य /राजीव रस्तोगी | ३१ |
| ■ योगाचे आरोग्य फायदे आणि आंतरराष्ट्रीय महत्त्व | डॉ. ईश्वर. व्ही. बसवरेड्डी | ३४ |
| ■ योग प्रशिक्षकांचे मूल्यमापन आणि प्रमाणीकरण | डॉ. रवी पी. सिंह, डॉ. मनीष पांडे | ३७ |
| ■ भारताच्या आश्वासक वाटचालीचे विविध पैलू | डॉ. शिवाजी भ. यादव | ४१ |
| ■ उद्योगाची गरूडझेप | रमेश झवर | ४५ |
| ■ समकालीन भारताच्या संदर्भातील दर्जेदार शिक्षण | दिशा नावानी | ४९ |



**'योजना' हे निती आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. 'योजना'त प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मते त्या त्या लेखकांची असतात.**



**जाहिरात दर पत्रक**

| | |
|---|---|
| ब्लॅक ॲड व्हाईट पूर्ण पान: | रु. १०,००० |
| ब्लॅक ॲड व्हाईट अर्धे पान: | रु. ६,००० |
| बॅक कव्हर पूर्ण पान: | रु. २०,००० |
| सेकंड कव्हर पूर्ण पान: | रु. १७,००० |
| थर्ड कव्हर पूर्ण पान: | रु. १५,००० |





योजना मासिकासाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, 'बी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी - योजना -२७५६६५८२
email - myojanadpd@gmail.com

ISSN-0971-8397
विकास समर्पित मासिक
योजना

# संपादकीय

## प्रगतीपथावर अग्रेसर...

एकमेकांशी निगडीत असलेले निरनिराळे घटक देशाच्या विकासप्रक्रियेला प्रभावित करीत असतात. आर्थिक, सामाजिक, मनुष्यबळ, पर्यावरण असे ते अनेक घटक आहेत. यातील प्रत्येक घटक हा महत्वाचा आहे. स्थानिक परिस्थितीनुसार या घटकांचे संम्मिलन झालेले असते आणि त्यानुसार राष्ट्रांना विकासाच्या बाबतीत वेगवेगळ्या आव्हानांना सामोरे जावे लागते. अर्थात, आर्थिक आणि सामाजिक विकास एकमेकासोबतच व्हायला हवा. कृषी, उद्योग, व्यापार,वाहतूक, जलसिंचन आणि ऊर्जा आदि क्षेत्रातील सुधारणेची प्रक्रिया आर्थिक बदल दर्शविते तर आरोग्य, शिक्षण, गृहनिर्माण आणि पेयजल आदि क्षेत्रातील सुधारणा सामाजिक प्रगतीचे निदर्शक मानले जातात. आर्थिक आणि सामाजिक प्रगती प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे लोकांच्या आर्थिक स्थितीशी निगडीत असते.

आर्थिक विकासाचा पाया विस्तारण्याची आणि विकास प्रक्रियेचे लाभ जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचवून ती अधिक समावेशी बनविण्याची गरज नेहमीच व्यक्त केली जाते. सर्वसमावेशक विकास म्हणजे असा आर्थिक विकास जो लोकांच्या मुलभूत गरजा पूर्ण करतो आणि त्याचबरोबर विविध संधीही निर्माण करतो. त्यात सर्वांना समान संधी उपलब्ध करून देणे आणि शिक्षण आणि कौशल्य विकासाच्या माध्यमातून लोकांचे सक्षमीकरण करणे याचा समावेश होतो.

अर्थात, भारतासारख्या विशाल लोकसंख्येच्या देशात सर्वात मोठे आव्हान आहे ते समाजाच्या सर्व थरांपर्यंत आणि देशाच्या सर्व भागांमध्ये समान पातळीवर विकास पोहोचविण्याचे. आणि इथेच सरकारची भूमिका सुरु होते. त्यामुळे विकासाचा प्रश्न सोडविण्यासाठी या सर्व निकषांवर सरकारी धोरणे आणि कार्यक्रम यांची आखणी व्हायला हवी. केवळ सकल देशांतर्गत उत्पादन आणि दरडोई उत्पन्न हे देशातील जनतेचा विकास सुनिश्चित करण्यासाठी पुरेसे नाहीत हे नियोजनकर्ते आणि धोरणाकर्त्यांनी ध्यानात घेणे गरजेचे आहे. कुशल मनुष्यबळ हा घटक कोणत्याही समाजाच्या विकासासाठी अग्रदूत असतो.

सर्वांसाठी उदरनिर्वाहाच्या संधी सुनिश्चित करणे जितके गरजेचे आहे तितकीच गरज गरीब अथवा दुर्गम भागातील बालकांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याची आहे. पर्यावरण विषयक बाबींचा समावेश विकासाच्या निकषांमध्ये करण्यात आल्यामुळे त्याकडेही लक्ष देणे गरजेचे आहे. दुष्काळ आणि पूर देशाची अर्थव्यवस्था तसेच शेतकऱ्यांचे नुकसान करणारे घटक आहेत. त्यांचा सामना सरकारने अग्रक्रमाने करायला हवा.

शेवटच्या थरातील सामान्य माणसांना समोर ठेऊन सरकारने अलिकडेच काही चांगल्या योजना आणि धोरणे आखली आहेत. कृषी आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी अर्थसंकल्पात मोठी तरतूद करण्यात आली आहे. त्या जोडीलाच प्रधानमंत्री जनधन योजना, मुद्रा बँक, सेतू, बेटी बचावो, बेटी पढावो यांसारख्या कल्याणकारी योजना सुरु करण्यात आल्या आहेत. या योजना समाजातील दुर्लक्षित घटकांना मुख्य प्रवाहात सामील करून जलद गतीने होत असलेल्या विकासाचे लाभ त्यांना देण्याच्या सरकारच्या प्रयत्नांचा भाग आहेत. सामान्य नागरिकांना शाश्वत सुरक्षा कवच प्रदान करण्यासाठी प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री जीवन सुरक्षा योजना आणि अटल पेन्शन यासारख्या योजना सुरु करण्यात आल्या आहेत.

गृहनिर्माण, रस्तेबांधाणी, लोहमार्ग आणि पायाभूत क्षेत्रातील इतर सुविधांकडे सरकारने विशेष लक्ष दिले आहे. थेट लाभ हस्तांतरणासारख्या योजनाद्वारे 'ई गवर्नन्स' चे लाभ जनतेपर्यंत पोहचवले जात आहेत. रोजगार निर्मिती वाढविणे तसेच रोजगारक्षम मनुष्यबळ तयार करण्यासाठी आणि 'सबका विकास' हे ध्येय साध्य करण्यासाठी विविध योजना राबविल्या जात आहेत. भारताच्या प्रयत्नांमुळे २१ जून रोजी जगभरात आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा केला जात आहे. सरकार विविध उपक्रम राबवून जनतेचे आरोग्या सुधारण्याचे प्रयत्न करीत आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीच्या सहा दशकानंतर एक स्वावलंबी आणि सामर्थशाली राष्ट्र म्हणून भारताची ओळख निर्माण होऊ लागली आहे. देश प्रगतीपथावर अग्रेसर झाला आहे.

■■■

# सबलीकरणातून भारताचा विकास

चरण सिंग



***धोरण बदलांचे परिणामस्वरूप नवीन सहस्त्रकाच्या आगमन काळात जागतिक स्तरावर भारताला 'नव्याने उदयास येणारी एक महत्वाची अर्थव्यवस्था' अशी ओळख प्राप्त झाली. त्यानंतर केवळ 15 वर्षांच्या काळात भारत देश 'सर्वाधिक वेगाने विस्तारत जाणारी अर्थव्यवस्था' बनला आहे. ही ओळख मिळवताना आपल्या देशाने मोठ्या प्रमाणात गरिबी निर्मूलन करण्यात यश मिळवण्याबरोबरच येत्या पाच वर्षांत 7.3 टक्के एवढा विकासदर गाठण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे.***

देशाला आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी व ९ टक्क्यांचा आर्थिक विकासदर गाठण्याच्या संकल्प पूर्ततेसाठी मे २०१४ पासून भारत सरकार नव्या जोमाने कार्यसिध्दीस लागले आहे. या कार्याचा एक महत्वाचा भाग म्हणून सत्तेवर आल्यापासूनच केंद्र सरकारने एकामागोमाग देशाच्या अर्थव्यवस्थेतील महत्वाच्या सर्व क्षेत्रांना बळकटी देणाऱ्या त्याबरोबरच सर्वसामान्य लोकांसाठी उपयुक्त अशा विविध विकास योजनां मांडल्या व देशाच्या सर्व स्तरांवर या योजनांची त्वरित अंमलबजावणी करण्यास सुरूवात केली. या सर्व योजनांचे मुख्य उद्दिष्ट सक्षमीकरणातून देशाच्या विविध क्षेत्रांचा आर्थिक विकास साधणे व त्यानुषंगाने देशाच्या अर्थव्यवस्थेला उच्च विकास दर गाठण्यास अनुकूल परिस्थिती तयार करणे हे होय.

भारतावर जवळजवळ आठ शतके परकियांनी राज्य केले. या सर्व काळात देशातील साधनसंपत्ती परिकियांनी लुटून नेली पण त्याबरोबरच देशाची अर्थव्यवस्था पार कोलमडून गेली. स्वतंत्र राष्ट्र म्हणून उदयाला आल्यावर आपल्या देशासमोर अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करण्याबरोबरच तिला बळकटी मिळवून देण्याचे प्रचंड मोठे आव्हान होते. स्वातंत्रोत्तर काळात देशाने मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली. त्यावेळी सुरूवातीला देशात होणारे सर्व आर्थिक बदल समाजवादाचा प्रबळ प्रभावाखाली होत. १९५१ मध्ये, भारताच्या एकूण २०० दशलक्ष लोकसंख्येपैकी ५३ टक्के लोक दारिद्र्य रेषेखाली होते व त्यावेळी भारत हा अतिशय कमी उत्पन्न असलेला देश होता. नंतरच्या काळात जे महत्वाचे धोरणात्मक निर्णय घेतले गेले, त्यामध्ये काही देशाच्या आर्थिक आणीबाणीच्या परिस्थितीला बदलण्यासाठी करण्यात आलेले तातडीचे उपाय होते. यामध्ये, जागतिकीकरणाच्या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी घेतलेले क्रांतीकारक निर्णय जसे मुक्त बाजारव्यवस्थेचा अंगिकार, खाजगी क्षेत्राला बरोबरीने वाढण्याची संधी इ. चा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. या सर्व धोरण बदलांचे परिणामस्वरूप नवीन सहस्त्रकाच्या आगमन काळात जागतिक स्तरावर भारताला 'नव्याने उदयास येणारी एक महत्वाची अर्थव्यवस्था' अशी ओळख प्राप्त झाली. त्यानंतर केवळ १५ वर्षांच्या काळात भारत देश 'सर्वाधिक वेगाने विस्तारत जाणारी अर्थव्यवस्था' बनला आहे. ही ओळख मिळवताना आपल्या देशाने मोठ्या प्रमाणात गरिबी निर्मूलन करण्यात यश मिळवण्याबरोबरच येत्या पाच वर्षांत ७.३ टक्के एवढा विकासदर गाठण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे.

अर्थव्यवस्थेला शून्यातून घडवण्याच्या या प्रवासात सुरूवातीला पूर्णत: शेतीप्रधान असलेली आपल्या देशाची अर्थव्यवस्था आज मोठ्या प्रमाणात सेवा क्षेत्राने व्यापली आहे. आज शेतीक्षेत्राचे योगदान आकुंचित होत असतांना सेवाक्षेत्र झपाट्याने विस्तारत आहे. तर उद्योगक्षेत्राची वाढ २५ टक्कयांवरच स्थिर राहिली आहे.

आर्थिक वाढीत सातत्य राखण्यासाठी उद्योगक्षेत्राची भरभराट व निरंतर विकास होणे आवश्यक होते. उद्योगक्षेत्रात उत्पादन, व्यापार, गूंतवणूक इ. ना गती देण्यासाठी विशिष्ट ध्येयनिश्चिती बरोबरच भक्कम सरकारी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची आवश्यकता निर्माण झाली होती. यासाठी मे २०१४ मध्ये सत्तेची सूत्र स्वाकारल्यानंतर प्रथमत: पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी 'मेक इन इंडिया' ही महत्वाकांक्षी योजना मांडली.

देशाच्या आर्थिक वाढीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी व देशातील उद्योगक्षेत्राचा पाया मजबूत करण्यासाठी वित्तीय भांडवलाची उपलब्धता ही इतर अनेक गरजांपैकी एक प्रमुख गरज आहे. सर्वसमावेशक विकासाचे उच्च ध्येय गाठण्याच्या सुरूवातीच्या टप्यात देशातील बँकींग क्षेत्राचे योगदान अतिशय महत्वाचे ठरते. याकरिता परस्परसंबंधित अशा वित्तीय पतसंस्थांचे दाट जाळे निर्माण करण्याबरोबरच देशाच्या सर्व स्तरात बँकींग क्षेत्राचे अस्तित्व व विस्तार सुनिश्चित करण्याचे प्रयत्न करण्यात आले. देशातील नागरिकांना त्यांच्या विविध गरजांच्या पूर्ततेसाठी सहज वित्त पुरवठा उपलब्ध व्हावा, असा या धोरणामागचा हेतू होता. विविध व्यापार उद्योग व व्यवसाय करण्यासाठी भांडवली गरजांच्या सहज पूर्ततेबरोबरच व्यवसायांची निरंतर वाढ होईल, असे अनूकुल वातावरण कायम ठेवणारी यंत्रणा विकसित करणे आवश्यक होते.

देशाच्या आर्थिक समावेशनात सहभागी होण्यासाठी देशातील प्रत्येक नागरिकाचे स्वतंत्र बँक खाते असणे ही प्राथमिक गरज असल्याचे ओळखून सरकारने 'पंतप्रधान जनधन योजना' सुरू केली. या योजनेची निश्चित उद्दिष्टपूर्ती होत असतांना विकासाच्या मुख्य ध्येयाला पूरक ठरतील या अनुषंगाने पाठोपाठ क्रमाने मुद्रा बँक, स्टार्ट अप आणि स्टँड अप इंडिया, अटल इनोव्हेशन मिशन या काही प्रमुख योजनांचा ही आरंभ शासनाने केला.

***भारतात स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या नियोजनाच्या सुरूवातीच्या वर्षांत सरकारने प्रामुख्याने कार्यक्षम लोकांना सार्वजनिक क्षेत्रात समाविष्ट करण्यावर भर दिला. नंतरच्या काळात खाजगी क्षेत्राने आपली पकड मजबूत करत मोठ्या प्रमाणात कार्यकुशल तरूणांना रोजगार व काम दिले. २०१२ पर्यंत देशातील ९० टक्क्यावाहून अधिक लोकसंख्या अनौपचारिक क्षेत्रात कार्यरत होती. भविष्याचा विचार करता दरसाल किमान ११ दशलक्ष नोकरीच्या संधी निर्माण करण्याची गरज आहे.***

या घडीला भारत जरी तरूण लोकसंख्या असणारा देश व झपाट्याने वाढणारी अर्थव्यवस्था असला तरिही देशातील तरूण आजही रोजगार व विकासाच्या संधींकडे डोळे लावून बसले आहेत. जनगणना अहवालातील प्राथमिक सांख्यिकीनुसार भारतात येत्या दशकभरात शेतीव्यतिरिक्त क्षेत्रांत सुमारे ११ कोटी नोकरी व रोजगाराच्या संधीं निर्माण करण्याची आवश्यकता आहे. कारण तोपर्यंत देशातील दोन तृतीयांश लोकसंख्येने स्वतंत्र रोजगार किंवा नोकरी करण्याचे वय गाठलेले असेल. वर्ष २०२२ पर्यंत भारतातील कार्यक्षम मनुष्यबळ १ अब्ज होईल असा अंदाज आहे. देशातील कार्यक्षम तरूणांना योग्य वेळी त्यांच्या अपेक्षांनुसार व त्यांच्या क्षमतांना पूरक अशा लाभदायक रोजगार व विकास संधी उपलब्ध करून देऊन सामाजिक विकास व सामाजिक सुरक्षितता अबाधित राखणे, हे शासनाचे प्रमुख कर्तव्य आहे. तरूणामधील वाढती बेरोजगारी, गरिबी यातून समाजविघातक कृत्य करण्यास निर्ढावलेले तरूण घडतात व त्याचा थेट धोका हा सामाजिक सलोख्याला व देशाच्या सुरक्षिततेला असतो. देशाची भावी तरूण पिढी ही विकासाकार्यात प्रमुख योगदान देऊ शकेल, यादृष्टीने त्यांना प्रोत्साहित करणाऱ्या विविध घटकांचा विकास करण्याची आज आवश्यकता आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या नियोजनाच्या सुरूवातीच्या वर्षांत सरकारने प्रामुख्याने कार्यक्षम लोकांना सार्वजनिक क्षेत्रात समाविष्ट करण्यावर भर दिला. नंतरच्या काळात खाजगी क्षेत्राने आपली पकड मजबूत करत मोठ्या प्रमाणात कार्यकुशल तरूणांना रोजगार व काम दिले. २०१२ पर्यंत देशातील ९० टक्क्यांवाहून अधिक लोकसंख्या अनौपचारिक क्षेत्रात कार्यरत होती. भविष्याचा विचार करता दरसाल किमान ११ दशलक्ष नोकरीच्या संधी निर्माण करण्याची गरज आहे. यासाठी नोकरीच्या संधी तयार करू शकणाऱ्या कल्पक उद्योजकांना घडवण्याची आवश्यकता आहे.

**बँकांची भूमिका:**

देशाच्या सर्वांगिण विकासात संघटित आर्थिक संरचना विशेषत: कार्यक्षम बँकींग क्षेत्र व तत्सम पतपुरवठा संस्थांना विशेष महत्व असते. सर्वसामान्य नागरिक आपल्या आर्थिक ठेवी बँक खात्यात जमा करतात व बँका त्या ठेवी कर्ज स्वरुपात बाजारपेठेत गुंतवतात व त्यातून उत्पन्न निर्माण करतात. देशाच्या अर्थव्यवस्थेत बँकांना विशेष महत्व असते. आजच्या आधुनिक काळात सर्वच लहान मोठे व गुंतागुंतीचे आर्थिक व्यवहार हे मोठ्या प्रमाणावर बँकांवर अवलंबून असतात. संपत्तीचे हस्तांतरण करून बाजारपेठेत पैसा फिरता ठेवण्यात बँकांची प्रमुख भूमिका आहे. देशात सर्व स्तरांतील लोकांना वित्तीय सेवा, कर्ज पुरवठा करण्याचे मुख्य काम बँका करतात त्यामुळे एकाप्रकारे देशातील गरिबी निर्मूलनातही बँका सहाय्यक ठरतात.

अकार्यक्षम अर्थव्यवस्था गरिब व श्रीमंत यांच्यातील आर्थिक दरी वाढवण्यास कारणीभूत ठरते. अशा अर्थव्यवस्थेत भांडवलरूपी पैसा हा श्रीमंत उद्योगपतींकडे केंद्रित राहतो. अशा अर्थव्यवस्थेत उद्योग व व्यवसाय करू इच्छिणाऱ्या व भांडवलाची गरज पूर्ण करू न शकणाऱ्या ग्रामीण भागातील नवोदित व गरजू उद्योजकांपर्यंत पैसा पोहचत नाही. बँकांच्या साधनसंपत्तीचा ताबा देशातील काही मोठ्या उद्योगसमूहांच्या हातात एकवटेल ही शंका दूर सारण्याच्या दृष्टीने देशातील महत्वाच्या बँकांचे राष्ट्रीयीकरण करणे हा एक महत्वाचा निर्णय होता. यात सर्वप्रथम रिझर्व्ह बँकेचे १९४८ मध्ये राष्ट्रीयीकरण झाले. त्यानंतर १९४९ साली बँक-व्यवसायाचे नियमन करणारा "बँकिंग रेग्युलेशन अक्ट" अर्थात बँकिंग विनियमन अधिनियम कायदा संमत करण्यात आला. बँकांमार्फत देशभरात विशेषत: देशाच्या ग्रामीण भागात बँकांमार्फत वित्तपुरवठ्याची उपलब्धता अधिक व्यापक करण्याच्या उद्दीष्टाने जुलै १९५५ मध्ये भारतीय स्टेट बँकेचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. नंतर १९६९ मध्ये १४ व्यावसायिक व १९८० मध्ये आणखी सहा बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. या धोरणामागे देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी देणे व बँकांच्या आर्थिक व्यवहारांत सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा उद्देश मांडण्यात आला होता.

***आजच्या आधुनिक काळात सर्वच लहान मोठे व गुंतागुंतीचे आर्थिक व्यवहार हे मोठ्या प्रमाणावर बँकांवर अवलंबून असतात. संपत्तीचे हस्तांतरण करून बाजारपेठेत पैसा फिरता ठेवण्यात बँकांची प्रमुख भूमिका आहे. देशात सर्व स्तरांतील लोकांना वित्तीय सेवा, कर्ज पुरवठा करण्याचे मुख्य काम बँका करतात त्यामुळे एकाप्रकारे देशातील गरिबी निर्मूलनातही बँका सहाय्यक ठरतात.***

देशातील बँकांचे राष्ट्रीयीकरण व त्यानुषंगाने बँकींग क्षेत्रात करण्यात आलेल्या पायाभूत परिवर्तनामुळे नंतरच्या टप्प्यात बँकांच्या व्यवहारात लक्षणीय प्रगती झाली. याकाळात शेती, लघुद्योग, व व्यापारांना लागणारा आवश्यक तितका वित्तपुरवठा करण्यात बँकींग क्षेत्राचा वाटा सर्वाधिक होता.

भारतातील ग्रामीण भागातल्या लोकांपर्यंत बँकीग सेवा पुरवण्यात भारतीय रिजर्व बँक व राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक अर्थात (NABARD) ने महत्वाची भूमिका बजावतांना आर्थिक समावेशन या संकल्पनेचा पाया रचला.

देशभर बँक शाखा सुरू करून बँकींगसेवा उपलब्ध करूनही भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशात फारच कमी लोक या सुविधेचा लाभ घेतात. २०११ या वर्षातील जनगणना अहवालानुसार, भारताच्या एकूण २४.७ कोटी कुटुंबांपैकी केवळ ५८.७ टक्के किंवा १४.५ कोटी कुटुंबिय बँकींग सुविधांचा लाभ घेतात. ग्रामीण भागातील एकूण १६.८ कोटी घरांपैकी केवळ ९.१ कोटी म्हणजे अवघे ५४.५ टक्के कुटुंबियांतील लोकांचीच बँक खाती आहे. तर दुर्गम भागातील लोकांना बँक सेवांबाबत फारच तुटपुंजी माहिती असते. शिक्षणाच्या अभावामुळे बँक आपल्यासाठी नाहीच तर शहरी भागातील लोकांसाठीच असते, असाही काहीसा गैरसमज त्यांच्यात असतो. हे चित्र सुधारण्यासाठी म्हणजेच बँकांमार्फत आर्थिक व्यवहार करण्याचे महत्व पटवून देण्यासाठी व्यापक जनजागृतीची आवश्यकता होती. तसेच देशाच्या आर्थिक सर्वसमावेशनात सहभागी होण्यासाठी बँक खाते ही प्राथमिक गरज आहे, हे जाणून ऑगस्ट २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्री जनधन योजनेची घोषणा केली. आर्थिक सेवांचे फायदे बँकांमार्फत समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत योग्य प्रकारे पोचवणे हे या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट होते. या योजनेला प्रचंड प्रतिसाद मिळाला. ३१ मार्च २०१४ मध्ये देशातल्या सर्व व्यावसायिक बँकांत एकूण १२२ कोटी बँक खाती होते. जनधन योजनेची व्याप्ती इतकी झपाट्याने वाढली की २७ एप्रिल २०१६ पर्यंत या योजनेअंतर्गत सुमारे २१. ७ कोटी लोकांची बँकेत खाती

उघडण्यात आली. याशिवाय विशेष उल्लखनीय बाब म्हणजे या योजनेअंतर्गत सुमारे १७. ९ कोटी खातेधारकांना रूपे डेबिट कार्ड सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, ९.७ कोटी खातेधारकांना आधारक्रमांकाने जोडण्यात आले आहे.

जनधन योजनेअंतर्गत सार्वजनिक क्षेत्रांतील बँकांनी ग्रामीण भागात सुमारे २०.९ कोटी लोकांना बँक खाते उघडून दिले आहे. यापैकी सर्वाधिक म्हणजे ३.३ कोटी बँक खाती ही उत्तर प्रदेश राज्यांत त्यानंतर बिहार व पश्चिम बंगाल या राज्यात सुमारे २ कोटी लोकांनी जनधन अंतर्गत बँक खाती सुरू केली आहेत. विशेष म्हणजे आज जनधनयोजनेमुळे देशातील ९५ टक्के कुटुंबिय बँकांशी जोडले गेले आहे.

वित्तीय सर्वसमावेशन साधण्यात प्रधानमंत्री जनधन योजनेतून उघडण्यात आलेले बँक खाते क्रमांक, आधार क्रमांक व मोबाईल क्रमांक (JAM number trinity, i.e. Jan Dhan Yojana-Adhaar-Mobile Number) या तीन सेवांना एकत्र जोडून विविध सरकारी योजनांचा लाभ, सर्व नागरिकांना विशेषत: गरिब जनतेला विनासायास मिळावा, तसेच बँक, आधार व मोबाईल क्रमांक यातील तंत्रज्ञानामुळे व सेवा प्रकियांच्या प्रमाणीकरणामुळे सर्वसामान्यांना बँकींग सेवा थेट मोबाईलच्या माध्यमातून घरबसल्या मिळवू शकता येतील, अशी तरतूदही पंतप्रधानांनी सुचवली आहे.

**मुद्रा बँक व सामाजिक सुरक्षा योजना:**

देशातील लघु उद्योगांना सहज कर्ज पुरवठा व्हावा, या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८ एप्रिल २०१५ रोजी २०,००० करोड रुपये भांडवल असलेली 'मायक्रो युनिट्स डेव्हलपमेंट अँड रिफायनान्स एजन्सी' अर्थात मुद्रा बँक योजनेचा शुभारंभ केला. आजवर देशात सुमारे ६ कोटी लघुउद्योग हे वैयक्तिक उपक्रम असून त्यामध्ये काही किरकोळ उत्पादन, व्यापार व लहान प्रमाणात सेवा पुरवणारे व्यवसाय इ. चा समावेश होतो. तर देशातील एकूण लघु व सूक्ष्म उद्योगांपैकी केवळ ४ टक्के उद्योगांना संस्थात्मक वित्तपुरवठ्याचा लाभ मिळाला होता. देशातील सर्व लघु व सूक्ष्म उद्योगांना नवचेतना देण्यासाठी मुद्रा बँक योजना आखण्यात आली आहे. देशातील १० लाखांपर्यंत भांडवली गरज असलेल्या सूक्ष्म व लघुत्तम उद्योगांसाठी ही योजना एक नियंत्रक व केंद्रिय स्तरावरील पुनर्वित्त पुरवठा करणारी मुख्य यंत्रणा अशी दुहेरी भूमिका बजावण्याबरोबरच लहान उद्योगांना आर्थिक विकास साधण्यात सहाय्यभूत ठरेल. याशिवाय मुद्रा बँक योजनेतून लघु व सूक्ष्म उद्योगांना धोरणात्मक मार्गदर्शन व या उद्योगांशी संबंधित सर्व लोकांचे म्हणजेच, ग्राहक, गुंतवणूकदार व कच्च्या मालाचा पुरवठा करणारे लोक इ. च्या संरक्षणाची तत्त्वे निश्चित करण्याचे व त्यांची अंमलबजावणी करण्याचे कामही सुरळीतरित्या मार्गी लागेल. यातून लघु उद्योगक्षेत्रांना टिकून राहण्याची धडपड करतांना बाजारभावापेक्षा अधिक दराने पैसे भरण्याच्या नामुष्कीला सामोरे जावे लागणार नाही, अशा ठळक उद्दिष्टांचा या योजनेत अंतर्भाव आहे.

***देशातील सर्व लघु व सूक्ष्म उद्योगांना नवचेतना देण्यासाठी मुद्रा बँक योजना आखण्यात आली आहे. देशातील १० लाखांपर्यंत भांडवली गरज असलेल्या सूक्ष्म व लघुत्तम उद्योगांसाठी ही योजना एक नियंत्रक व केंद्रिय स्तरावरील पुनर्वित्त पुरवठा करणारी मुख्य यंत्रणा अशी दुहेरी भूमिका बजावण्याबरोबरच लहान उद्योगांना आर्थिक विकास साधण्यात सहाय्यभूत ठरेल.***

मे २०१५ मध्ये केंद्र सरकारने सामाजिक सुरक्षा योजनांची व्याप्ती वाढवत सर्वसामान्य लोकांसाठी त्यांच्या बँक खात्याद्वारा सहजपणे लाभ घेता येतील अशा तीन नव्या योजना कार्यान्वित केल्या. यामध्ये अटल पेंशन योजना, जीवनज्योती वीमा योजना व सुरक्षा वीमा योजना यांचा समावेश होता. या तीनही योजनांच्या कार्यवाहीतून बँकांच्या दररोजच्या व्यवहारात वाढ होण्याबरोबरच आर्थिक सर्वसमावेशनाचे उद्दिष्ट व्यावहारिकदृष्या, प्रत्यक्षात साध्य करणे शक्य होऊ शकते.

**'स्टँड अप इंडिया' व 'स्टार्ट अप इंडिया':**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील अनुसूचित मागासवर्गीय जाती जमाती आणि महिला उद्योजकांमध्ये उद्योजकतेला प्रोत्साहन देण्याच्या उद्दिष्टाने 'स्टँड अप इंडिया' या नव्या कार्यक्रमाची घोषणा केली. या योजनेअंतर्गत लाभार्थी उद्योजकांना १० लाख ते १ कोटीरूपयांपर्यंत कर्ज उपलब्ध करुन देण्याची तरतूद करण्यात आली आहे. तत्पूर्वी फेब्रुवारीत सादर करण्यात आलेल्या यंदाच्या केंद्रिय अर्थसंकल्पातही 'स्टँड अप' योजनेला प्रोत्साहन आणि बळकटी देण्यासाठी उद्योगांना आवश्यक साधनसामुग्री उपलब्ध करून देणे, व्यवसाय वृध्दी व उद्योजकता विकास कौशल्य इ.बाबत मार्गदर्शन कार्यक्रमांचे आयोजन, करसवलती, तसेच उद्योग व व्यवसायाच्या सुविधेसाठी आवश्यक अशा अनेक महत्वाच्या तरतूदींची घोषणा करण्यात आली होती.

तरूणांमध्ये उद्योजकता कौशल्यांचा विकास साधून त्यातून हजारो होतकरूंसाठी नोकरींची संधी निर्माण करणारे कुशल संघटक घडवण्याचा प्रदिर्घ उद्दिष्टासाठी या वर्षाच्या आरंभी 'स्टार्ट अप इंडिया' ची सुरूवात करण्यात आली या कार्यक्रमाला अधिक व्यापक स्वरूप देण्याच्या दृष्टीने 'स्डँड अप इंडिया' कार्यक्र सुरू करण्यात आला. त्यासाठी करण्यात आलेल्या तरतुदी व त्याला मिळणाऱ्या प्रतिसादाला अधिक महत्व मिळाले आहे.

**आव्हाने :**

शाश्वत विकास व अर्थव्यवस्थेला नवचेतना देण्याबरोबरच नागरिकांचे आर्थिकदष्ट्या सक्षमीकरण करण्याच्या उद्दिष्टाने सरकारद्वारा देशातील सर्व स्तरावर कार्यान्वित केलेल्या अनेक विकास योजनांचे परिणाम हळूहळू दिसू लागले आहेत. तरिही या योजनांचे नेमके फलित मिळण्यासाठी बरीच आव्हाने आहेत. या आव्हानांवर वेळीच योग्य उपाय योजण्याची गरज असून त्यातूनच प्रभावीपणे सार्वभौम वित्त पुरवठा सुनिश्चित राखत उच्च विकासदर गाठणे शक्य होईल.

**व्याजदर निश्चित करण्यातील अडचणी-** अजूनही भारतातील ग्रामीण आणि उपनगरी भागात, सणासुदीला किंवा कार्यप्रसंगी बँकांकडून कर्ज न घेता अनधिकृत क्षेत्रातील व्यक्तीं जसे सावकार इ. कडून पैसे घेणे पसंत केले जाते. प्रत्यक्षात सावकार जास्त व्याजदराने रक्कम कर्जाऊ देतात तरीही नजीकच्या बँकच्या सेवेचा उपयोग न करता लोकांमध्ये सावकारांकडून पैसे उसने घेण्याकडे कल दिसून येतो. जास्त कर्जदर अकारूनही कर्जांच्या व्यवहारात सावकार आघाडीवर का, या मागची कारणमिमांसा होणे जरूरीचे आहे. बरेचदा अशीही शक्यता असते की, रक्कम कोठून कर्जाऊ घ्यावी, या बाबतीत व्याजदर हा एकच घटक महत्वाचा नसतो. चाणक्यकालीन ऐतिहासिक माहितीनुसार प्राचीन भारतात व्याजदराचे प्रमाण हे व्यवहारातील जोखीमेवर ठरत असे. व्यापाऱ्यांना सर्वसामान्यांपेक्षा जास्त व्याजदर लागत असे. सर्वसामान्य व्यवहारात व्याजदर हे दिलेल्या अनामत रकमेच्या १५ टक्के असायचे तर व्यापारांकडून कर्ज वसूली करतांना मूळ रकमेवर ६० टक्के व्याजदर आकारला जाई. जर वस्तू एका जागेहून दुसरीकडे नेतांना जंगलातून प्रवास असेल तर व्यापारांना १२० टक्के दराने व्याज द्यावे लागे तर आयात निर्यातीच्या व्यवसायांत व्यापाऱ्यांना २४० टक्के एवढा प्रचंड व्याजदर भरावा लागत असे.

***प्रत्यक्षात सावकार जास्त व्याजदराने रक्कम कर्जाऊ देतात तरीही नजीकच्या बँकच्या सेवेचा उपयोग न करता लोकांमध्ये सावकारांकडून पैसे उसने घेण्याकडे कल दिसून येतो. जास्त कर्जदर अकारूनही कर्जांच्या व्यवहारात सावकार आघाडीवर का, या मागची कारणमिमांसा होणे जरूरीचे आहे. बरेचदा अशीही शक्यता असते की, रक्कम कोठून कर्जाऊ घ्यावी, या बाबतीत व्याजदर हा एकच घटक महत्वाचा नसतो.***

**वित्तीय समावेशन -** जनधन योजनेअंतर्गत उघडण्यात आलेल्या बँक खात्यांद्वारे अधिकाधिक आर्थिक व्यवहार झाले तरच खऱ्या अर्थाने ही योजना यशस्वी होईल. यासाठी सर्वसामान्य लोकांमध्ये विशेषत: ग्रामीण जनतेमध्ये बँक सेवेबाबत विश्वासार्हता निर्माण होणे व त्यादृष्टीने विविध प्रसारमाध्यामांतून जनजागृती करून लोकांपर्यंत योग्य माहिती पोहचवणे व बँकींग क्षेत्राला चालना मिळेल, असे अनुकूल वातावरण तयार करणे आवश्यक आहे. आपल्याकडील आर्थिक स्त्रोतांचा बँकींग व्यवहाराशी कसा संबंध आहे, कमी उत्पन्न किंवा तुटपुंजी संपत्ती असल्यास बँक सेवा घेण्याची काय आवश्यकता, अशा शंका तसेच बँक व्यवहारांतील जटील प्रक्रिया, त्यांचे जास्त सेवाशुल्क इ. काही घटक ग्रामीण भागातील तसेच सर्वसामान्य लोकांना आर्थिक यंत्रणेपासून दूर करतात. आजवर देशातल्या एकूण ६ लाख खेड्यांपैकी केवळ ५० हजार खेड्यांमध्येच बँकांच्या शाखा आहे. बँक सेवांचा लाभ देशाच्या कानाकोपऱ्यातील ग्रामीण तसेच दुर्गम भागांपर्यंत पोहचवण्यासाठी या भागांत जास्त संख्येने एटीएम सारखी सुविधा सुरू करून येथील लोकांना या सुविधेचा लाभ घेण्याबाबत योग्य माहिती देणे व त्यांना या सुविधांचा लाभ घेण्यास प्रोत्साहित करणे यांसारखे उपाय उपयुक्त ठरू शकतात. थोडक्यात घराच्या जवळ बँकींगसेवा पोहचवणे एकूणच लोकांमध्ये बँकसेवांचा वापर करण्यास उद्युक्त करेल.

**मुद्रा बँक-** ही योजना यशस्वी होण्यासाठी लघुउद्योजकांना कर्ज मिळवून देण्याबाबतच्या बँकांच्या मानसिकतेत बदल होणे अनिवार्य आहे. याकरिता प्रथम बँकांनी लघु व सूक्ष्म उद्योजकांच्या आर्थिक गरजा समजावून घेऊन त्यांनुसार कर्जयोजना देऊ केल्या पाहिजेत.

**स्टँड अप व स्टार्ट अप -** या दोन योजना यशस्वी होण्यासाठी आपल्या देशात व्यवसाय करण्याची पोषक वातावरण निर्मिती करण्याची आवश्यकता आहे.

भारतात जागतिक दर्जाच्या व्यवसाय व उद्योजकता कौशल्याचे रितसर प्रशिक्षण देणाऱ्या संस्था स्थापन करता येतील. भारतीय तंत्रज्ञान व्यवस्थापन संस्था यांच्या धर्तीवर भारतीय व्यवसाय व उद्योजकता प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यात पुढाकार घेण्याची गरज आहे. तसेच शैक्षणिक धोरणाचा रोख प्रामुख्याने देशभर जागतिक दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये सुरू करण्यावर असावा. यात वाणिज्य, कायदा व उद्योग व व्यवसाय इ. विषयांचे उच्च शिक्षण देणारे अभ्यासक्रम असावे.

भारतात विविध क्षेत्रात कार्यकुशल कामगारांची मोठ्या प्रमाणात कमतरता आहे. प्रतिवर्षी महाविद्यालयीन व तंत्रशिक्षण संस्थांतून सुमारे १२ दशलक्ष पदवीधारक उत्तीर्ण होतात परंतु, त्यापैकी केवळ दहा टक्के विद्यार्थ्यांजवळच नोकरी व उद्योगातील प्रत्यक्ष काम करण्याचे व्यावहारिक कौशल्य असल्याचे तसेच १९८२ पासून वर्षाला केवळ ५०० लोकांना व्यवसाय सुरू करण्याचे प्रोत्साहन दिले जाते व तेव्हापासून वर्षाला केवळ ४० हजार तांत्रिकक्षेत्रातल्या रोजगारांची निर्मिती झाली असल्याचे निष्कर्ष शासकिय विश्लेषणात नोंदवण्यात आले आहेत. या समस्यांवर तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे.

भारतातल्या वाढत्या लोकसंख्येमुळे मोठ्या प्रमाणावर रोजगारक्षम तरूण तयार होत आहेत. त्यामुळे याबाबतीत अमूलाग्र बदल होणे, 'स्टार्टअप्स' ची संख्या वाढणे आवश्यक आहे. तरूणांना स्वतंत्र उद्योग व्यवसाय सुरू करायचा असेल तर भारतात आजही त्यांना त्यांच्या कुटुंबियांकडून वा आप्तेष्ट व शिक्षकांकडून फारसे प्रोत्साहन मिळत नाही. स्वतंत्र व्यवसायात सतत असलेली जोखीम, उत्पन्नाची अशाश्वती इ. कारणांमुळे व्यावसायापेक्षा ठराविक पगाराची नोकरी करण्याची भारतीयांची मानसिकता आहे. व्यवसाय व उद्योजकतेला वाव मिळेल, सुरूवातीच्या प्रयत्नांत अपयश आले तरिही व्यवसाय सुरू ठेवण्यासाठी आर्थिक पाठबळ मिळेल, अशा प्रकारची यंत्रणा विकसित करण्याची गरज आहे. याकरिता शासनाने सामाजिक सुरक्षा विमा किंवा उद्योजकांसाठी विशेष विमा योजना सुरू कराव्यात. तसेच, उद्योजकांना उद्योग वाढीसाठी प्रोत्साहन मिळेल असे अनुकूल वातावरण, सरकारी मान्यता मिळवण्याच्या प्रक्रियांचे सुलभीकरण, मार्गदर्शन केंद्र, प्रसारमाध्यमातून उद्योजकतेला वाहिलेल्या विशेष वाहिन्या व तत्सम कार्यक्रमांतून अधिकाधिक तरूणांना स्वतंत्र उद्योजक होण्यासाठी प्रेरित करणे इ. उपायही उद्योजक घडवण्याच्या राष्ट्रीय मोहिमेत महत्वाचे ठरतील.

**निष्कर्ष :**

जागतिक स्तरावर तरुण लोकसंख्या असलेली व झपाट्याने वाढत जाणारी अर्थव्यवस्था अशी एक नवी ओळख भारताला मिळू लागली आहे. देशातील तरूणांना सर्वसमावेशक वाढीच्या पुरेशा संधी उपलब्ध करून दिल्यास देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी मिळण्यास मदत होईल. गेल्या दोन वर्षांपासून शासनाद्वारे सर्वत्र बँकिंग सुविधा प्रदान करण्याबरोबरच तरूणांना स्वयंरोजगारासाठी आणि वाढीसाठी पोषक वातावरण तयार करण्याच्या उद्दिष्टाने हर तऱ्हेचे प्रयत्न करण्यात येत आहेत. यातून तरूणांच्या सबलीकरणाबरोबरच भारताला ९ टक्क्यांहून अधिक विकास दराचे उद्दिष्ट साध्य करण्यास मदत होऊ शकेल. असे झाले तरच नजीकच्या काळात भारत जगातील एक महासत्ता म्हणून उद्यास येईल.

**ठळक मुद्दे**

● १९६९ मध्ये भारतातील १४ मोठ्या बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. १९८० मध्ये आणखी सहा व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. म्हणजे सांप्रत एकूण २० बँका या गटात मोडतात. भारतातील बँकांमधील एकूण ठेवींपैकी ९२% ठेवी राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये आहेत. सामाजिककल्याण आणि राष्ट्रीय विकास साध्य करण्यासाठी एक प्रमुख साधन म्हणून बँकांचे रूपांतर करणे, हे राष्ट्रीयीकरणाचे प्रमुख उद्दिष्ट ठरविण्यात आले. ते साध्य करण्यासाठी राष्ट्रीयीकृत बँक व्यवसायाची तपशीलवार उद्दिष्टे पुढीलप्रमाणे ठरविण्यात आली: (१) बँकांच्या शाखा वाढविणे; प्रामुख्याने ग्रामीण व निमशहरी विभागांत शाखा-विस्तार करणे. (२) बँकांमधील ठेवी वाढविण्यासाठी प्रयत्न करणे. (३) लोकांमध्ये बँकिंगची सवय वाढविणे. (४) बँकांच्या साधनसामग्रीचा उपयोग अग्रक्रम दिलेल्या क्षेत्रांना, म्हणजे शेती, लघुउद्योग, निर्यात व्यापार, समाजातील दुर्बल घटक आणि आर्थिक दृष्ट्या मागासलेले विभाग यांच्या विकासासाठी करणे. (५) नवीन उद्योजकांना प्रेरणा आणि मदत देणे. (६) बँक व्यवसायातील कर्मचाऱ्यांसाठी योग्य त्या सेवा-सवलती उपलब्ध करून देऊन, त्यांच्या प्रशिक्षणाची चोख व्यवस्था करणे.

● देशाच्या 'आर्थिक सर्वसमावेशना'त सहभागी होण्यासाठी बँक खाते ही प्राथमिक गरज आहे. सध्याच्या सरकारने सत्तेची सूत्र हाती घेताच योग्य नियोजन व वातावरणनिर्मिती करून प्रधानमंत्री जन-धन ही योजना सुरू केली. बँकांचे फायदे समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत पोचवणे हे या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या योजने अंतर्गतचे फायदे पुढीलप्रमाणे-अतिशय

कमी कागदपत्रांनीसुद्धा खाते उघडता येणे शक्य, एक लाखापर्यंत अपघात-विमा मोफत; तसेच ३०,००० रुपयांपर्यंतचा आयुर्विमा मोफत, सहा महिन्यानंतर ५००० रुपयांपर्यंत ओव्हरड्राफ्ट, बँक खाते असल्यामुळे म्युच्युअल फंडांच्या योजनांमध्ये गुंतवणूक शक्य, 'रुपे' नावाचे डेबिट कार्ड) खात्यात कमीत कमी रक्कम ठेवण्याचे बंधन नाही, सरकारी अंशदान (सबसिडी) जमा करणे शक्य.

● देशाची अर्थव्यवस्था भक्कम करण्यासाठी 'मेक इन इंडिया' योजनेच्या माध्यमातून ठोस पाऊल टाकण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर २०१४ मध्ये या योजनेचा नारा दिला. देशी तसेच विदेशी कंपन्यांनी भारतातच उत्पादन करण्याला प्रोत्साहन देऊन त्याद्वार देशातील उत्पादन क्षेत्राचा विकास, नव्या रोजगारसंधींची निर्मिती करणे असे या योजनेचे प्राथमिक स्वरूप आहे. या उपक्रमासाठी निवडलेल्या क्षेत्रांमध्ये . निवडलेल्या क्षेत्रांमध्ये विज्ञान-तंत्रज्ञान-अभियांत्रिकीच्या विषयांशी थेट संबंध असलेली अनेक क्षेत्रे जसे, रसायन, जैवतंत्रज्ञान, आरोग्य, औषधनिर्मिती, खाद्यान्न प्रक्रिया, इलेक्ट्रॉनिक्स, चर्मोद्योग, वस्त्रोद्योग, खनिज उत्पादन, नैसर्गिक ऊर्जा, संगणकशास्त्र, औष्णिक वीज प्रकल्प, बांधकाम, मोटारनिर्मिती, अभियांत्रिकीच्या सर्व शाखा आदींचा समावेश असून इनोव्हेशन, बौद्धिकसंपदेचे संरक्षण, पायाभूत सुविधा, प्रशिक्षित तरुण-तरुणी अशा घटकांचाही विचार करण्यात आला आहे.

● अटल पेन्शन योजना ही निवृत्ती नंतर दरमहा ठराविक परतावा देणारी एक सरकारी पेन्शन योजना आहे. ही योजना मुख्यत: असंघटित क्षेत्रातील नागरिकांसाठी, ज्यांच्यासाठी कुठलीही पेन्शन योजना उपलब्ध नाही, अशासाठी लाभदायक आहे. बँका व पेन्शन निधी विनियामक आणि विकास प्राधिकरण यांच्या सहयोगाने ही योजना कार्यान्वित होणार आहे.

१८ ते ४० वयोगटातील असंघटित क्षेत्रातील सर्व बचत बँक खातेधारक या योजनेत सहभागी होऊ शकतील. १८ वर्षे वयाच्या व्यक्तीने दरमहा ४२ रूपये भरल्यास या व्यक्तीला वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यानंतर एक हजार रूपये दरमहा पेन्शन मिळू शकेल. याच धर्तीवर दरमहा २१० रूपये भरल्यास पाच हजार रूपये दरमहा पेन्शन मिळू शकेल. दर महिन्याचे योगदान बचत खात्यातून परस्पर नावे टाकण्याची सोय आहे.

● देशातील लघु उद्योगांना सहज कर्ज पुरवठा व्हावा, या उद्देशाने पंतप्रधान

---


## Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :

**Yojana** : 1 Yr. **Rs. 230/-;** 2 Yrs. **Rs. 430/-;** 3 Yrs. **Rs. 610/-**

(Circle the period of subscription)

DD / MO No. ________________ date ________

Name (in block letters) : ________________

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ________________

Phone No. / email : ________________

PIN : □□□□□□

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.

P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

**सभासद शुल्क मनी ऑर्डर किंवा डिमांड ड्राफटद्वारे पाठवावे,**

**अथवा** www.bharatkosh.gov.in/product **येथे ऑनलाईन भरावे.**

नरेंद्र मोदी यांनी ८ एप्रिल २०१५ रोजी २०,००० करोड रुपये भांडवल असलेली 'मायक्रो युनिट्स डेव्हलपमेंट अँड रिफायनान्स एजन्सी' अर्थात मुद्रा बँकेचे उद्‌घाटन केले. या बँकेतून लघु उद्योजकांना १० लाखांपर्यंतचं कर्ज सहज उपलब्ध होणार आहे. यासाठी सरकारने एकूण २० हजार कोटींची तरतूद केली आहे. या बँकेच्या माध्यमातून लघु उद्योगांना कर्ज देण्यासाठी देशातील इतर बँकांना प्रोत्साहनही देण्यात येईल. शिवाय या कर्ज योजनांच्या नियमनाचे कामही मुद्रा बँकेच्या हाती असेल. मुद्रा योजनेत तीन श्रेणी असतील. त्यांचं शिशू, किशोर आणि तरुण या गटांमध्ये वर्गीकरण करण्यात आलं आहे. शिशू श्रेणीअंतर्गत ५०,००० रुपयांचं कर्ज मिळू शकतं, तर किशोर श्रेणीत ५०,००० रुपयांपासून ५ लाख रुपयांपर्यंत कर्ज दिले जाईल. तसंच तरुण श्रेणीअंतर्गत ५ लाख रुपयांपासून १० लाख रुपयांपर्यंत कर्ज मिळेल. मुद्रा बँकेद्वारे छोट्या कारखानदारांना आणि दुकानदारांना कर्ज मिळेल. त्याचबरोबर भाजीवाले, सलून यांनाही लोन दिलं जाईल. मुद्रा योजनेची वैशिष्ट्ये -देशातील ५.७७ कोटी उद्योजकांना वित्तसाहाय्य, वार्षिक ७ टक्के दराने १० लाख रुपयांपर्यंत अर्थपुरवठा, २०,००० कोटींचे सरकारचे भक्कम भांडवली पाठबळ, सिडबीची ही उपकंपनी रिझर्व्ह बँकेच्या अखत्यारीत येणार.

● स्टार्ट अप इंडिया, स्टँड अप इंडिया या योजना नव्या वर्षात मांडण्यात आल्या. अनुसूचित जाती / जमाती आणि महिला उद्योजकांमध्ये उद्योजकतेला प्रोत्साहन देण्याकरिता स्टँड अप इंडिया तर तरूणांमध्ये स्वतंत्र व्यवसाय उभारणी करण्यास प्रोत्साहन देण्याच्या उद्दिष्टाने 'स्टार्ट अप इंडिया' योजना तयार करण्यात आली आहे. उद्योग सुरू करण्यासाठी आवश्यक कर्ज स्टार्ट अप लोन या स्वरूपात मिळेल अशी तरतूद या योजनांमध्ये करण्यात आली आहे.

■■■

*लेखक आरबीआय आणि आयआयएम बंगलोरचे अर्थशास्त्राचे मुख्य प्रोफेसर असून आरबीआयच्या बँकिंग रिसर्च विभागाचे माजी संचालक आहेत. यापूर्वी त्यांनी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीत काम केले आहे.*

*email: charansingh60@gmail.com*

Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

**Advertisement & Criculation Manager, Publications Division, Ministry of Information & Broadcasting Room No. 48 to 53, Soochna Bhavan, CGO Complex, Lodhi Road, New Delhi - 110003.**

**Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:**

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054,** Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022-2756 6582 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.

**For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**

Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.

# ई-गव्हर्नन्स: लोकाभिमूख गतिमान शासन

डॉ रणजीत मेहता



***ई-गव्हर्नन्सचा उदय ही इंटरनेटच्या माध्यमातून घडून आलेली सर्वात प्रभावी घटना आहे. इंटरनेटमुळे देशांतर्गत आणि देशाबाहेर संवादप्रक्रिया सुलभ झाली. तसेच डिजीटल दळणवळणामुळे राष्ट्रीय सरकारसमोर अनेक संधी आणि आव्हाने निर्माण झाली. लोकशाही प्रक्रियेतून निवडून आलेली सरकारे देशातील नागरिकांच्या बाजूने कायदेनिर्मिती करत असतात. ई-गव्हर्नन्स या संकल्पनेला अनेक पैलू आहेत.***

माहिती आणि दळणवळणाच्या साधनांचा प्रभावीपणे वापर करुन कार्यक्षमता, परिणामकारकता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यासंबंधी सरकार, सरकारशी संबंधित राष्ट्रीय पातळीवरील, राज्यपातळीवरील आणि स्थानिक पातळीवरील संस्थांचा स्थानिकांशी संवाद साधून नागरिकांचे सबलीकरण करणे म्हणजे ई-गव्हर्नन्स होय.

ई-गव्हर्नन्सचा उदय ही इंटरनेटच्या माध्यमातून घडून आलेली सर्वात प्रभावी घटना आहे. इंटरनेटमुळे देशांतर्गत आणि देशाबाहेर संवादप्रक्रिया सुलभ झाली. तसेच डिजीटल दळणवळणामुळे राष्ट्रीय सरकारसमोर अनेक संधी आणि आव्हाने निर्माण झाली. लोकशाही प्रक्रियेतून निवडून आलेली सरकारे देशातील नागरिकांच्या बाजूने कायदेनिर्मिती करत असतात. ई-गव्हर्नन्स या संकल्पनेला अनेक पैलू आहेत.

नव्वदच्या दशकात माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा झालेला उदय आणि रोजगाराच्या विपूल संधी हा 'वर्ल्ड वाईड' वेब चा मोठा फायदा आहे. त्यानंतर तंत्रज्ञान आणि ई-गव्हर्नन्समध्ये व्यापक बदल घडून आले. इंटरनेट आणि मोबाईल जोडण्यांच्या व्याप्तीमुळे नागरिकांना व्यापक प्रमाणात माहिती मिळणे सुलभ झाले. त्यामुळे नागरिकांची माहितीची भूक वाढली. सरकार तसेच कॉर्पोरेट कंपन्यांनी विविध सेवा ऑनलाईन देण्यास सुरुवात केली. त्यामुळे नवीन ई-नागरी हक्क उदयास आले.

भारतात ई-गव्हर्नन्सने ६० च्या दशकाच्या उत्तरार्धात आणि ७० च्या दशकाच्या सुरुवातीला आकार घेतला. यात संरक्षण क्षेत्रात संगणकाचा वापर, आर्थिक नियोजन, राष्ट्रीय जनगणना, निवडणुका, कर आकारणी यासारख्या क्षेत्रात संगणक युग सुरू झाले. मात्र, ९० च्या दशकाच्या सुरुवातीपासून याने व्यापक रुप धारण केले. खासगी क्षेत्र, गैर शासकीय संस्था यांच्या माध्यमातून माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन माहिती घेण्यास सुरुवात केली. सुरुवातीला केवळ स्वचालन (ऍटोमेशन) आणि संगणकीकरण यावर भर दिला होता. नंतर जोडणी (कनेक्टीवीटी), नेटवर्किंग, माहिती आणि सेवा प्रदान करण्यासाठी प्रोसेसिंग सिस्टीम बसवणे या बाबी सुरू झाल्या. राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स योजना, मे २००६ ची अंमलबजावणी ही सामान्य नागरिक डोळ्यासमोर ठेवून करण्यास सुरुवात केली. ज्यामुळे नागरिकांना पुरवणाऱ्या सेवांची कार्यक्षमता, पारदर्शकता आणि

विश्वसनीयता ही अतिशय किफायतशीर दराने मिळेल.

सध्या ही योजना प्रमुख अशा २७ प्रकल्पांशी आणि आठ पूरक घटकांना लागू आहे. यात केंद्र, राज्य आणि स्थानिक पातळीवरील घटकांचा समावेश आहे. यात आयकर, सीमाशुल्क आणि अबकारी कर, पासपोर्ट, जमिनीच्या नोंदी, कृषी आणि राज्यपातळीवर ई-जिल्हा, आणि स्थानिक पातळीवर पंचायत आणि नगरपालिकांमध्ये राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स योजना (एनईजीपी) लागू आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये ई-गव्हर्नन्सबाबत केंद्र सरकारने उचललेली पावले पुढील प्रमाणे आहेत.

**पहल**

पहल ही थेट लाभ हस्तांतरण योजना सुरुवातीला १ जून २०१३ रोजी केंद्र सरकारने सुरू केली होती. २९१ जिल्ह्यांमध्ये स्वयंपाकाच्या गॅसवरील अनुदानासाठी ही योजना सुरू करण्यात आली होती. सध्याच्या सरकारने या योजनेचे परीक्षण करुन ग्राहकांना येत असलेल्या अडचणी विचारात घेऊन योजनेत सुधारणा करुन नवीन योजना १५ नोव्हेंबर २०१५ रोजी ५४ जिल्ह्यांमध्ये २.५ कोटी लोकांसाठी सुरू केली. दुसऱ्या टप्प्यात १ जानेवारी २०१५ पासून ही योजना देशातील सर्व जिल्ह्यांमध्ये लागू करण्यात आली. पूर्वीच्या योजनेत ज्या ग्राहकांना एलपीजी अनुदान पाहिजे त्यांच्यासाठी आधारक्रमांक देणे सक्तीचे होते. मात्र, ज्यांच्याकडे आधारकार्ड नाही त्यांच्यासाठी ही मोठी समस्या होती. म्हणून त्यांना अनुदान मिळत नव्हते.

ज्या ग्राहकांना या योजनेच्या माध्यमातून अनुदान हवे आहे, त्यांना आपला आधार क्रमांक बँक खात्यासोबत जोडावा लागतो. जर, ग्राहकाकडे आधार क्रमांक नसेल तर ते थेट आपले बँक खाते आपल्या १७ अंकी एलपीजी ओळख क्रमाकांसह जोडू शकतात. एकदा ग्राहक जोडला गेला की, त्याला बाजारभावाने सिलेंडर मिळतो आणि त्याचे अनुदान थेट बँक खात्यावर जमा होते. या योजनेशी जोडलेल्या ग्राहकाच्या बँक खात्यावर आता आगाऊ ५६८ रुपये जमा होतात.

ग्राहकांना या योजनेची सद्यस्थिती माहिती व्हावी म्हणून एसएमएस सेवा आहे. 'पहल'या योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्राहकाने आपला मोबाईल क्रमांक वितरकाकडे नोंदवणे गरजेचे आहे. या योजनेअंतर्गत देशातील ६७६ जिल्ह्यातील १५.३ कोटी लोक लवकरच जोडले जातील. सध्या या योजनेअंतर्गत ६.५ कोटी म्हणजेच ४३ टक्के ग्राहकवर्ग जोडला आहे आणि त्यांचे अनुदान बँक खात्यावर जमा होत आहे.

***'पहल'या योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्राहकाने आपला मोबाईल क्रमांक वितरकाकडे नोंदवणे गरजेचे आहे. या योजनेअंतर्गत देशातील ६७६ जिल्ह्यातील १५.३ कोटी लोक लवकरच जोडले जातील. सध्या या योजनेअंतर्गत ६.५ कोटी म्हणजेच ४३ टक्के ग्राहकवर्ग जोडला आहे आणि त्यांचे अनुदान बँक खात्यावर जमा होत आहे.***

ग्राहकांना मिळणारे अनुदान थेट बँक खात्यावर जमा व्हावे, म्हणून ही योजना सुरू केली आहे. यामुळे दलाली आपोआप संपुष्टात आली आहे. यामुळे सार्वजनिक खर्चात बचत झाली आहे. त्यामुळे सर्व एलपीजी ग्राहकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी लवकरात लवकर या योजनेअंतर्गत नोंदणी करावी.

१५ नोव्हेंबर २०१४ रोजी योजना सुरू झाल्यापासून ३० डिसेंबर २०१४ पर्यंत २० लाख एलपीजी ग्राहकांच्या बँक खात्यावर ६२४ कोटी रुपयांचे अनुदान जमा झाले आहे. या योजनेअंतर्गत जर एखाद्याला अनुदान नको असेल तर स्वेच्छेने तो अनुदान सोडू शकतो, त्यासाठी सरकारने 'गिव्ह इट अप' अभियान मार्च २०१५ मध्ये सुरू केले आहे. या अभियानाला मिळालेले यश म्हणजे मध्यमवर्गीयांसह, निवृत्त कर्मचारी असे सर्व मिळून एक कोटी लोकांनी अनुदान सोडले आहे.

**डिजीटल इंडिया**

प्रमुख योजनांमधील दिरंगाई ब्रॉडबँड आणि मोबाईल जोडणीच्या माध्यमातून दूर करणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे. भारत संचार निगम लिमिटेड, रेलटेल, पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, यांच्या माध्यमातून थेट खर्च करण्यावर मर्यादा आहे. कारण देशातील ६८ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात आहे. त्यांना ऑनलाईन आणावयाच्या उद्देशाने डिजीटल इंडिया योजना सुरु केली आहे.

- प्रत्येक नागरिकासाठी डिजीटल पायाभूत घटक ही उपयोगिता समजणे
- मागणीनूसार शासकीय सुविधा आणि सेवा पुरवणे
- नागरिकांचे डिजीटल सबलीकरण

हे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून डिजीटल इंडिया योजनेअंतर्गत ब्रॉडबँड महामार्गाची निर्मिती, मोबाईल कनेक्टीवीटी, लोकांसाठी इंटरनेट कार्यक्रम, ई-गव्हर्नन्स, तंत्रज्ञानाच्या मदतीने शासनात सुधारणा, ई-क्रांती- इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या माध्यमातून सेवाप्रदान, सर्वांना माहितीचे दालन खुले, इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन: शून्य आयात उद्दिष्ट, नोकऱ्यांसाठी माहिती तंत्रज्ञान प्रदान करण्यात येणार

आहे. भारताला ज्ञानाधारीत अर्थव्यवस्था बनवणे आणि सुशासनाच्या माध्यमातून नागरिकांना सेवा पुरवणे हे या योजनेचे ध्येय आहे.

डिपार्टमेंट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अँड इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी (डेईआयटीवाय) या विभागाची ही संकल्पना आहे आणि या विभागामार्फतच या कार्यक्रमाचे समन्वयन केले जाते. त्यासाठी केंद्र सरकारचे सर्व मंत्रालय, विभाग आणि राज्यसरकारांसमवेत समन्वय साधला जातो. डिजीटल इंडिया कार्यक्रमाच्या देखरेख समितीच्या अध्यक्षपदी पंतप्रधान आहेत, या योजनेअंतर्गत होणाऱ्या सर्व घडामोडींकडे त्यांचे बारकाईने लक्ष असते.

डिजीटल इंडिया कार्यक्रमाचे अनेक घटक आहेत. पण, सर्वात महत्वाचा घटक म्हणजे सर्वांना जोडणी होय. केंद्र सरकार फायबर ऑप्टीक्सच्या माध्यमातून सर्व ग्रामपंचायतींना जोडू इच्छिते.

सरकारने यासाठी सार्वजनिक क्षेत्रातील कंपनीची नियुक्ती केली आहे, जी ग्रामीण भागामधील फायबर ऑप्टीक जोडणीकडे लक्ष पुरवेल. या कामात व्यावसायिकता यावी म्हणून सरकारने खासगी उद्योजकांना ग्रामीण भागामध्ये इंटरनेट सेवा प्रदान करण्यासाठी बोलावले आहे. एकदा का लहान उद्योग सुरू झाला की, कालांतराने त्याचे मोठ्या व्यवसायात रुपांतर होईल. केंद्र सरकारच्या डिजीटल इंडिया कार्यक्रमामुळे खासगी क्षेत्र उत्साहित आहे. या सर्व व्यवसायांमुळे २०१६-१७ मध्ये भारतामध्ये दळणवळणाची साधने, संगणक, तांत्रिक सल्लागार सेवा, हार्डवेअर या सर्वांच्या बाजारपेठेची मागणी १२ टक्क्यांनी वाढणार असल्याचा एक अहवाल सांगतो.

२०१६ मध्ये तंत्रज्ञानावर होणार खर्च २.३२ ट्रिलीयन रुपये, तर २०१७ मध्ये २.५९ ट्रिलीयन रुपयांपर्यंत पोहचण्याचा अंदाज आहे. हा खर्च २०१५ मध्ये २.८ ट्रिलीयन रुपये एवढा आहे. यातील एकतृतीयांश रक्कम ही हार्डवेअरवर खर्च होणार आहे. मात्र, बाजारपेठेतील बदलत्या परिस्थितीनूसार ४ जी, बाजारपेठेचा वेग हळूहळू मंदावेल.

***कामात व्यावसायिकता यावी म्हणून सरकारने खासगी उद्योजकांना ग्रामीण भागामध्ये इंटरनेट सेवा प्रदान करण्यासाठी बोलावले आहे. एकदा का लहान उद्योग सुरू झाला की, कालांतराने त्याचे मोठ्या व्यवसायात रुपांतर होईल. केंद्र सरकारच्या डिजीटल इंडिया कार्यक्रमामुळे खासगी क्षेत्र उत्साहित आहे. या सर्व व्यवसायांमुळे २०१६-१७ मध्ये भारतामध्ये दळणवळणाची साधने, संगणक, तांत्रिक सल्लागार सेवा, हार्डवेअर या सर्वांच्या बाजारपेठेची मागणी १२ टक्क्यांनी वाढणार असल्याचा एक अहवाल सांगतो.***

२०१४-१५ मध्ये १००, ००० ग्रामपंचायती फायबर ऑप्टीकने जोडण्याची योजना होती. नंतर त्याचा आकडा ५०, ००० करण्यात आला मार्च २०१५ पर्यंत, २०,००० ग्रामपंचायतींना नॅशनल ऑप्टीकल फायबर नेटवर्कने जोडण्यात यश आले आहे.

डिसेंबर २०१५ पर्यंत, ३२, २७२ ग्रामपंचायती ७६,६२४ किलोमीटर फायबर लेडच्या कक्षेत आहेत. भारतनेट प्रकल्पाच्या माध्यमातून २०१७ नंतर २ एमबीपीएस वेगाने ग्रामीण भागात ब्रॉडबँड पुरवण्याचे लक्ष्य आहे.

**डिजीटल इंडिया अंतर्गत महत्वाचे प्रकल्प**

१.डिजीटल लॉकर सिस्टीम- कागदपत्रांची पूर्तता ई-कागदपत्रांच्या माध्यमातून करणे. नोंदणीकृत रेपॉजिटरीजच्या माध्यमातून ई-कागदपत्रांचे शेअरिंग करण्यात येईल ज्यामुळे त्याची ऑनलाईन सत्यता तपासणे सुलभ होईल.

२.MyGov.in - यामुळे नागरिकांना चर्चा (डिस्कस), करावयाची कामे (डू), माहितीचे वितरण (डिससेमिनेट) च्या माध्यमातून सरकारी सेवा उपलब्ध करण्यात येतील. मोबाईल फोनवर नागरिकांना ऍपच्या माध्यमातून या सुविधा घेता येतील.

३. स्वच्छ भारत मोहीम मोबाईल ॲप- स्वच्छ भारत मोहिमेअंतर्गत उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी सरकार आणि नागरिकांना या ऍपचा वापर करता येईल.

४.ई-साईन फ्रेमवर्क- ऑनलाईन आधार कार्डचा वापर करुन नागरिकांना डिजीटल स्वाक्षरीच्या माध्यमातून कार्यसुलभता.

५. दी ऑनलाईन रजिस्ट्रेशन सिस्टीम (ओआरएस)- ई-हॉस्पीटल ॲपच्या माध्यमातून महत्वाच्या सेवा जसे ऑनलाईन नावनोंदणी, शुल्क भरणा, नियोजित भेट, ऑनलाईन निदानसूचक अहवाल, ऑनलाईन रक्ताची उपलब्धता या सेवांचा लाभ घेता येईल.

६. राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टल- शिष्यवृत्ती प्रक्रियेसंबंधी सर्व बाबी एकाच पोर्टलवर. विद्यार्थ्यांचे अर्ज, छाननी, मंजूरी आणि वितरण या सर्व बाबी या पोर्टलच्या माध्यमातून उपलब्ध आहेत.

७. डिजीटल इंडिया प्लॅटफॉर्म-

व्यापक प्रमाणावर सेवांचे प्रभावीपणे प्रदान करण्यासाठी देशातील सर्व नोंदणीचे डिजीटलायजेशन करणे हा याचा उद्देश आहे.

८. भारत नेट- केंद्र सरकारने देशभरातील २.५ लाख ग्रामपंचायतींच्या जोडणीसाठी हायस्पीड डिजीटल मार्ग तयार केला आहे. ही जगातील सर्वात मोठी ग्रामीण भागातील जोडणी ठरणार आहे.

९. नेक्स्ट जनरेशन नेटवर्क (एनजीएन)- भारत संचार निगम लिमिटेडने ३० वर्षापूर्वी बसवलेली एक्सचेंजेस अत्याधुनिक करण्यासाठी हा कार्यक्रम हाती घेतला आहे.

१०. भारत संचार निगम लिमिटेडने देशभरात वायरलेस नेटवर्क (वाय-फाय) चा उपक्रम हाती घेतला आहे.

११. ब्रॉडबँड हायवेज- दूरसंचार साधनांच्या माध्यमातून प्रभावी सेवा पुरवायची असेल तर ब्रॉडबँड महामार्ग यावर भर द्यावा लागणार हे सरकारला ठाऊक असल्यामुळे डिजीटल इंडिया कार्यक्रमाचा हा मुख्य आधारस्तंभ ठरवण्यात आला.

**धोरण पुढाकार (पॉलिसी इनिसेटीव्ज)**

ई-गव्हर्नन्स कार्यक्रमाअंतर्गत धोरण पुढाकार निश्चित करुन ई-क्रांती आराखडा, भारत सरकारसाठी खुले सॉफ्टवेअर धोरण, ई-गव्हर्नन्स कार्यक्रमासाठी खुले सॉफ्टवेअर धोरण, पॉलिसी ऑन ओपन ऍप्लीकेशन प्रोग्रामिंग इंटरफेसेस, ई-मेल धोरण, भारत सरकारच्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील माहितीचा वापर, क्लाऊड रेडी ऍप्लीकेशन्ससाठी धोरण याकामी पुढाकार घेतला आहे.

बीपीओ धोरण- ईशान्येकडील राज्यांमध्ये बीपीओ केंद्र उघडण्यासाठी या धोरणाला मंजूरी देण्यात आली आहे.

इलेक्ट्रॉनिक्स विकास निधी (ईडीएफ)- याच्या माध्यमातून नवकल्पना, संशोधन आणि विकास, उत्पादन निर्मिती, स्वत:ची कायमस्वरुपी व्यवस्था जोखीम निधीच्या माध्यमातून निर्माण करणे हा उद्देश आहे.

नॅशनल सेंटर फॉर फ्लेक्झिबल इलेक्ट्रॉनिक्स- फ्लेकझिबल इलेक्ट्रॉनिक्स यासारख्या नव्याने उदयास येणाऱ्या क्षेत्रात संशोधन आणि विकासाला चालना देणे.

सेंटर ऑफ एक्सलन्स ऑन इंटरनेट ऑन थिंग्स- हा डीईआयटीवाय, ईआरएनईटी, नॅसकॉम यांचा संयुक्त उपक्रम आहे.

सारांश, ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून भारताच्या दारिद्र्ययनिर्मूलन कार्यक्रमाला बळकटी देण्यात येत आहे. यामुळे गरीबांच्या आयुष्यात परिवर्तन घडून येईल, अशी अपेक्षा आहे. आता देशभरात व्यापक पातळीवर या कार्यक्रमाला पोहचवणे हे मुख्य कार्य आहे. डीबीटीचे गुण आणि अवगुण हा आशा आणि मान्यता यांचे मिश्रण आहे. पण, डिबीटीमुळे सरकार, लाभार्थी आणि खासगी संस्थांना लाभ झाला आहे. यामुळे आर्थिक समता प्रस्थापित होऊन प्रत्येक लाभार्थ्याला आपला वाटा निर्धारीत वेळेत मिळेल.

■■■

*लेखक नवी दिल्ली येथील पीएचडी चेंबर ऑफ कॉमर्स अॅन्ड इंडस्ट्रीचे संचालक असून भारत सरकारच्या विविध समित्यांचे सदस्य आहेत.*

*gmail: ranjeetmehta@gmail.com*

## आगामी अंक

**जुलै २०१६**


**'पाण्याचे महत्व'**

## सूचना

वाचकांना विनंती आहे की, त्यांनी योजना मासिका संबंधीत अभिप्राय योजना कार्यालय:- 'बी' विंग, केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर - ४००६१४ या पत्त्यावर पाठवावे. अभिप्राय सूचनांचे नेहमीच स्वागत असेल.

# कौशल्य विकास आणि खाजगी क्षेत्र

प्रमोद भसिन



***भारत ही एक अतिशय ताकदवान सेवा उपलब्ध करून देणारी अर्थव्यवस्था असल्याने उपलब्ध मनुष्यबळाला कुशल बनवणे व त्याला प्रशिक्षण देणे ही काळाची गरज आहे आणि हे वेळीच ओळखणे आणि त्यामध्ये जास्तीत जास्त गुंतवणूक करणे अतिशय महत्त्वाचे आहे. कौशल्य विकास आणि प्रशिक्षणावर अतिशय मोठ्या प्रमाणात भर दिलेला असूनही अद्यापही कुशल मनुष्यबळाची कमतरता भासत आहे.***

अल्प दरात उपलब्ध होणारे मनुष्यबळ आणि मोठ्या प्रमाणावर असलेल्या गुणवत्तेचा साठा या बाबींचा भारताला मिळणारा फायदा यामुळे ज्ञानाधारित समाज म्हणून जागतिक पातळीवरील आपले स्थान आणि स्पर्धात्मकता याकडे भारत स्पष्ट निर्देश करत आहे. २०३० पर्यंत एक अब्ज भक्कम मनुष्यबळाची उपलब्धता असलेले स्थान होण्यासाठी देश सज्ज झाला असताना शिक्षण आणि प्रशिक्षण हे अतिशय महत्त्वाचे घटक असून भविष्यकालीन प्रगती आणि आर्थिक विकासाला गती देण्यासाठी आवश्यक असलेल्या धोरणात्मक गरजा आहेत. एक अतिशय ताकदवान सेवा उपलब्ध करून देणारी अर्थव्यवस्था असल्याने उपलब्ध मनुष्यबळाला कुशल बनवणे व त्याला प्रशिक्षण देणे ही काळाची गरज आहे आणि हे वेळीच ओळखणे आणि त्यामध्ये जास्तीत जास्त गुंतवणूक करणे अतिशय महत्त्वाचे आहे. कौशल्य विकास आणि प्रशिक्षणावर अतिशय मोठ्या प्रमाणात भर दिलेला असूनही अद्यापही कुशल मनुष्यबळाची कमतरता भासत आहे. म्हणूनच देशाच्या एकंदर विकासप्रक्रियेत मानव विकासाला सातत्याने महत्त्व प्राप्त होत जाणार आहे.

२०२५ पर्यंत भारतीय लोकसंख्या जागतिक मनुष्यबळामध्ये ३५ टक्के योगदान देईल, असा अंदाज आहे. ही एक प्रचंड मोठी अशी पूंजी आहे आणि ती आपल्या सर्वात मोठ्या सामर्थ्याचे प्रतिनिधीत्व करते. आपल्या क्षमतेचा पूर्ण ताकदीने वापर करण्यासाठी व आपली मोहीम फत्ते करण्यासाठी याचा आपण फायदा घेतला पाहिजे. आपल्यासाठी जमेची बाजू असलेल्या या लोकसंख्याविषयक बाबीचा पुरेपूर फायदा घेण्यासाठी आपल्याला कौशल्य विकास आणि रोजगार निर्मितीविषयक मोठी चळवळ उभारावी लागेल. गेल्या वर्षी जुलै महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १५०० कोटी रुपये खर्चाची 'स्किल इंडिया' योजना सुरू केली. २०२२ पर्यंत सुमारे ४० कोटी लोकांना विविध प्रकारच्या कौशल्याचे प्रशिक्षण देण्याचे या योजनेचे उद्दिष्ट आहे. या मोहिमेअंतर्गत राष्ट्रीय कौशल्य विकास मोहीम, कौशल्य विकास व उद्यमशीलताविषयक राष्ट्रीय धोरण- २०१५, प्रधानमंत्री कौशलविकास योजना आणि कौशल्य

विकास ऋण योजनेचा समावेश आहे. नि:संशयपणे कौशल्य विकासावर मोठ्या प्रमाणावर भर दिला जात असला तरीही २०२२ पर्यंत तब्बल ५० कोटी इतक्या विशाल लोकसंख्येला कुशल बनवण्याची महाकाय कामगिरी आपण कशा प्रकारे करणार आहोत याविषयी मात्र अद्याप चित्र स्पष्ट झालेले नाही.

११व्या पंचवार्षिक योजनेपूर्वी भारताने कौशल्यविकासावर भर दिला नव्हता. त्यामुळे कौशल्य विकासासंदर्भात मोठी दरी निर्माण झाली होती. भारताच्या वेगाने होणाऱ्या विकासामुळे कुशल मनुष्यबळाची मागणी एकीकडे दसपटीने वाढली असताना देशाच्या सर्व क्षेत्रांमध्ये असलेली कुशल मनुष्यबळाची कमतरता अधोरेखित झाली. रोजगाराची कमतरता ही आपल्यासाठी प्रमुख समस्या नसून अतिशय वेगाने विस्तारणाऱ्या उद्योगाच्या वेगाशी ताळमेळ साधू शकेल अशी रोजगारक्षम, कुशल गुणवत्तेची कमतरता ही आपली प्रमुख समस्या आहे. दरवर्षी भारतीय बाजारपेठेत प्रवेश करणाऱ्या ३० लाख पदवीधरांपैकी केवळ ५ लाख पदवीधर रोजगारक्षम मानले जातात. माहिती तंत्रज्ञान, बीएफएसआय, आरोग्यनिगा, पायाभूत सुविधा, किरकोळ, वाहन उद्योग आणि ग्राहकोपयोगी उत्पादनक्षेत्र आणि इतर विविध क्षेत्रांना कुशल मनुष्यबळाची कमतरता मोठ्या प्रमाणावर भेडसावत आहे.

अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या एका आकडेवारीनुसार प्रत्येक १० प्रौढ व्यक्तींपैकी केवळ एखाद-दुसऱ्या व्यक्तीला एखाद्या प्रकारचे व्यावसायिक प्रशिक्षण मिळाले होते. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यालयाने या वर्षाच्या सुरुवातीला त्यांच्या शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षणविषयक पाहणीसंदर्भातील २०११-१२ चा अहवाल प्रसिद्ध केला होता. त्यात असे दिसून आले की १५ ते ५९ या वयोगटातील केवळ २.२ टक्के व्यक्तींनी औपचारिक व्यावसायिक प्रशिक्षण घेतले असल्याची माहिती दिली होती तर केवळ ८.६ टक्के व्यक्तींनी अनौपचारिक व्यावसायिक प्रशिक्षण घेतले असल्याचे सांगितले. अधिक

***कुशल मनुष्यबळाची मागणी एकीकडे दसपटीने वाढली असताना देशाच्या सर्व क्षेत्रांमध्ये असलेली कुशल मनुष्यबळाची कमतरता अधोरेखित झाली. रोजगाराची कमतरता ही आपल्यासाठी प्रमुख समस्या नसून अतिशय वेगाने विस्तारणाऱ्या उद्योगाच्या वेगाशी ताळमेळ साधू शकेल अशी रोजगारक्षम, कुशल गुणवत्तेची कमतरता ही आपली प्रमुख समस्या आहे. दरवर्षी भारतीय बाजारपेठेत प्रवेश करणाऱ्या ३० लाख पदवीधरांपैकी केवळ ५ लाख पदवीधर रोजगारक्षम मानले जातात.***

काय तर २००४-०५ ते याविषयीची माहिती शेवटी ज्या वर्षात घेतली त्या २०११-१२ या वर्षापर्यंत व्यावसायिक प्रशिक्षणाच्या दरात नगण्य वाढ झाली. २००९ मध्ये तत्कालीन संपुआ सरकारने महत्वाकांक्षी राष्ट्रीय कौशल्य विकास धोरणाची घोषणा केली होती आणि त्यापूर्वी राष्ट्रीय कौशल्य विकास समन्वय परिषदेची स्थापना केल्यानंतरही ही परिस्थिती होती. जगामध्ये (१५-५९ वर्षे) या कार्यक्षम वयोगटातील दुसऱ्या क्रमांकाची लोकसंख्या भारतात असल्याने, या लोकसंख्येसाठी कौशल्य विकासाचा संच देशाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वाचा आहे. या वयोगटाला विधायक बनवण्यासाठी योग्य प्रकारचे कौशल्य प्रशिक्षण उपलब्ध करणे अत्यावश्यक आहे.

सध्याच्या व्यावसायिक शिक्षणामध्ये बदल होत आहे. पूर्वीच्या केवळ कल्याणकारी दृष्टीकोनातून पुरवठा करण्याच्या प्रकाराऐवजी मागणीच्या आधारे प्रशिक्षणावर भर दिला जात आहे. अनेक महत्त्वाकांक्षी कौशल्य विकास कार्यक्रमांच्या माध्यमातून खाजगी क्षेत्राने भारतातील कौशल्यविषयक वातावरणामध्ये एक महत्त्वाची भूमिका बजावणे गरजेचे आहे. एक प्रमुख रोजगारनिर्मितीकारक आणि रोजगारदाता म्हणून कौशल्य विकास कार्यक्रमाचा दर्जा, पातळी आणि शाश्वती यावर प्रभाव टाकण्याची क्षमता खाजगी क्षेत्रामध्ये आहे. या कार्यक्रमांचा रोजगारनिर्मिती व चरितार्थ यांच्याशी केवळ औपचारिकच नव्हे तर अनौपचारिक कौशल्य विकास क्षेत्राशी ताळमेळ साधण्याचीही त्यांची क्षमता आहे. मात्र, केवळ काही उद्योगांचा अपवाद वगळता खाजगी क्षेत्राने या दिशेने प्रयत्न केलेले नाहीत आणि त्यांना जेवढी आवश्यकता आहे तेवढ्या प्रमाणात आपल्या मनुष्यबळाला कुशल करण्यामध्ये आणि प्रशिक्षित करण्यामध्ये गुंतवणूक केलेली नाही. जगभरातील बहुतेक देशांमध्ये जिथे व्यावसायिक

कौशल्याला जास्तीत जास्त स्वीकारले जाते त्या ठिकाणी उद्योगांनी केवळ वैयक्तिकरित्या नव्हे तर सामुदायिक पद्धतीने कौशल्य विकासात मोठे योगदान दिले आहे.

खाजगी क्षेत्र एक कार्यक्षेत्र म्हणून अनेक प्रकारची भूमिका निभावत असते. विशषेत: कुशल मनुष्यबळाचा एक ग्राहक म्हणून, दर्जेदार ज्ञानाचा ना नफा तत्वावरील पुरस्कर्ता किंवा नफा तत्वावरील उद्योगांना शिक्षण उपलब्ध करणारे माध्यम अशा अनेक भूमिका असतात.

त्यापैकी एक ग्राहक या पहिल्या भूमिकेतून खाजगी क्षेत्र उपलब्ध मनुष्यबळाला योग्य प्रकारचे कौशल्य देऊन आणि त्यानंतर लगेचच रोजगार उपलब्ध करून देऊन फायदा मिळवू शकते. ना नफा तत्वावरील पुरस्कर्ता म्हणून बडे व्यावसायिक उद्योग समाजाला निधी आणि गुंतवणुकीच्या द्वारे मदत करू शकतात. तर एक नफा तत्वावरील उद्योग म्हणून काही प्रमाणात खर्च करून शाळा, प्रशिक्षण संस्था आणि विद्यापीठे यांच्यासारख्या संस्थांच्या उभारणीद्वारे शिक्षण व प्रशिक्षण उपलब्ध करू शकतात.

भारतातील कौशल्यविकासाच्या परिदृश्यावर खाजगी क्षेत्र अनेक प्रकारे सकारात्मक परिणाम दाखवू शकते.

**उद्योगांच्या मागणीचे भाकित:** या ठिकाणी उद्योगांना आवश्यक असलेल्या मनुष्यबळाची मागणी लक्षात घेऊन अतिशय कुशल अशा मनुष्यबळाचा पुरवठा करण्याची खाजगी क्षेत्राची क्षमता समोर येते. खाजगी क्षेत्र विविध प्रकारच्या रोजगारांची निर्मिती करत असते. त्यामध्ये मासिक वेतनाच्या आधारे, कंत्राटी तत्वावरील, रोजंदारीवरील रोजगारांचा समावेश असतो. त्याच प्रकारे त्यांना सामावूनही घेत असते. उद्योगांना लागणाऱ्या मनुष्यबळाच्या गरजेचे भाकित त्यांना करता येऊ शकते आणि त्यांची मागणी पूर्ण करण्यासाठी प्रशिक्षित, रोजगारक्षम, कुशल मनुष्यबळाचा साठा नेहमीच मोठ्या प्रमाणावर उपलब्ध राहिल याची खातरजमा करू शकते. कामाचे स्वरूप, रोजंदारी, ठिकाणे आणि आकारमान यांची खाजगी क्षेत्राच्या माध्यमातून

***एक प्रमुख रोजगारनिर्मितीकारक आणि रोजगारदाता म्हणून कौशल्य विकास कार्यक्रमाचा दर्जा, पातळी आणि शाश्वती यावर प्रभाव टाकण्याची क्षमता खाजगी क्षेत्रामध्ये आहे. या कार्यक्रमांचा रोजगारनिर्मिती व चरितार्थ यांच्याशी केवळ औपचारिकच नव्हे तर अनौपचारिक कौशल्य विकास क्षेत्राशी ताळमेळ साधण्याचीही त्यांची क्षमता आहे. मात्र, केवळ काही उद्योगांचा अपवाद वगळता खाजगी क्षेत्राने या दिशेने प्रयत्न केलेले नाहीत***

उपलब्ध झालेली विशिष्ट माहिती प्रशिक्षण देणाऱ्यांना त्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाची त्यानुसार आखणी करण्यासाठी व उद्योगांना त्यांच्या मागणीनुसार कुशल/तज्ञ मनुष्यबळ पुरवण्यासाठी उपयुक्त ठरू शकते. त्यामुळे रोजगार आणि कौशल्य यातील फारकत कमी होऊ शकेल.

**दर्जा व उद्योगांचे मापदंड निश्चिती:** सध्याच्या रोजगारांमध्ये असलेली कौशल्याची उणीव लक्षात आणून देण्यामध्ये आणि राष्ट्रीय व्यवसाय दर्जा(एनओएस) च्या माध्यमातून सध्याच्या रोजगारांबरोबरच नव्या रोजगारातील भूमिकांचा विकास करण्यामध्ये व त्यांना वैधता देण्यामध्ये खाजगी क्षेत्र मोलाचे योगदान देऊ शकते.

**प्रशिक्षण उपलब्धकर्त्यांबरोबर धोरणात्मक भागीदारी:** सगळ्याच खाजगी कंपन्यांचे संपर्कक्षेत्र, माहिती आणि अंतर्गत तज्ञांना प्रशिक्षित करण्याची क्षमता पुरेशी असतेच असे नाही. त्यांना स्वत:चे असे प्रशिक्षण कार्यक्रम तयार करणे आणि त्यांचा विकास करणे शक्य होत नाही. अशा कंपन्यांनी त्यांना आवश्यक असे मनुष्यबळ मिळवण्यासाठी प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांशी भागीदारी केली पाहिजे आणि त्यांची मनुष्यबळविषयक गरजेची पूर्तता करण्याबरोबरच, गरज लागताक्षणी उपलब्ध मनुष्यबळाची सज्जता निर्माण केली पाहिजे.

**कामाचे प्रशिक्षण आणि पाठ्यवेतन (ॲप्रेंटिसशिप) यांसाठी उद्योगांना प्रवृत्त करणे:** कोणत्याही निवड केलेल्या कौशल्य आधारित उच्च पातळीच्या कामासाठी त्या कामाचा प्रत्यक्ष अनुभव आणि तशा वातावरणाची सवय महत्वाची ठरत असल्याबाबत आता जागरुकता वाढत आहे त्यामुळे प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळवून देण्यासाठी खाजगी क्षेत्रांनी प्रत्यक्ष प्रशिक्षण आणि पाठ्यवेतनाच्या अधिकाधिक संधी खुल्या केल्या पाहिजेत.

**सीएसआर निधी कौशल्य विकास कार्यक्रमाच्या दिशेने वळवणे:** व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षणामध्ये गुंतवणूक करण्यासाठी आवश्यक

असलेला निधी खाजगी क्षेत्राकडे आहे. सीएसआर अर्थात कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्वामध्ये निर्धारित केलेल्या २ टक्के निधीच्या माध्यमातून कंपन्यांनी कौशल्य विकास कार्यक्रमामध्ये योग्य त्या प्रमाणात गुंतवणूक केली पाहिजे.

**प्रशिक्षणविषयक पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक :** प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांबरोबर भागीदारीच्या माध्यमातून कॉर्पोरेट कंपन्या कौशल्य विकास कार्यक्रमासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान, अध्यापनशास्त्र यांच्यासह विविध घटकांसाठी निधीचा पुरवठा करू शकतात आणि इतर पूरक मदत करू शकतात. काही वेळा अतिशय महागड्या असू शकणाऱ्या विशिष्ट प्रकारच्या प्रशिक्षण प्रयोगशाळा/ साहित्य यांच्यासाठी देखील कॉर्पोरेट कंपन्या निधी/ अनुदान देऊ शकतात.

क्षेत्र कौशल्य परिषदा(एसएससी), प्रशिक्षण उपलब्धकर्ते, औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) आणि सरकारी संस्था यांच्याशी धोरणात्मक भागीदारी करून खाजगी क्षेत्र कोणत्याही कौशल्य विकासविषयक उपक्रमांच्या यशावर लक्षणीय प्रभाव टाकू शकते.

मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असलेल्या सेवांच्या आधारावरील अर्थव्यवस्था म्हणून होणाऱ्या आपल्या विकासाचा फायदा दर्जेदार मनुष्यबळाचे भांडवल या साधनाच्या मदतीने घेण्यासाठी कुशल मनुष्यबळ जवळ असण्याचे महत्त्व वेळीच लक्षात घेणे गरजेचे आहे. कौशल्य आणि शिक्षण, शिकणाऱ्याची रोजगारक्षमता वाढवते. प्राप्त केलेल्या ज्ञानामुळे कामगार राष्ट्रीय पातळीवरील उत्पादनक्षमता वाढवून भारताचे स्पर्धात्मक सामर्थ्य निश्चित करण्यामध्ये योगदान देऊ शकतात. विविध प्रकारच्या सुधारणा, धोरणांमधील बदल आणि सुधारित आर्थिक आराखडे यांच्या माध्यमातून देशाला ज्ञानाचे भांडार बनवण्यासाठी सरकार अथक परिश्रम करत आहे, त्याच वेळी या प्रयत्नांमध्ये खाजगी क्षेत्राची भूमिका व सहभाग अतिशय महत्त्वाचा ठरणार आहे आणि सरकारच्या महत्त्वाकांक्षी कौशल्य विकास कार्यक्रमाला कॉर्पोरेट क्षेत्राचे अशाच प्रकारच्या प्रयत्नांचे पाठबळ मिळाले पाहिजे. सरकारच्या या महत्त्वाच्या कार्यक्रमांमध्ये खाजगी क्षेत्राने अतिशय सक्रिय भूमिका घेत भागीदारी केली पाहिजे. आपल्या लोकसंख्येच्या पाठबळामुळे जगाला मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचे मोठे सामर्थ्य आपल्याला प्राप्त होऊ शकते. पण हे केवळ तेव्हाच शक्य आहे जेव्हा या दृष्टीकोनातून खाजगी क्षेत्र आणि सरकारची भागीदारी होऊ शकते. आपल्याला खूप दूरवरचा पल्ला गाठायचा आहे पण एकत्रितरित्या आपण या दुबळेपणाचे रूपांतर भारतासाठी मोठे सामर्थ्य व यशामध्ये करू शकतो.

■ ■ ■

*लेखक 'जेनपॅक्ट' चे संस्थापक अध्यक्ष असून अमेरिका, इग्लंड, भारत आणि आशिया मधील वित्तीय सेवा, तंत्रज्ञान आणि बीपीओ या क्षेत्रांमध्ये त्यांनी काम केले आहे.*

*email: zorema.darkim@skillsacademy.co.in*




विकास समर्पित
मासिक

**योजना**

नियमित वाचा,
वर्गणीदार व्हा.

# राजनैतिक सुज्ञपणा आणि सर्वंकश विकास

अचल मल्होत्रा



***अनेकविध कार्यक्रमांमध्ये भारतामध्येच माल उत्पादित करणे, कौशल्यपूर्ण भारत, आदर्श शहरे, पायाभूत सुविधांचा विकास, डिजीटल भारत तसेच स्वच्छ भारत अभियान यांचा उल्लेख प्रामुख्याने करावा लागेल. वर वर पाहता हा देशांतर्गत कार्यक्रमाचा भाग वाटतो, परंतु प्रत्यक्षात मात्र यामध्ये विदेशी भागीदारी थेट परकिय गुंतवणूक, आर्थिक मदत, तंत्रज्ञानाची देवघेव इत्यादी गरज भासणार आहे. यावरच हा कार्यक्रम यशस्वी होऊ शकतो.***

मे २०१४ मध्ये या विद्यमान सरकारने पदभार स्विकारला आणि दिर्घकालीन उपाययोजनांचा भाग म्हणून नवनवीन घोषणांचा जणू सपाटाच लावला. या अनेकविध कार्यक्रमांमध्ये भारतामध्येच माल उत्पादित करणे, कौशल्यपूर्ण भारत, आदर्श शहरे, पायाभूत सुविधांचा विकास, डिजीटल भारत तसेच स्वच्छ भारत अभियान यांचा उल्लेख प्रामुख्याने करावा लागेल. वर वर पाहता हा देशांतर्गत कार्यक्रमाचा भाग वाटतो, परंतु प्रत्यक्षात मात्र यामध्ये विदेशी भागीदारी थेट परकिय गुंतवणूक, आर्थिक मदत, तंत्रज्ञानाची देवघेव इत्यादी गरज भासणार आहे. यावरच हा कार्यक्रम यशस्वी होऊ शकतो. आपल्या मुस्सदेगिरीनी आव्हानांमध्ये वृद्धी होताना दिसते आहे. या करीता आपल्याला नव्याने अभिमुख व्हावे लागेल. आपल्या परदेशी धोरणामध्ये, जे नूतन बदल केले आहेत, त्यामुळे आता ते अधिक गतिशील, फलदायी, राजकीय दृष्टया सर्व समावेशक, आर्थिक तसेच सांस्कृतीक राजनितीयुक्त विकास केंद्रस्थानी ठेवून तयार केले आहे. यापुढील झोत हा विदेशी वातावरण निर्माण करण्यात गतिशील व अनुकूल अशा अंतर्गत विकासावर राहणार आहे.

यामागची भूमिका अशी की, देशांतर्गत हितसंबंध लक्षात घेऊन विदेशी पुढाकारांचे संकलन करणे. यापुढे जाऊन जो काही पुढाकार घेतलेला आहे त्याचे रूपांतर अविश्वासाचे सावट दूर करून विशेषत: शेजारधर्म पाळून, मैत्रीचे पूल बांधून सोया विश्वात सहकार्याच्या भावनेतून समस्या जाणून घेऊन भारताच्या भूमिकेचा विस्तार करून शेवटी जागतिक वातावरणात एक प्रभावशाली घटक या नात्याने दृष्य स्वरूपात आपल्याला ठामपणे पाऊले टाकत आपले महत्व सिद्ध करायचे आहे.

भारताने राजकिय, आर्थिक, राजनैतिक मार्गांवर पुढाकार घेतला आहे. भारताच्या या दूरदृष्टीला एक आंतरराष्ट्रीय भागीदार म्हणून खूप चांगला प्रतिसाद लाभत आहे. खाली उल्लेख केलेली यादी ही प्रातिनिधीक स्वरूपाची आहे. सर्वच गोष्टी यात समाविष्ट नाहीत. परंतु यातून भरीव असे काही निश्चितपणे निर्माण होईल.

**पायाभूत सुविधा आणि वित्तपुरवठा**

गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात आपल्या पंतप्रधानांनी दुबईला भेट दिली. त्यावेळी संयुक्त अरब - भारत पायाभूत गुंतवणूक निधी यांनी भारतातील पायाभूत सुधारणा योजनांसाठी ७५ बिलीयन डॉलर इतकी गुंतवणूक निश्चित करून भारताच्या जलदगती वाढीव भविष्यकालीन योजनेसाठी भारताच्या 'नॅशनल इफ्रास्ट्रक्चरल निधीसाठी' इग्लंड व भारताने संयुक्त भागीदारीने

निधी स्थापन केला आणि अनेक योजना एका छत्राखाली आणण्याचा प्रयत्न केला. भारतीय रेल्वेला विशेष करून रस्त्यांना परकीय भागीदाऱ्यांचा तसेच विदेशी सहाय्यतेचा लाभ होताना दिसत आहे. पूर्वोत्तर राज्यांमध्ये रस्त्यांचे जाळे विणण्याकरीता जपान सारख्या देशाने कर्ज देण्याची तयारी दाखवली आहे. जपानच्या सहाय्याने भारतात मुंबई आणि अहमदाबाद या शहरांदरम्यान अतिजलद रेल्वेमार्ग (बुलेट ट्रेनसाठी) बांधला जाणार असून हे अंतर सात ऐवजी फक्त दोन तासात कापले जाईल. जपानने याचाच एक भाग म्हणून कर्जाची व्याप्ती वाढवून या शहरांकरीता १०० बिलीयन येन (ओव्हरड्राफ्ट) ॲडव्हांस कर्ज देण्याचे ठरवले आहे.

महाराष्ट्रातील नागपूर येथील दुसऱ्या टप्प्यातील मेट्रो प्रकल्पाकरीता फ्रान्स अर्थ सहाय्य करणार आहे. त्याचप्रमाणे बेंगलोर आणि नागपूर मेट्रो प्रकल्पांकरीता जर्मनी हा देश प्रत्येकी ५०० मिलीयन युरो अर्थसहाय्य देणार आहे. रेल्वे प्रकल्पाकरीता, भारत व चीन सहकार्य वृद्धी करू इच्छितात. यामध्ये नियोजित प्रकल्प असा की, सध्याच्या या मार्गावरील गाडयांची गती वाढवणे. फ्रान्सची अलस्टॉम बिहार मधील माधेपुरा येथे विद्युत लोकोमोटीव्ह प्रकल्पाची उभारणी करणार आहे. या प्रकल्पामध्ये ३.२ बिलीयन युरो इतकी गुंतवणूक होणार आहे. रेल्वेच्या पायाभूत सुविधांसाठी अर्थसहाय्य देण्याकरीता पहिल्यांदाच लंडन येथे रूपी Demoniated bond चे काम प्रगतीपथावर आहे.

**मेक इन इंडिया अर्थात भारतातच उत्पादन करा**

भारताने चालविलेल्या विदेशी गुंतवणूकीच्या प्रयत्नांना चांगलेच यश मिळत असून चळवळ प्रभावशाली दिसते आहे. KA२२६ हेलीकॉप्टर भारतातच तयार करण्याकरीता रशियाने मान्यता दिली आहे. 'भारतातच उत्पादन करा' या चळवळीला अनुसरून हे आहे. त्याचप्रमाणे अणुऊर्जा प्रकल्पबांधणीची शृंखलाही ते याच प्रकारे येथे उभारू इच्छितात. रशियाची रोसएॅटोम Rosatom आणि भारताचे अणूऊर्जा खाते यांनी स्थानिक प्रकल्पांसाठी कार्यक्रम निश्चिती केली आहे. आपल्याकडील एल ॲण्ड टी व फ्रान्सची अरेवा या कंपन्यांनी जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पासाठी तंत्रज्ञान आदानप्रदान प्रक्रिया निश्चीत केली आहे. एअरबस (Airbus) आणि टाटा या कंपन्यांनी C२९५ या हॅलीकॉप्टरची संयुक्तपणे निर्मिती करण्याचे योजले आहे. याच एअरबसने महिंद्रा कंपनीबरोबर देखील हॅलीकॉप्टर निर्मितीसाठी प्राथमिक स्थितीतील करार केला आहे. AH६४ अपाचे हॅलीकॉप्टरसाठी बोईंग आराखडा तयार करणार आहे. भारत आणि जपानने १२ बिलीयन डॉलर इतक्या रकमेचे अर्थसहाय्यासाठी संघटित केले आहे. मारूती जपानला निर्यात करण्यासाठी भारतात कारची निर्मिती करणार आहे.

***पूर्वोत्तर राज्यांमध्ये रस्त्यांचे जाळे विणण्याकरीता जपान सारख्या देशाने कर्ज देण्याची तयारी दाखवली आहे. जपानच्या सहाय्याने भारतात मुंबई आणि अहमदाबाद या शहरां दरम्यान अतिजलद रेल्वेमार्ग (बुलेट ट्रेनसाठी) बांधला जाणार असून हे अंतर सात ऐवजी फक्त दोन तासात कापले जाईल. जपानने याचाच एक भाग म्हणून कर्जाची व्याप्ती वाढवून या शहरांकरीता १०० बिलीयन येन (ओव्हरड्राफ्ट) ॲडव्हांस कर्ज देण्याचे ठरवले आहे.***

**विदेशी गुंतवणूक -**

सृजनशील अशा भारतीय अर्थव्यवस्थेत राजनैतिक चळवळीच्या आत्मविश्वासाचे प्रतिबिंब पडलेले दिसते. अनेक महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी सन २०१५ मध्ये थेट परकीय गुंतवणूकीसाठी सुमारे ४०% वृद्धी नोंद झाली आहे. भारतीय आणि चीनमधील कंपन्यांनी केलेल्या सामंज्यसाच्या कराराची आकडेवारी २२ बिलीयन डॉलर इतकी आहे. भारत आणि इग्लंडमधील खाजगी क्षेत्रातील कंपन्यांनी केलेल्या डिल्सची रक्कम ९.२ बिलीयन ब्रिटीश पाऊंड इतकी आहे. यामध्ये वोडाफोन ने आश्वस्त केलेल्या १.३ बिलीयन पाऊंड्सचा समावेश आहे. पायाभूत प्रकल्प आणि स्मार्ट शहरे याकरीता पुढील ५ वर्षात जपानने ३५ बिलीयन डॉलर्स इतकी रक्कम देऊ केली आहे. दक्षिण कोरीयाने आश्वस्त केलेली रक्कम आहे १० बिलीयन डॉलर्स. यातील १ बिलीयन डॉलर्स आहेत आर्थिक विकास महामंडळ फंड व निधीसाठी आणि उरलले ९ बिलीयन डॉलर्स प्राधान्य क्षेत्रातील उद्योगांच्या निर्यातीसाठी. उदा. रेल्वे, वीजनिर्मिती व वहन इ.साठी. जर्मनीमधील महाकाय बॉश या कंपनीने १०० बिलीयन ब्रिटीश पाऊंड इतक्या गुंतवणूकीचे तीन प्रकल्प भारतात उभारण्याची घोषणा केलेली आहे.

**स्मार्ट शहरे**

भारतातील स्मार्ट शहरातील निर्मितीसाठी अनेक आंतरराष्ट्रीय भागीदारांनी मदतीचा हात पुढे केला आहे. यामध्ये अमेरिकेने अहालाहाबाद, अहमदाबाद, विशाखापट्टणम या शहरांच्या विकासासाठी करार केले आहेत. याच उद्देशाने फ्रांस ने २ बिलीयन युरो इतकी गुंतवणूक करून पाँडेचरी, चंडीगड व नागपूर या शहरांसाठी वचन दिले आहे.

**डिजिटल भारत आणि कौशल्यपूर्ण भारत**

मायक्रोसॉफ्ट व गुगल या सारख्या महाकाय बहुराष्ट्रीय कंपन्यांनी डिजिटल भारतासाठी महत्वपूर्ण योगदान देण्याचे मान्य केले आहे. अमेरिका, बिटन, जर्मनी कॅनडा, जपान, सिंगापूर, मलेशिया अशा पुढारलेल्या देशांनी कौशल्यपूर्ण भारतासाठी महत्वपूर्ण योगदान देण्याचे मान्य केले आहे.

**स्वच्छगंगा**

स्वच्छगंगा प्रकल्पासाठी जपान व जर्मनी यांनी आर्थिक सहाय्य, अनुभवी सल्ला तसेच तंत्रज्ञान देऊ केले आहे.

**ऊर्जा सुरक्षा**

स्वच्छ ऊर्जेच्या पुरवठयाकरीता ऊर्जाक्षेत्रातील भागीदारीवर विशेष झोत टाकण्यात आला आहे. याकरीता राजनैतिक प्रयत्न चालू आहे. यातील एक मैलाचा दगड ठरला तो म्हणजे भारताच्या पुढाकाराने १०० देशांनी आंतरराष्ट्रीय सौर ऊर्जेसाठी केलेली भागीदारी. याला पाश्वभूमी होती ती म्हणजे डिसेंबर महिन्यात पॅरीस येथे झालेल्या हवामान परिषदेची. या प्रकल्पाच्या सचिवालयासाठी भारताने हरियाणा येथील गुरगाव येथे जमीन देऊ केली आहे. त्याच बरोबर ३० मिलीयन डॉलरचे भरीव अर्थसहाय्य या प्रकल्पाच्या पायाभूत सुविधांकरीता देण्याचे ठरविले आहे. 'नागरी ऊर्जा सहकार्य करार' या करीता व्यापक प्रयत्न केले गेले आहेत. भारतात विविध ठिकाणी आणि अणू ऊर्जा प्रकल्पासाठी आपण प्रयत्नशील आहोत. या करीता लागणारे शुद्ध युरेनियम परदेशातून मिळविण्याकरीता प्रयत्न सुरू आहेत. स्वच्छ ऊर्जेचा वाटा वाढावा हाच हेतू त्यामागे आहे.

**जागतीक संदर्भात विश्वासाचा अभाव दूर करून मैत्रीपूर्ण साकव बांधण्याचे राजनैतीक प्रयत्न**

ही संकल्पना थोडी बाजुला ठेवून जगातील अत्यंत महत्वाच्या अशा दक्षिण आशिया, दक्षिण पूर्व आशिया, मध्य आशिया, पश्चिम आशिया, आखाती प्रदेश, अफ्रिका, प्रशांत आशिया इ. देशांमध्ये भारताने जागतिकीकरणाच्या योगात महत्वपूर्ण असे राजनैतिक प्रयत्न केले आहेत. भारत हा महत्वपूर्ण देश आहे आणि म्हणून प्रादेशिक संघटनांमध्ये उदा. एशियन्स, EAS, NAM, G-20, Bricks, SCO आदीशी बांधिलकी जपली आहे. या सर्व संघटनांसह संयुक्त राष्ट्र संघटनेमध्ये भारत चांगलाच सक्रिय आहे.

***'शेजाऱ्यास प्राधान्य' हा आपल्या राजनैतिक मोहीमेचा मंत्र आहे. विद्यमान पंतप्रधानांनी पदभार स्विकारण्याच्या आधीपासूनची ही आपली भूमिका आहे. मे २०१४ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शपथ ग्रहण सोहळयाला सार्क देशांच्या राष्ट्रप्रमुखांनी हजेरी लावली. आपल्या दृष्टीने ती उत्तम संधी होती. त्यामुळे नविन राजकिय समीकरणे उदयाला आली आहेत. त्याचबरोबर भारत ज्या तऱ्हेचे संबंध शेजारील राष्ट्रांशी प्रस्थापित करू इच्छित होता त्याला पुष्ठी मिळाली आहे.***

'शेजाऱ्यास प्राधान्य' हा आपल्या राजनैतिक मोहीमेचा मंत्र आहे. विद्यमान पंतप्रधानांनी पदभार स्विकारण्याच्या आधीपासूनची ही आपली भूमिका आहे. मे २०१४ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शपथ ग्रहण सोहळयाला सार्क देशांच्या राष्ट्रप्रमुखांनी हजेरी लावली. आपल्या दृष्टीने ती उत्तम संधी होती. त्यामुळे नविन राजकिय समीकरणे उदयाला आली आहेत. त्याचबरोबर भारत ज्या तऱ्हेचे संबंध शेजारील राष्ट्रांशी प्रस्थापित करू इच्छित होता त्याला पुष्ठी मिळाली आहे. याचा अजून एक चांगला परिणाम झाला की, सुरूवातीच्या काळात आपण जे संबंध प्रस्थापित केले व या निमित्ताने पुढील काळात बैठका, आंतरराष्ट्रीय परिषदा इ.मध्ये भेटीगाठी होऊन हेच संबंध दृढ झाले. पाकिस्तानच्या बाबतीत तर ही एक उपयुक्त संधी ठरली. दोन्ही देशातील खुंटलेली बोलणी पुन्हा सुरू झाली. याचा सारांश इतकाच की भारताच्या 'शेजाऱ्यास प्राधान्य' या संकल्पनेचे वर्णन अतिशय समाधान देणारे असेच करावे लागेल. बांगलादेश व भूतान यांच्याशी आपले संबंध स्थिर तसेच उन्नत आहेत. ४०९६ कि.मी क्षेत्राचा भारत व बांगलादेश यांच्यात झालेला करार हा फक्त हद्दीबद्दलचाच नसून सीमाक्षेत्रातील व्यवस्थापनाचा एक परिणामकारक नमूना म्हणूनही त्याकडे पाहता येईल. यामध्ये विशेषत: अवैध घुसखोरी, तस्करी यावर परिणामकारक उपाय योजता येणार आहेत. सुमारे ५० हजार निर्वासितांना जे सिमेभोवती १६१ विभागात विखुरलेले होते त्यांना आता स्वतंत्र राष्ट्रीय ओळख मिळाली आहे.नेपाळचे भारताबद्दलचे अविश्वासाचे/मतभेदांचे प्रमाण कमी झाले आहे. लंका व मालदीव बरोबरचे संबंध नव्याने करणे शक्य झाले आहे. अफगाणिस्तान बरोबरची धोरणात्मक भागीदारी नव्याने उदयाला येत आहे. खेदाची बाब अशी की भारताने अनेकवेळा लवचीक धोरण अवलंबवून सुद्धा पाकिस्तान बरोबरचे संबंध दृष्य स्वरूपात विशेष प्रगती करू शकलेले नाहीत किंवा तशी नोंदही दिसत नाही. यातील आशादायक भाग असा की चर्चेचे दरवाजे पूर्णपणे बंद झालेले नाही, चर्चेच्या

खिडक्या उघडया दिसतात. आपण अशी आशा करू शकतो की भविष्यात यातून काही सकारात्मक निर्माण होईल.

पंतप्रधान मोदींचे अमेरिका, चीन, इग्लंड, रशिया आणि फ्रान्स या देशांना भेटी देणे चालू आहेत. या ५ देशांशी असलेल्या संबंधाना उत्तेजना मिळावी, आणि या देशांकडून होणाऱ्या सहकार्यशिलतेला गती प्राप्त व्हावी हा या भेटीमागे उद्देश आहे. मे २०१४ मे मध्ये भारतात झालेले सत्तांतर आणि त्यामुळे ओघाने आलेल्या प्रत्यक्षानुभवाद्वारे गेल्या डिसेंबर महिन्यात पंतप्रधानांनी दिलेली मॉस्को भेट या पार्श्वभूमीवर महत्त्वाची ठरेल. भारताचा समय प्रमाणित जुना मित्र देश अर्थात रशियाशी, पाश्चात्य देशांच्या मैत्री जाळात गुरफटल्यामुळे असलेले संबंध सैल होत होते. मात्र ही भेट रशिया विषयक धोरणात फक्त यशस्वी झाली नाही तर अधिकाधिक विश्वास आणि निष्ठा राखण्यात यशस्वी झाली. वाढत्या बहुध्रुवीय जगात गरजेची गोष्ट म्हणजे एकमेकांच्या मर्यादांचे आकलन झाले.

**ॲक्ट ईस्ट पॉलिसी**

१९९० च्या ही आधी निश्चिततेने मांडलेली `Look East Policy' ही ॲक्ट ईस्ट पॉलीसी बनवली आहे. भारताचे Asian शी महत्वपूर्ण संबंध मुख्यत: आर्थिक संबंध प्रस्थापित करण्यात भारताची नवी धोरणे प्रतिबिंबीत होतात. भारत एशियन विकास व तंत्रज्ञान विकासनिधीसाठी अधिक सहाय्य देण्यासाठी वचनबद्ध झाला आहे. भारताने ही रक्कम एक मिलीयन डॉलर वरून ५ मिलीयन डॉलर इतकी वाढवली आहे.

**बेटे -**

भारताच्या मुत्सद्देगिरीचे जलवेष्टित देश अर्थात मालदिव, लंका, सियाचिन, मॉरीशस या देशांवर सागरी सुरक्षितता आणि महासागरीय अर्थव्यवस्था या अनुषंगाने महत्वाचे परिणाम होत आहेत. एक प्रकारे चीनच्या सागरी सार्वभौम महत्वाकांक्षा धोरणाला प्रतिबंध करणारे धोरण अवलंबले जात आहे.

**आखाती प्रदेश आणि मध्य आशिया / मध्य पूर्व -**

***भारत व बांगलादेश यांच्यात झालेला करार हा फक्त हद्दीबद्दलचाच नसून सीमाक्षेत्रातील व्यवस्थापनाचा एक परिणामकारक नमूना म्हणूनही त्याकडे पाहता येईल. यामध्ये विशेषत: अवैध घुसखोरी, तस्करी यावर परिणामकारक उपाय योजता येणार आहेत. सुमारे ५० हजार निर्वासितांना जे सिमेभोवती १६१ विभागात विखुरलेले होते त्यांना आता स्वतंत्र राष्ट्रीय ओळख मिळाली आहे.नेपाळचे भारताबद्दलचे अविश्वासाचे/मतभेदांचे प्रमाण कमी झाले आहे.***

भारताच्या ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीतून हा महत्वपूर्ण प्रदेश आहे. अनेक भारतीयांचे तेथे वास्तव्य आहे. त्याचप्रमाणे अलिकडच्या काळातील सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्वाचे कारण असे की मुलतत्ववादी आणि हिंस्त्र अशा 'आयसिस' नामक संघटनेचा उदय. ऑगस्ट २०१५ तसेच एप्रिल २०१६ मध्ये माननीय पंतप्रधान यांच्या उपस्थितीत झालेल्या चर्चांध्ये अनुक्रमे युनाटेड अरब ऍमीरेट्स व सौदी अरेबिया येथे यावर भाष्य करण्यात आले. यु ए ई द्विस्तरीय संबंध तर प्रस्थापित केलेच त्याहीपेक्षा तो देश " धोरणात्मक भागीदार तीच गोष्ट सौदी अरेबियाची. तोही या क्षेत्रात मजबुत धोरणात्मक भागीदार बनला. संरक्षण सहाय्य, दहशतवादाशी सामना, सुरक्षितता त्याचबरोबर आखाती प्रदेशातील सागरी सुरक्षितता तसेच हिंद महासागरामधील सायबर सुरक्षा विशेषत: दहशतवाद्यांकडून होऊ घातलेला संभाव्य सायबर हल्ला इ. गोष्टीवर व्यापक भर देण्यात आला. त्याचबरोबर बौद्धिक दहशतवादासंबंधी बाबीवर भागीदारी करणे, मनी लॉंडरींग आणि दहशतवाद्यांना होणारा अर्थपुरवठा आदी गोष्टींवर संमती झाली.

**भारत आफ्रिका फोरम (ऑक्टोबर २०१५)**

अफ्रिका खंडातील ४१ देशांचे शासन प्रमुख, शासकीय प्रतिनिधी, नवी दिल्ली येथे प्रथमच एकत्रितरित्या जमले. या परिषदेमुळे एक उत्तम संधी उपलब्ध झाली. भूतकाळात आपण डोकावू शकलो. दिर्घ परंपरा असलेल्या संबंधांना उजाळा मिळाला आणि 'गतिशील व परिवर्तनशिल' असा द्वी संबंधांचा आराखडा तयार केला ज्या द्वारे अफ्रिका आणि भारत अधिकाधिक वर्षानुवर्षे, दशकानुदशके जवळ येतील. ''२०१५ च्या दिल्ली घोषणापत्राने'' अफ्रिका व भारत यांच्या संयुक्त भागीदारीला कोंदण लाभले. तेथील विकासाठी भारताने १० बिलीयन कर्ज घोषित केले आहे. ६०० मिलियन डॉलर्सची मदत देऊ केली आहे। त्याचप्रमाणे येऊ घातलेल्या ५ वर्षात ५०००० शिष्यवृत्त्यांची घोषणा केली आहे। अशा या पुढाकारामुळे अफ्रिकेमध्ये भारताच्या भूमिकेचा विस्तार तर होईलच पण आपला भक्कम असा ठसा तेथे उमटेल. आपल्या सद्भावनेमध्ये प्रचंड वाढ होईल त्याच बरोबर चीन वाढत्या जवळीकेला छेद देता येईल.

**बहुपक्षिय प्रतिक्रिया देताना**

बहुविध महत्वाच्या जागतिक संघटना बरोबरच्या घनिष्ठ संबंधामुळे जागतिक स्तरावर भारताची मान उंचावण्यास मदत

झाली आहे. या संघटनांमध्ये (UN), G-20, ASEAN, EAS, NAM, BRICKS, SCO आदींचा समावेश आहे. भारताच्या अविरत प्रयत्नामुळे उदा. दहशतवादाशी राष्ट्रीय स्तरावरचा सामना, जागतिक घडामोडीमध्ये बदल, हवामान बदल, पायरसी, आंतरजाल सुरक्षा, जागतिक व्यापारी वाटाघाटी इत्यादींचा आंतराष्ट्रीय घडामोडी वर महत्वपूर्ण प्रभाव दिसला असून जागतिकीकरणाचा आराखडाच बदलून गेला आहे. शांघाय सहकार्य संघटनेमध्ये (SCO) आपल्याला निरीक्षक सदस्य हा दर्जा बदलून संपूर्ण सदस्यत्व मिळाले आहे. आशिया पॅसिफिक मध्ये भारत एक महत्वाचा घटक आहे अशी स्पष्ट मान्यता मिळाली असून, APEC - एशिया पॅसीफिक इकॉनॉमिक कॉन्सील मध्ये सदस्यत्व मिळण्यासाठी स्पष्ट उल्लेख केला गेला आहे. अणू कार्यक्रमांतर्गत जागतिक अणू निर्यात नियंत्रण व्यवस्थेमध्ये भारताच्या सदस्यत्वाबद्दलचा पाठींबा म्हणजे MICR - मिसाइल टॅक्नोलॉजी कंट्रोल रेजिम मध्ये सदस्यत्व, न्युक्लीअर सप्लाय ग्रुप (NSG), ऑस्ट्रेलिया ग्रुप व वासेनर व्यवस्था आदींमध्ये भारताचा आवाज कधी नव्हे एवढा बुलंद झाला आहे. संयुक्तराष्ट्रां च्या विस्तारीत सुरक्षा परिषदेमध्ये भारताच्या कायम सदस्यत्वाच्या पाठींब्यासाठीच्या घोषणांनी उच्चांक गाठला आहे. आंतरराष्ट्रीय दहशतवादावर व्यापक अशा परिषदा घ्याव्यात यासाठी UNGA युएनजीए स्विकृत व्हावा यासाठी खूप असा पाठींबा मिळाला. ही भूमिका भारतानेच मांडली होती. भारताने योगदान दिलेल्या COP २१ च्या अंतिम मसुद्यांची जागतिक वाहव्वा झाली. न्याय्य हवामानाची कल्पना उचलून धरताना, याच्या अंतिम मुसद्यात भारताने सुचविलेल्या हवामान विषयक अर्थपुरवठा, तंत्रज्ञानाचे हस्तांतरण, सामुहिक पण वेगवेगळया जबाबदाऱ्या यांचा अंतर्भाव करण्यात आला. गेल्या वर्षीच्या जुलै महिन्यात रशियाच्या उफा या शहरात ७ व्या ब्रिक्स परिषदेच्या वेळी. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ‘दस कदम’ किंवा १० कलमी कार्यक्रम घोषित केला. ज्यामध्ये व्यापक अशा प्रादेशिक सहकार्याची कल्पना मांडली आहे ज्यामध्ये ट्रेडफेअर, खेळ, चित्रपट महोत्सव, शेती, लेखापरिक्षण इ. समावेश आहे. या ७व्या ब्रिक्स परिषदेमध्ये भारताचा भक्कम पाठींबा असलेल्या नवीन विकास बँकेची घोषणा करण्यात आली यासाठी १०० बिलीयन डॉलर इतकी गुंतवणूक करण्याचे ठरले त्या समवेत १०० बिलीयन डॉलर इतका रोख फंड तयार करण्याचे ठरले.

***गेल्या वर्षीच्या जुलै महिन्यात रशियाच्या उफा या शहरात ७ व्या ब्रिक्स परिषदेच्या वेळी. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ‘दस कदम’ किंवा १० कलमी कार्यक्रम घोषित केला. ज्यामध्ये व्यापक अशा प्रादेशिक सहकार्याची कल्पना मांडली आहे ज्यामध्ये ट्रेडफेअर, खेळ, चित्रपट महोत्सव, शेती, लेखापरिक्षण इ. समावेश आहे. या ७व्या ब्रिक्स परिषदेमध्ये भारताचा भक्कम पाठींबा असलेल्या नवीन विकास बँकेची घोषणा करण्यात आली***

**दळणवळण -**

दळणवळण बाबतीतही भरीव राजनैतिक प्रयत्न करण्यात येत आहेत. प्रदेशा-प्रदेशामध्ये दळववळणाचे जाळे निर्माण व्हावे हा यातील उद्देश आहे. याकरीता बांगलादेशाबरोबर करार करण्यात आला असून त्यामुळे चित्तगाव आणि मोंगला बंदरांचा वापर, कोलकता, ढाका अगरतला बस सेवा सुरू करणे, त्याच बरोबर रस्ते विकास कार्यक्रमा अंतर्गत भारत, भुतान, नेपाळ आणि बांगलादेश या दरम्यान वाहतुकीचा करार आहे. भारत आणि एशियन (ASIAN) दरम्यान फिजीकल आणि डिजीटल दळवळण प्रोत्साहन मिळावे म्हणुन एक बिलीयन डॉलर इतके कर्ज सहाय्य आश्वस्त केले आहे. इराण मध्ये भारताला चाबहार बंदर बांधता यावे म्हणून इराण शासना बरोबर करार करण्यात येणार आहे. आशियामध्ये रस्ते, रेल्वे, जलवाहतूक सुरू व्हावी यासाठी तसेच भारत म्यानमार हायवे बांधण्यासाठी भारताने आंतरराष्ट्रीय उत्तर-दक्षिण कॉरीडोर निर्माण करून या योजना वेगवान पद्धतीने राबविण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू केले आहेत. याचा फार मोठा फायदा पूर्वोत्तर राज्यांना मिळणार आहे.

थोडक्यात, भारताने गेल्या २२ महिन्यात चालवलेल्या सक्रीय व व्यवहारीक राजनैतिक प्रयत्नांमुळे एक प्रकारची लगबग जोरात सुरू आहे आणि राष्ट्रीय महत्वाच्या अशा अनेक योजना, प्रकल्प तातडीने मार्गी लागत आहेत. याचा परिणाम जागतिकीकरणामध्ये भारताची पदचिन्हे अधिक विशाल, विस्तीर्ण उमटू लागली आहेत. भारत हा जागतिक घडामोडीत महत्वाचा भागीदार आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर तो सकारात्मक योगदान देवू शकतो. आंतरराष्ट्रीय संवादाला योग्य दिशा देवू शकतो.

■■■

*लेखक अमेरिका आणि जॉर्जिया येथील भारताचे माजी राजदूत असून संयुक्त राष्ट्रसंघात त्यांनी भारताचे कायम उपप्रतिनिधी म्हणूनही काम पाहिले आहे.*
*email: achal_malhotra@hotmail.com*

## तुम्हाला माहीत आहे काय?

# आंतरराष्ट्रीय योग दिवस

योगाप्रती जागतिक आवड लक्षात घेऊन संयुक्त राष्ट्रसंघाने २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून जाहीर केला. आंतरराष्ट्रीय योग दिवस प्रस्थापित करण्याचा मसुदा ठराव भारताने मांडला आणि त्यास विक्रमी संख्येने म्हणजे १७५ सदस्य राष्ट्रांनी पाठिंबा दिला. सं. राष्ट्रसंघाच्या ६९व्या आमसभेत भारताच्या पंतप्रधानांनी प्रथम हा प्रस्ताव मांडला ज्यात ते म्हणाले की, योगा ही आमच्या प्राचीन परंपरेची अमूल्य भेट आहे. योग मन आणि शरीर, विचार आणि कृती यांना मूर्त स्वरुप देतो. आमचं आरोग्य आणि आमचं कल्याण याबद्दल समग्र पवित्रा अमूल्य आहे. योग हा केवळ एक व्यायाम नाही तर आपण स्वत:, विश्व आणि निसर्ग याप्रती एकतेचा शोध घेण्याचा मार्ग आहे.

योग हा शारिरीक, मानसिक आणि अध्यात्मिक सरावाचा प्रकार आहे ज्याचा उगम भारतात झाला आहे. योग हा शब्द संस्कृतमधून आला असून त्याचा अर्थ जोडले जाणे किंवा एक होणे असा आहे, जो मन आणि चेतना यांच्या संयोगाचे प्रतिक आहे. योग सातत्याने केल्यामुळे होणाऱ्या लाभांप्रती जगभरात जागृती निर्माण करणे हा आंतरराष्ट्रीय योग दिवसाचा हेतू आहे. २१ जूनला साजरा केलेल्या आंतरराष्ट्रीय योग दिवसला (IDY) आंतरराष्ट्रीय समुदायाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून येमेन वगळता राष्ट्रसंघाच्या सर्व १९३ सदस्य देशांनी योग दिवस साजरा करण्यात भाग घेतला. त्या दिवशी विविध देशांत सादर झालेल्या उपक्रमांत व्याख्याने, सामायिक योग प्रथांवर आधारित प्रात्यक्षिके आणि सामूहिक योगासने, योग क्लब्ज आणि सामुदायिक संघटनांशी भेटीगाठी, योग मैफिली,योगाथॉन, योगवॉक्स, चित्रपट आणि माहितीपटांचे प्रसारण तसेच छायाचित्रांचे प्रदर्शन यांचा समावेश होता. भारत सरकारनेही आंतरराष्ट्रीय योग दिवस २१ जून २०१५ ला अत्यंत चैतन्यमयी पद्धतीने साजरा केला आणि देशभरातील लोकांनी उत्साहाने सामूहिक योगासने करून उत्साही सहभागी घेतला. दोन गिनीज विश्वविक्रम नोंदले गेले - ३५,९८५ जणांचा सहभाग असलेले सर्वात विशाल योगासनांचे धडे आणि एका योगासनाच्या वर्गात सर्वाधिक म्हणजे ८४ देश सहभागी झाले. यंदाही हा दिवस साजरा करण्याच्या योजना तयार होत आहे.

आंतरराष्ट्रीय योगा दिवसाच्या लोगोमध्ये खालील प्रतिकांचा वापर करण्यात आला आहे. योगामध्ये दोन्ही हात एकत्र जोडले गेले असून त्यातून वैयक्तिक चैतन्य आणि सार्वत्रिक चैतन्य यांचा संयोग, मन आणि शरीर, मानव व निसर्ग यांच्यातील पूर्णपणे सलोखा, आरोग्य आणि कल्याण यांच्याप्रती समग्र भूमिका प्रतिबिंबित करते.बदामी रंगाची पाने पृथ्वी तत्वाचे प्रतिक असून हिरवी पाने निसर्गाचे प्रतिक, निळा रंग जलतत्व, चमकदारपणा अग्नीतत्वाचे प्रतिक आणि सूर्य हा ऊर्जा व प्रेरणेचे प्रतिक आहे. हा लोगो मानवतेचा सलोखा व गती यांना प्रतिबिंबित करतो, जे योगाचे मूलतत्व आहे. २१ जून २०१५ ही तारीख आणि सलोखा आणि शांततेसाठी योग हे शब्द लोगोच्या खाली अवतरतात.

**भारतीय विद्यापीठांत योगशिक्षण**

अखिल भारतीय उच्च शिक्षण पाहणी प्राथमिक अहवाल २०१४-१५ अनुसार योगामधील पदव्युत्तर पदवी शिक्षण देणारी २५ विद्यापीठे आणि १८ महाविद्यालये आहेत. खालील दोन योग विद्यापीठे यूजीसीच्या यादीत आहेत.

१. लोकुलीश योग विद्यापीठ, अहमदाबाद २. स्वामी विवेकानंद योग अनुसंधान संस्थान (अभिमत विद्यापीठ), बंगळुरू.

विद्यापीठांमध्ये योगशिक्षण देण्यासाठी सरकारतर्फे एक समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या कार्यकक्षेत महाविद्यालये आणि विद्यापीठे यांच्यातील योग प्राध्यापकांसाठी शैक्षणिक अर्हता ठरवणे आणि महाविद्यालये आणि विद्यापीठे यांच्यातील प्राध्यापकांच्या भरतीसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने मंजूर केलेल्या अर्हतेमध्ये सुधारणा करण्याची गरज आहे का, याची तपासणी करण्याचा समावेश आहे.

या समितीने आपल्या अहवालात खालील शिफारशी केल्या आहेत.

१.नेट अभ्यासक्रम अंतिम निश्चित करण्यासाठी उपसमिती नेमणे.

२.सात कार्यक्रमांची विद्यापीठांमध्ये अंमलबजावणी करणे.

i) ६ ते १२ महिन्याच्या कालावधीचा योगामधील प्रमाणपत्र अभ्यासक्रम

ii) बॅचलर ऑफ सायन्स (योग) बी.एससी. (योग) -३ ते ६ वर्षे

iii) १ ते २ वर्षांचा पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन योग (pgdy)

iv)१ ते २ वर्षांचा पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन योगाथेरपी (pgdyt)

v) २ ते ४ वर्षांचा मास्टर्स ऑफ सायन्स M.Sc. योग

vi) डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (Ph.d.) योग -३ ते ५ वर्षे

vii) डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी इंटिग्रेटेड -योग ४ ते ६ वर्षे

योग प्राध्यापकांसाठी समितीने शैक्षणिक अर्हता निश्चित केली आहे. विद्यापीठांमध्ये योगाला प्रोत्साहन देण्यासाठी समितीने इतरही अनेक शिफारशी केल्या आहेत.

■■■

# कृषी आणि कृषीकल्याणाची सद्यस्थिती

जे.पी.मिश्रा



***उत्पादनशीलता वाढवणे, किफायतशीर दर शेतकऱ्यांच्या मालाला उपलब्ध करून देणे महत्वाचे आहे. त्यास बाजारपेठ सुधारणा व जमीन सुधारणांची जोड आवश्यक आहे त्यामुळे कृषी कार्यक्षमता वाढेल व शेतीकडून सगळेच लोक उद्योगांकडे किंवा शहरांकडे जाणार नाहीत. पूर्वेकडील राज्यांना आता धान्याचे कोठार बनवावे लागेल तेथे संस्थात्मक यंत्रणा उभारून शेतकऱ्यांच्या जोखमीवर उपाय करावे लागतील, तरच त्यांचे उत्पन्न वाढेल.***

भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी हा सर्वात मोठा घटक राहिला आहे. या क्षेत्राने सन २०१४-१५ मध्ये (२०११-१२ वर आधारित) मूल्यवर्धन १६.१ टक्के इतके केले आहे. आर्थिक घटकातच कृषी क्षेत्राचे महत्व नाही तर सामाजिक सुरक्षेतही त्याचा मोठा वाटा आहे. या क्षेत्रातून अन्न व पोषणासाठी मोठे काम होत असते शिवाय मोठ्या लोकसंख्येला अजूनही रोजगारासाठी शेती हाच पर्याय आहे. ग्रामीण भागात तरी लोक अजूनही रोजीरोटीसाठी शेतीवर अवलंबून आहेत. या क्षेत्रात रोजगार कमावणाऱ्या लोकांचे प्रमाण १९९३-९४ मध्ये ६४.८ टक्के होते ते २०११-१२ मध्ये ४८.९ टक्के झाले पण अजूनही जास्तीत जास्त लोकांना त्यावरच रोजगारासाठी अवलंबून रहावे लागत आहे. शेती क्षेत्रातील उत्पन्न हे उत्पादनशीलतेशी निगडित असल्याने ते निश्चित नाही व त्यात किंमतीत चढउतार होत असतात. हवामान बदलामुळे काही फरक दिसतात. काही ठिकाणी खूप पाऊस काही ठिकाणी दुष्काळ अशी टोकाची स्थिती निर्माण होते. हवामानामुळे होणाऱ्या नुकसानीला तोंड देण्यासाठी पुरेसा संस्थात्मक पाठिंबा पुरा पडत नाही. भारतात टोकाच्या हवामानाचे प्रसंग वाढत आहेत. त्यामुळे शेतीवर अवलंबून असलेल्या लोकांच्या कल्याणासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी अनेक बाबींचा विचार करावा लागणार आहे. अनेक बाबतीत बदल संस्थात्मक बदलांच्या अनुषंगाने असतील. तंत्रज्ञानाची निर्मिती करावी लागेल त्याचे हस्तांतर झाले तर शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढणार आहे. अन्नधान्याची मागणी वाढत आहे. अन्नधान्याची मागणी २०२०-२१ या काळात २७७ दशलक्ष टन असेल तर तेलबियांची गरज ७१ दशलक्ष टन असेल. कडधान्यांची उत्पादन वाढ बघता डाळी सोडून सर्व कमरता दूर करता येण्यासारख्या आहेत. तेलांची कमतरता आहे. तेलाची साठ टक्के गरज आपण आयातीतून भागवतो.

उत्पादनशीलता वाढवणे, किफायतशीर दर शेतकऱ्यांच्या मालाला उपलब्ध करून देणे महत्वाचे आहे. त्यास बाजारपेठ सुधारणा व जमीन सुधारणांची जोड आवश्यक आहे त्यामुळे कृषी कार्यक्षमता वाढेल व शेतीकडून सगळेच लोक उद्योगांकडे किंवा शहरांकडे जाणार नाहीत. पूर्वेकडील राज्यांना आता धान्याचे कोठार बनवावे लागेल तेथे संस्थात्मक यंत्रणा उभारून शेतकऱ्यांच्या जोखमीवर उपाय करावे लागतील, तरच त्यांचे उत्पन्न

वाढेल. त्यात विविध पिके घेणे, सारखी तीच पिके घेण्याचे टाळणे महत्वाचे आहे. धोरणे व सरकारचे कार्यक्रम यांचाही त्यात वाटा असला पाहिजे. सरकारने आता अनेक अभिनव उपाययोजना शेतकऱ्यांच्या समस्यांवर सुरू केल्या आहेत. नेहमीच्या चौकटीबाहेरची ही उत्तरे आहेत. शेतकऱ्यांचे कल्याण त्यात सामावलेले आहे. जास्त क्षेत्र पाटबंधाऱ्यांच्या खाली आणून शेतीला जास्त चांगली साधनांची जोड या वेगळ्या गुंतवणुकीतून दिली जाते आहे. त्यावर आता भर आहे, शेतकऱ्यांना पिक वाया जाण्याच्या विरोधात सक्षम केले जाईल, पीक विमा योजनेने त्यांना फायदा होईल, राष्ट्रीय कृषी बाजारपेठ, किंमत स्थिरीकरण या योजना यात आहेत. सेंद्रीय शेती, पारंपरिक शेती, पशुपालन व मत्स्यशेती या गोष्टींचाही सरकार विचार करीत आहे. शेतकऱ्यांना सक्षम तंत्रज्ञानाची माहिती, बाजारभावांची माहिती , विपणनाच्या संधी यासाठी सर्व मार्गदर्शन किसान चॅनेलवरून होत आहे. गेल्या दोन वर्षात अनेक योजना सुरू केल्या आहेत त्यात शेतीपुढील आव्हानांचा विचार करतानाच शेतकरी कल्याणावर भर दिला आहे.

**१. प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना** (पीएमकेएसवाय)- आपल्या देशात ५५ टक्के भूभाग असा आहे की, जो कृषी योग्य आहे, त्यासाठी शेतकरी कल्याण साधण्याकरिता 'हर खेत को पानी', 'मोअर क्रॉप पर ड्रॉप' म्हणजे कमी पाण्यात जास्त कृषी उत्पादन असा भर आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना ही योग्यच आहे. त्यात पाण्याचा कार्यक्षण वापर व अगदी गावोगावच्या शेतांना पाणी हे धोरण आहे. पीएमकेएसवायची अंमलबजावणी २८.५ लाख हेक्टर भूभागात होणार आहे, हा भाग पाटबंधाऱ्याखाली आणला जाईल. पीएमकेएसवायसाठी ४५१० कोटींचा निधी दिला आहे. त्यात एआयबीपीसाठी २५१० कोटींच्या पुरवणी अनुदानास मान्यता आहे. २०१५-१६ च्या सुधारित अंदाजानुसार जलसंसाधन मंत्रालयाने ही तरतूद दाखवली आहे. २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात पीएमकेएसवायला प्राधान्य दिले आहे. एआयबीपी अंतर्गत ८९ पाटबंधारे प्रकल्प पूर्ण केले जातील जे सध्या रेंगाळलेले आहेत. त्यामुळे ८०.६ लाख हेक्टर कृषी जमीन ओलिताखाली येईल. पुढील वर्षी त्यासाठी १७००० कोटींची गरज असून पुढील पाचवर्षात ८६५०० कोटींची तरतूद गरजेची आहे. ३१ मार्च २०१७ अखेर यातील २३ पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्याचे ठरले आहे. नाबार्डने यासाठी सुरूवातीचा संचित निधी २००० कोटी रूपये ठेवला आहे. हे सगळे करण्यासाठी २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात १२५१७ कोटी रूपयांची तरतूद केली आहे. अनेक राज्यांनी जलसंवर्धनासाठी अपारंपरिक उपाय सुरू केले आहेत. महाराष्ट्रात जलयुक्त शिवार नावाची योजना सुरू केली असून कंपनी सामाजिक दायित्व निधीतून जलसाठे तयार केले जात आहे. डोंगर उतारावरचे पाणी अडवले जात आहे. कर्नाटक सरकारने सूक्ष्म व ठिबक सिंचनाला १०० टक्के अनुदान दिले आहे. गुजरातेत सूक्ष्म पाटबंधारे पद्धत चालू केली आहे, त्यात शेतकऱ्यांनीच संस्थात्मक सुविधा तयार केल्या आहेत. गुजरातमध्ये हरितक्रांती प्राधिकरणाला केंद्रीय निधी मिळत असून त्यातून सूक्ष्म पाटबंधारे योजना राबवल्या जात आहेत. त्याची निगा तीन वर्षे या योजनेत राखली जाणार आहे. राजस्थानात डिग्गी किंवा फवारणी स्प्रिंकलर पद्धत वापरली जात आहे. कालव्यांच्या पाणलोट क्षेत्रात हे शक्य आहे, पाण्याचा कार्यक्षम वापर व संवर्धन यावर सरकारचा भर आहे.

*अनेक राज्यांनी जलसंवर्धनासाठी अपारंपरिक उपाय सुरू केले आहेत. महाराष्ट्रात जलयुक्त शिवार नावाची योजना सुरू केली असून कंपनी सामाजिक दायित्व निधीतून जलसाठे तयार केले जात आहे. डोंगर उतारावरचे पाणी अडवले जात आहे. कर्नाटक सरकारने सूक्ष्म व ठिबक सिंचनाला १०० टक्के अनुदान दिले आहे. गुजरातेत सूक्ष्म पाटबंधारे पद्धत चालू केली आहे, त्यात शेतकऱ्यांनीच संस्थात्मक सुविधा तयार केल्या आहेत. राजस्थानात डिग्गी किंवा फवारणी स्प्रिंकलर पद्धत वापरली जात आहे. कालव्यांच्या पाणलोट क्षेत्रात हे शक्य आहे.*

**२. प्रधानमंत्री कृषी बिमा योजना-** प्रधान मंत्री फसल बिमा योजना ही खरिपाच्या २०१६ मधील हंगामापासून लागू केली आहे. राष्ट्रीय कृषी विमा योजना व सुधारित राष्ट्रीय कृषी विमा योजना यांची जागा आताच्या योजनेने घेतली आहे. देशभरात पीक क्षेत्र पाहून शेतकऱ्यांसाठी कमी क्षेत्रातील पिकांसाठी आता विमा भरपाई मिळणार आहे. त्यात खरीपाची अन्नधान्ये, डाळी व तेलबियांसाठी २ टक्के, रबी अन्नधान्यासाठी दीड टक्का, खरीप व रबी वार्षिक व्यावसायिक तसेच फलोत्पादन पिके यासाठी ५ टक्के प्रीमियम निश्चित करण्यात आला आहे.

यात २०१६-१७ मधील योजना खर्च ५५०० कोटी आहे ही योजना राज्यांनी खरीप २०१६ हंगामापासून लागू करावी असे सांगण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. नैसर्गिक आपत्तीतून पिकांचे नुकसान झाले तरी विमा रक्कम मिळणार आहे.

**३.मृदा आरोग्य कार्ड योजना-** मातीचेही आरोग्य असते. मातीचे परीक्षण करावे लागते ते विचारात घेऊन सुधारणा केल्या किंवा पिकांची निवड केली तर फायदा होतो. हरितक्रांतीत खतांचा वापर मोठ्या प्रमाणावर झाला पण त्यातही युरियाचा वापर नायट्रोजन घटक म्हणून जास्तच झाला. १९७० च्या काळात एन पी व के यांचे सरासरी प्रमाण ६.१-९-१ असे होते ते १९९६ मध्ये नायट्रोजनकडे झुकले व १०.२-९-१ असे झाले. २०१२-१३ मध्ये त्यात उलट बदल झाला होता पण नंतर पुन्हा ते प्रमाण आता ८.२-३.२-१ असे आहे. भारतातील शेतकरी युरियाचा फार जास्त वापर करतात असा एक समज आहे पण त्यात फार तथ्य नाही. माती व पिकांचा प्रकार, जलसंधारण पद्धत व पाऊस विपुल प्रदेश यांचा विचार करणे गरजेचे आहे. माती परीक्षण पत्रिका योजना राबवली जात आहे त्यात शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीतील मातीत काय पोषके आहेत ते सांगितले जाते व खतांचा योग्य तेवढाच वापर करण्यास सांगितले जाते. मार्च २०१७ पर्यंत १४ कोटी शेतांपर्यंत मातीपरीक्षण योजना पोहोचलेली असेल. त्यासाठी 'नॅशनल प्रोजेक्ट ऑन सॉईल हेल्थ अँड फर्टिलिटी' योजनेत ३६९ कोटींची तरतूद केली आहे. त्याशिवाय खतांच्या ज्या कंपन्या आहेत त्यांच्या २००० आदर्श दुकानात माती परीक्षणाची सोय व बियाणांच्या तपासणीची सोय तीन वर्षात केली जाणार आहे.

**४. ईशान्येकडील परंपरागत कृषी विकास योजना व सेंद्रीय शेती-** पावसाळी प्रदेशात उत्पादकता वाढवून सेंद्रीय शेती शक्य आहे. देशात ५५ टक्के जमीन कृषी योग्य आहे. सरकारने परंपरागत कृषी विकास योजना जाहीर केली असून त्यात पाच लाख एकरात सेंद्रीय शेती तीन वर्षात केली जाणार आहे व दुसरी योजना मूल्यवर्धित साखळी सेंद्रीय योजना आहे त्याला सरकारने 'ऑरगॅनिक व्हॅल्यू चेन डेव्हलपमेंट इन नॉर्थ इस्ट रीजन' असे नाव दिले आहे.या भागातील सेंद्रीय उत्पादनांना मूल्यवर्धित स्वरूपात सादर करून त्याची निर्यात केली जाईल या योजनांसाठी ४१२ कोटींची तरतूद केली आहे.

> ***पॅन इंडिया इलेक्ट्रॉनिक ट्रेडिंग पोर्टल सुरू केले जात असून त्यातून निवडक कृषी उत्पन्न बाजारसमित्या जोडल्या जातील त्यातून एकात्मिक राष्ट्रीय कृषी उत्पन्न बाजारपेठ तयार होईल. ई -प्लॅटफॉर्म हा ५८५ नियंत्रित किरकोळ बाजारपेठांना लागू असणार आहे. राज्यांनाही त्यांच्या विपणन कायद्यात सुधारणा करण्यास सांगितले आहे. राज्यात एकच परवाना लागू असेल, एकाच नाक्यावर किंवा ठिकाणी बाजार कर घेतला जाईल, इलेक्ट्रॉनिक लिलावाची सुविधा दिली जाईल.***

**५. राष्ट्रीय कृषी बाजारपेठ (नॅम)-** कृषी उत्पन्न विपणन प्रणालीस विविध कर व मंडई करांमुळे धक्का बसला आहे. त्याशिवाय हे कर राज्यांमध्ये समान नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांना किफायतशीर भाव मिळत नाही. कृषी मालाच्या एका राज्यातून दुसऱ्या राज्यातील वाहतुकीत अनेक अडचणी व निर्बंध आहेत. त्यासाठी कर्नाटकने एक प्रारूप तयार केले असून सर्व बाजारपेठा एकाच परवाना पद्धतीखाली आणण्याचा प्रस्ताव त्यात आहे, यात राज्य सरकारी संस्था व एनसीडीइएक्स स्पॉट एक्सचेंज या संयुक्त उपक्रमाचा विचार आहे. हे प्रारूप आधारभूत मानून सरकारने अलिकडे राष्ट्रीय कृषी बाजारपेठ योजना मांडली आहे त्यात कृषी तंत्रज्ञान पायाभूत निधी वापरला जाणार असून २०१५-१६ व २०१७-१८ दरम्यान त्याची अंमलबजावणी होत आहे. या योजनेत छोट्या शेतकऱ्यांची कृषी उद्योजक संघटना म्हणजे स्मॉल फार्मर्स अग्री बिझीनेस कन्सॉर्टियम स्थापन केले जाईल. यासाठी २०० कोटींची तरतूद अर्थसंकल्पात केली आहे. यातील कन्सॉर्टियम हे कृषी, सहकार व शेतकरी कल्याण विभागाची स्वायत्त संघटना आहे. नॅम अंतर्गत पॅन इंडिया इलेक्ट्रॉनिक ट्रेडिंग पोर्टल सुरू केले जात असून त्यातून निवडक कृषी उत्पन्न बाजारसमित्या जोडल्या जातील त्यातून एकात्मिक राष्ट्रीय कृषी उत्पन्न बाजारपेठ तयार होईल. ई -प्लॅटफॉर्म हा ५८५ नियंत्रित किरकोळ बाजारपेठांना लागू असणार आहे. राज्यांनाही त्यांच्या विपणन कायद्यात सुधारणा करण्यास सांगितले आहे. राज्यात एकच परवाना लागू असेल, एकाच नाक्यावर किंवा ठिकाणी बाजार कर घेतला जाईल, इलेक्ट्रॉनिक लिलावाची सुविधा दिली जाईल असे सांगण्यात आले आहे.

**६. किंमत स्थिरीकरण निधी-** किंमत तरलता किंवा सतत चढउतार होणारे शेतमालाचे बाजारभाव शेतकऱ्यांना धोकादायक असतात, एका हंगामात फार मोठा आर्थिक फायदा शेतकऱ्यांना मिळतच नाही. अनेकदा जास्त उत्पादन व कमी उत्पादन याचा भावावर परिणाम होत असतो. माल विक्रीच्यावेळी बाजारभाव कमी असतील तर फटका बसतो. शेतीमाल नाशवंतही असतो त्यामुळे योग्यभावाच्या वेळी तो विक्रीत आणण्यात अडचणी असतात.त्यामुळे किंमत स्थिरीकरण निधीची तरतूद केली आहे. कृषी व फलोद्यान उत्पादनांसाठी ही योजना लागू आहे. या निधीमुळे खेळते भांडवल व खरेदी तसेच वितरण खर्च दिले जातात व त्यामुळे शेतकऱ्यांना व ग्राहकांना संरक्षण मिळते.

**७. राष्ट्रीय गोकुळ योजना-** कृषी क्षेत्रात २५ टक्के आर्थिक वाटा पशुपालनाचा आहे. त्यातून २१ दशलक्ष लोकांना स्वयंरोजगार मिळाला आहे. या क्षेत्राची मोठी वाढ होत आहे व त्यातून शेतकऱ्यांना आपत्तीच्या काळात थोडासा आधार मिळत आहे. राष्ट्रीय गोकुळ योजना २०१४-१५ मध्ये लागू करण्यात आली असून त्यात देशी बीजांचे जतन केले जात आहे. एकात्म पशुविकास केंद्रे म्हणजे गोकुळ ग्राम स्थापन करून देशी गाईगुरांसह इतर पशुंची पैदास यात केली जात आहे. त्यासाठी २०१४-१५ व २०१६-१७ या वर्षात योजनाखर्च ५०० कोटी रूपये केला आहे. देशी बीजांच्या जतनासाठी ५० कोटींची तरतूद २०१५-१६ या वर्षात केली आहे.

**८. राष्ट्रीय कामधेनू पैदास केंद्र-** राष्ट्रीय कामधेनू पैदास केंद्राची योजना देशी गायींची पैदास, संवर्धन व विकास यासाठी आहे. त्यात दक्षिण व उत्तरकेडे एकेक केंद्र स्थापन केले जात आहे. उत्कृष्टता केंद्रही स्थापन केले जात असून तेथे वैज्ञानिक पद्धतीने देशी पशुंच्या बीजांचे संवर्धन केले जात आहे. गाईंचे ३९ तर म्हशींचे १३ प्रकार , मिथुन व याक यांच्याही बीजांचे संवर्धन केले जात असून त्यांची जनुकीय गुणवत्ता वाढवली जात आहे. देशी बीजांसाठी प्रमाणित जर्मप्लाझ्म स्थापन केले जात आहे. त्यात चांगल्या बैलांमार्फत रेतन, शुक्राणूंच्या मात्रा व चांगल्या प्रजातीच्या देशी पशुंचे काही गर्भ शेतकऱ्यांना व पैदास केंद्रांना उपलब्ध करून दिले जातील. मध्य प्रदेश व आंध्र प्रदेश यांना राष्ट्रीय कामधेनू पैदास केंद्रासाठी प्रत्येकी २५ कोटी रूपये मंजूर करण्यात आले आहेत.


**९. नीलक्रांती-** मत्स्यालये विकास व मच्छिमारांचे कल्याण यासाठी एकात्मिक मत्स्य विकास योजना नीलक्रांतीत राबवली जात आहे. त्यासाठी पुढील पाच वर्षे तीन हजार कोटींची तरतूद केली आहे. नीलक्रांतीची उद्दिष्टे त्यात साध्य केली जातील.

**१०. अर्थसंकल्पी तरतूद-** या सर्व योजनांसाठी सरकारने २०१६-१७ या वर्षात आर्थिक तरतूद केली आहे. ३५९८४ कोटी रूपये तरतूद कृषी मंत्रालयाने २०१६-१७ मध्ये केली आहे. त्यात पतपुरवठ्यापोटी ९ लाख कोटींची तरतूद या वर्षासाठी केली आहे. ग्रामीण रस्ते, ग्रामीण विद्युतीकरण, ग्रामीण स्थित्यंतराच्या सामाजिक योजना यासाठी अनेक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

■■■

*लेखक भारत सरकारच्या 'निती' आयोगामध्ये सल्लागार (कृषी) असून कृषी संशोधन आणि विकास या क्षेत्रात दोन दशकाहून अधिक काळ कार्यरत आहेत.*

*email: mishrajaip@gmail.com*



# योग आणि निरोगी, तणावविरहीत आयुष्य

डॉ. ईश्वर एन. आचार्य /राजीव रस्तोगी



***सध्या बदलत्या जीवनशैलीमुळे वाढलेल्या आरोग्यविषयक तक्रारींवर उपाय म्हणून जगभरातील लोक योगाकडे वळले आहेत. सुलभता, किफायतशीर आणि प्रभावीपणा यामुळे योग जगभरातील लोकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे. शारिरीक आसन, श्वसनावरील नियंत्रण, ध्यानधारणा, या सर्वांचे सार योगामध्ये आहे.***

योग ही आरोग्यासाठीची पारंपरिक पद्धती आहे. संतुलित आयुष्य जगण्यासाठीच्या या पद्धतीचा उगम भारतात झाला असून ती याठिकाणच्या परंपरा आणि संस्कृतीत रुजली आहे. हजारो वर्षांपूर्वी ऋषी आणि संतांनी या परंपरेला विकसित केले आहे. सध्या बदलत्या जीवनशैलीमुळे वाढलेल्या आरोग्यविषयक तक्रारींवर उपाय म्हणून जगभरातील लोक योगाकडे वळले आहेत. सुलभता, किफायतशीर आणि प्रभावीपणा यामुळे योग जगभरातील लोकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे. शारिरीक आसन, श्वसनावरील नियंत्रण, ध्यानधारणा, या सर्वांचे सार योगामध्ये आहे.

सर्व क्षेत्रातील लोकांचा ओढा आता योगप्रशिक्षणाकडे आहे. केवळ निरोगी शरीरच नाही तर विविध व्याधींवर योगाच्या माध्यमातून नियंत्रण ठेवता येते. शास्त्रज्ञ आणि वैद्यकीय व्यावसायिक यांना आता योगाचे महत्व समजले आहे. योगाचा लाभ हा अतिशय प्रभावी, किफायतशीर आणि युवकांसह सर्वांना उपयुक्त असा आहे. त्यामुळे अर्थपूर्ण आणि निरोगी जीवन जगता येते.

योगाची ख्याती आता देशाबाहेर पोहचली आहे. बऱ्याच देशांतील युवकांकडून योगासने केली जात आहेत. योगाने प्रांत, प्रदेश, जात, धर्म, राष्ट्रीयत्व या सर्व सीमा ओलांडल्या आहेत. योग सर्वांसाठी खुला आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून जाहीर केला आहे.

जागतिक आरोग्य संघटनेनूसार आरोग्य म्हणजे, “वेळ रोग नसणे म्हणजे निरोगी नाही तर, संतुलित शरीर, मानसिक आणि सामाजिक स्वास्थ्य म्हणजे आरोग्य होय.” अशी व्याख्या केली आहे, यातून चौथा आयामही सुचवला जातो, तो म्हणजे अध्यात्मिक कल्याण. निरोगी आयुष्य हे शारिरीक, मानसिक, भावनिक, सामाजिक आणि अध्यात्मिक कल्याणाच्या मदतीने साधले जाऊ शकते.

याठिकाणीच योगाची भूमिका निश्चित होते. योगामुळे आपले व्यक्तिमत्व प्रभावी आणि संतुलितरित्या म्हणजे शारिरीक, मानसिक, भावनिक, सामाजिक आणि अध्यात्मिकरित्या स्थिर बनते. नियमित योगासनामुळे आत्मविश्वास कमालीचा वाढतो. योगामुळे युवकांना अधिक निरोगी, संतुलित आणि तणावविरहीत आयुष्य जगता येते. योगात पाच यम आणि पाच नियम सांगितले आहेत.

योगासने नियमित करण्यासाठी अतिशय सुलभ असून दैनंदिन व्यग्रता सांभाळून केली जाऊ शकतात.

औद्योगिकरण आणि नागरिकरणाचा वेग झपाट्याने वाढत असल्यामुळे आपल्यासमोर प्रदुषण, तणाव, चिंता या समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे सकाळी अगदी लवकर सुरू झालेला दिवस रात्री उशिरा संपतो. तसेच आहाराच्या सवयी निरोगी नाहीत. प्रिझर्व्हड फूड, फास्ट फूड, जंक फूड, हाय कॅलरी अशाप्रकारचे अन्न आणि धुम्रपान, अल्कोहल आणि ड्रगचे सेवन, पुरेशा विश्रांतीचा अभाव, व्यायामाचा अभाव यामुळे मधुमेह, उच्च रक्तदाब (हायपरटेन्शन), संधीवात, पाठदुखी या समस्यांनी ग्रासले आहे. याच कारणांमुळे दिवसेंदिवस मानसिक आरोग्याच्या समस्या निर्माण होत आहेत. संशोधनाअंती दिसून आले आहे की, खूप लोकांमध्ये उदासिनता, स्कीझोफ्रेनिया, मद्य आणि ड्रग्सशिवाय न राहणे याचे प्रमाण वाढले आहे. योग ही उपचाराची अतिशय सुलभ पद्धती आहे. विविध आसने, प्राणायाम, शत्कर्म, सूर्यनमस्कार, ध्यानधारणा या माध्यमातून प्रभावीपणे उपचार केले जाऊ शकतात. उदासिनता, मज्जातंतूचा विकार, वर्तनबदल, याशिवाय शारिरीक व्याधी जसे डोकेदुखी, ब्राँकायटीस (फुप्फुसांच्या नळ्यांना आलेली सूज), दमा, मधुमेह यासारख्या विकारांवर नियमित योगासनांच्या माध्यमातून मात करता येते.

युवकांमध्ये ताण आणि उदासिनता या दोन प्रमुख समस्या आढळून येतात. ताण हा शारिरीक किंवा मानसिक स्वरुपात आहे. दैनंदिनीत मोठ्या प्रमाणावर बदल, काम, शाळा, संबंधांतील तणाव, आर्थिक समस्या, खूप व्यग्र असणे यामुळे ताण निर्माण होतो. तीव्र चिंता, निराशावादी दृष्टीकोन, नकारात्मक आत्मसंवाद, अवास्तव अपेक्षा, कर्मठ विचारसरणी, लवचिकतेचा अभाव, पाहिजे तर सर्व किंवा काहीच नाही अशी भावना ही तणावाची कारणे आहेत. भावनिक असंतुलन, अस्थैर्य, चिंता ही मानसिक ताणाची प्रमुख कारणे आहेत. याशिवाय डोकेदुखी, निद्रानाश, झटके येणे, रखरखीत त्वचा, पचनासंबंधी विकार, पाचक व्रण, आतड्याला येणारी सूज, उच्च रक्तदाब, ह्रदयातील रक्त गोठणे, वेदनादायक मासिक पाळी या शारिरीक व्याधी निर्माण होतात. नियमित योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणा हा शरीर व्यवस्थापनाचा प्रभावी मार्ग आहे. योगासनांमुळे शरीर आणि मन संतुलित होते, नवीन विचारप्रक्रिया सुरू होते, तसेच पूर्ण स्वभाव योगासनांमुळे बदलतो. खोल श्वास, योगेंद्र आणि ध्यान यामळे निराशावादी दृष्टीकोन बाजूला पडून शांत स्वभाव, अंतर्गत सुख आणि सकारात्मक विचारसरणी विकसित होते.

***योग ही उपचाराची अतिशय सुलभ पद्धती आहे. विविध आसने, प्राणायाम, शत्कर्म, सूर्यनमस्कार, ध्यानधारणा या माध्यमातून प्रभावीपणे उपचार केले जाऊ शकतात. उदासिनता, मज्जातंतूचा विकार, वर्तनबदल, याशिवाय शारिरीक व्याधी जसे डोकेदुखी, ब्राँकायटीस (फुप्फुसांच्या नळ्यांना आलेली सूज), दमा, मधुमेह यासारख्या विकारांवर नियमित योगासनांच्या माध्यमातून मात करता येते.***

युवकांनी आपल्या आयुष्यात निरोगी जीवनशैली अंगीकारली पाहिजे. त्यामुळे व्याधीही दोन हात दूर राहतात. या अतिशय सुलभ, किफायतशीर, अंगीकारण्यासाठी सोप्या अशा पद्धती आहेत. यामुळे प्रेम आणि जिव्हाळा निर्माण होऊन भावनिक संतुलन साधले जाते. यामुळे शांत स्वभाव, स्थिरचित्तता, आणि सकारात्मक विचार निर्माण होतात. खाली काही पथ्ये सांगितली आहेत.

**संतुलित आहार-** सर्वात आवश्यक बाब म्हणजे संतुलित आहार होय. आपले अन्न हे शक्यतोवर नैसर्गिक प्रकारात असले पाहिजे. आहारात हंगामी फळे, हिरव्या पालेभाज्या, मोड आलेली धान्ये यांचा योग्य प्रमाणात समावेश असावा. अल्कधर्मी असल्यामुळे या पदार्थ आणि फळांमुळे आरोग्य निरोगी राहते.

**उपवास-** आरोग्यासाठी उपवास हा अतिशय महत्वाचा आहे. ही संपूर्ण पचनव्यवस्थेला विश्रांती देण्याची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेदरम्यान, जी ऊर्जा अन्नाचे पचन घडवून आणते, ती संपूर्ण शरीराचे विषहरण (डीटॉक्सिफिकेशन) घडवून आणते. मन आणि शरिराची अव्यवस्था यामुळे दूर होते. साप्ताहिक उपवासादरम्यान उत्तम आरोग्यासाठी फळांचा रस किंवा फळे खाण्याचा सल्ला दिला जातो.

**नियमित व्यायाम-** योगासनांच्या माध्यमातून नियमित व्यायाम निरोगी शरीरासाठी अत्यंत आवश्यक आहे. यामुळे रक्ताभिसरण प्रक्रिया सुरळीत होते, त्यामुळे शरीर लवचिक बनते. वयस्क प्रक्रिया कमी करुन निरोगी आयुष्य जगता येते. यासाठी नियमितपणे सकाळी फिरावयास जाणे, धावणे, योगासने, सूर्य नमस्कार, प्राणायम आणि

शारिरीक कुवतीनूसार थोड्या प्रमाणात बागकामासारख्या शारिरीक कष्टाचे काम करणे आवश्यक आहे. यामुळे शरीर ताजेतवाने होऊन सकारात्मक विचारांना चालना मिळते. प्रसिद्ध निसर्गोपचारतज्ज्ञ हेनरी लिंडाहर यांच्या मते, नियमित व्यायामामुळे शरीरामधील निरोगी पेशी फुप्फुसाचा क्षमतेइतका विकास करतात, त्यामुळे ऑक्सीजन घेण्याची प्रक्रिया वाढते आणि दूषीत घटक बाहेर फेकले जातात. यामुळे त्वचा, किडनी, आतडी आणि श्वसनप्रक्रिया संतुलित राहते.

**विश्रांती-** योगासनांशिवाय, पुरेशी विश्रांती म्हणजे आवश्यक प्रमाणात झोप झाली पाहिजे. चांगली झोप झाल्यास तजेलपणा वाढतो त्यामुळे व्यक्ती आनंदी आणि प्रसन्न राहतो. अपूर्ण झोप झाल्यामुळे ताण, चिंता वाढते ज्याचा आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. म्हणून पूर्ण झोपेविषयी कधीच तडजोड करता कामा नये.

**पुरेशा प्रमाणात पाणी पिणे-** निरोगी शरीरासाठी पुरेशा प्रमाणात पाणी पिणे महत्वाचे आहे. पाण्यामुळे शरीरातील विषारीपणा नाहीसा होऊन अंतर्गत शरीर स्वच्छ होते.

काही महत्वाच्या सूचना, जेणेकरुन आरोग्यदायी जीवन जगता येते

१.लवकर झोपून सुर्योदयापूर्वी उठावे. किमान सात तास झोप झाली पाहिजे.

२.आहार साधा, संतुलित आणि सात्विक असावा.

३.आहारात साखर, मीठ, लाल मिरची, लोणची, मसालेदार पदार्थ यांची मात्रा कमी करावी. चहा आणि कॉफीचे सेवन कमी प्रमाणात करावे. सर्व प्रकारच्या मादक द्रव्यांपासून दूर राहा. तूप आणि तेलाचा आहारात कमी वापर करावा. योग साधकासाठी शाकाहारी आहार हा उत्तम आहार.

४.जेवणाच्या वेळा निश्चित असाव्या. सकाळी योगानसानंतर एका तासाने नाश्ता करावा, त्यात फळे, मोड आलेली धान्ये वा डाळी असावी. दुपारच्या जेवणात गव्हाची रोटी, साध्या वाफवलेल्या भाज्या, सलाड आणि ताक असावे. रोटीपेक्षा सलाड आणि भाज्यांचे प्रमाण जास्त असावे.

५.जेवताना पाणी पिऊ नये. जेवणापूर्वी अर्धा तास अगोदर आणि जेवणानंतर अर्ध्या तासाने पाणी पिण्याची सवय करुन घ्यावी.

६.नियमित सकाळी किंवा संध्याकाळी प्रार्थना, ध्यान धारणा करावी. यामुळे ताण आणि चिंता दूर होतात. तसेच शरीर आणि मन प्रफुल्लित राहते.

७.योगासने आणि शत्कर्मांच्या माध्यमातून अंतर्गत आणि बाह्य शरीर स्वच्छ ठेवले जाऊ शकते.

८.निसर्गावर श्रद्धा ठेवा. यामुळे सकारात्क विचारसरणी निर्माण होऊन आत्मविश्वास वाढतो.

९.आवश्यकतेपेक्षा जास्त आहाराची सवय बंद करा. भूक नाही तर आहार नाही हे तत्व पाळा. भूक लागल्यानंतर अन्नग्रहण करावे तसेच थोडी भूक शिल्लक असताना आहार थांबवावा. हंगामी फळे खाऊन साप्ताहिक उपवास करावा.

१०.जास्तीत जास्त पायी चालण्याचा सल्ला दिला जातो. निरोगी शरीर आणि मनासाठी हे चांगले आहे.

■■■

*ईश्वर एन आचार्य नवी दिल्ली येथील सेंट्रल कौन्सिल फॉर रिसर्च इन योगा अँड नेचरोपथी चे संचालक आहेत तर राजीव रस्तोगी हे सहाय्यक संचालक आहेत.*
*email: ccryn.goi@gmail.com/ rrastogi.2009@gmail.com*



# योगाचे आरोग्य फायदे आणि आंतरराष्ट्रीय महत्त्व

डॉ. ईश्वर. व्ही. बसवरेड्डी



***अनेकांना योग म्हणजे आसने व प्राणायाम एवढा मर्यादित अर्थ लागतो पण योग मन व शरीराचा त्यापलीकडे जाऊन सर्वांगीण विचार करणारा आहे. ती मानवजातीला एक देणगी आहे. एका सामान्य माणसाच्या व्यक्तीमत्वात क्रांतिकारी परिवर्तन आणण्याची ताकद त्यात आहे. आत्मोन्नतीसाठी योग महत्वाचा आहे. विविध देशात माणसाने ज्ञान अर्जित केले. स्वत:वर विजय मिळवतानाच आजूबाजूची स्थितीही बदलली. भारतात आपण ते योगाच्या माध्यमातून साध्य केले.***

योग ही अध्यात्माची एक शाखा आहे, ते एक सूक्ष्म विज्ञान आहे त्यात मन, शरीर व माणूस व निसर्ग यांच्यावर भर दिलेला आहे. आरोग्यदायी जीवनाची ती कला व विज्ञान आहे. योग हा जगण्याच्या सर्व क्षेत्रातील सुसंवादाचा एक मार्ग आहे. त्यात रोग प्रतिबंध, आरोग्य वर्धन व जीवनशैली व्यवस्थापन यांचा समावेश होतो. आज योग हा जगात लोकप्रिय आहे. त्याचे कारण केवळ काही रोग त्यामुळे नियंत्रित होतात किंवा बरे होतात हे नाही तर त्याची योगसाधकाला व्याधीपासून दिलासा देण्याची शक्ती हे आहे. मानसिक, भावनिक ताण यातून नाहीसा होतो व एकूणच आत्मिक सुखासमाधानाचा अनुभव येतो. त्यामुळे आता योगाचा वापर सगळीकडे एक आरोग्यदायी जीवनशैली म्हणून केला जातो. योग हा प्राचीन संस्कृतीचा भाग आहे. त्यात विज्ञानाची जागरूकता आहे, मनाचा समतोल तर आहेच पण त्यातून तुम्हाला नेहमीच्या कामातही उत्कृष्टता साध्य करता येते. अनेकांना योग म्हणजे आसने व प्राणायाम एवढा मर्यादित अर्थ लागतो पण योग मन व शरीराचा त्यापलीकडे जाऊन सर्वांगीण विचार करणारा आहे. ती मानवजातीला एक देणगी आहे. एका सामान्य माणसाच्या व्यक्तीमत्वात क्रांतिकारी परिवर्तन आणण्याची ताकद त्यात आहे. आत्मोन्नतीसाठी योग महत्वाचा आहे. विविध देशात माणसाने ज्ञान अर्जित केले. स्वत:वर विजय मिळवतानाच आजूबाजूची स्थितीही बदलली. भारतात आपण ते योगाच्या माध्यमातून साध्य केले. योग म्हणजे स्वतवर नियंत्रण मिळवणे त्यातून स्वतचा शोध घेता येतो. योगी लोकांनी जे शोधून काढले त्याचा आजच्या जीवनशैलीशी थेट संबंध आहे. मनाच्या आत खोल कुठेतरी शांततेचा अनुभव यातून येतो त्यात जीवनाचा अर्थ, उद्देश समजतो. जीवनातील प्रश्नांची उत्तरे समजतात. जीवन अधिक स्पष्टपणे काळजी घेऊन साथर्पणे जगता येते. योग म्हणजे जगण्याचे विज्ञान व कला आहे.

**प्राचीन व आधुनिक काळातील योग**

योगाची सुरूवात मानवी संस्कृतीपासून झाली असावी. सिंधू संस्कृतीच्या वारशाचा तो परिपाक आहे, त्यातून एहिक व अध्यात्मिक उत्थान सुरू झाले. अनेक तत्वज्ञाने, परंपरा, वारसा, गुरू-शिष्य परंपरा यांची जोड योगाला आहे. ज्ञान योग, भक्तीयोग, कर्मयोग, ध्यानयोग, पतंजली योग, कुंडलिनी योग, हठयोग, मंत्रयोग, लययोग, राजयोग, जैनयोग, बौद्धयोग असे अनेक प्रकार

त्यात आहेत.मार्ग वेगळे असले तरी उद्देश एकच आहे. विविध सामाजिक परंपरा, रूढी भारतात होत्या व आहेत, ही योगाची भूमी आहे. त्याचे प्रतिबिंब आपल्याला परिसंस्थेत दिसते. विचारांची सहिष्णुता, सर्जनशीलतेचा वेगळा दृष्टिकोन यांची जोड त्याला आहे. संपूर्ण आरोग्य, सामाजिक व व्यक्तीगत आरोग्य यांना यात स्थान आहे. योगसाधना हा अर्थपूर्ण जीवनाचा रामबाण उपाय आहे. आजच्या काळात लाखो लोकांना योगाचा फायदा होत आहे. ही योगसाधना आपल्या ऋषीमुनींनी जपली ती आजही टिकून आहे. आज योग हा जगाच्या जीवनशैलीचा एक भाग बनला आहे. योगसाधनेत यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधी, बंध व मुद्रा, शाक्त कर्म, युक्त आहार, युक्त कर्म , मंत्रजप यांचा समावेश आहे.

आधुनिक जीवनशैलीत योगाचे आरोग्य फायदे- आधुनिक जीवनशैलीने आरोग्याचे अनेक प्रश्न निर्माण केले. जगात रोगांचा प्रादुर्भाव वाढला. व्याधी वाढल्या. ताण, वाईट आहार सवयी, शिस्तहीन जीवन यामुळे आरोग्य बिघडत गेले. मधुमेह, अस्थमा, हृदयविकार, चयापचयाचे आजार, कर्करोग वाढले. आधुनिक काळातील या व्याधींवर योग हा रामबाण उपाय आहे का.. आजचे आरोग्याचे प्रश्न हे जुनाट आजाराशी संबंधित असले तरी हे आजार चुकीच्या जीवनशैलीचा परिपाक आहे. त्यावर योग हाच उपाय आहे. त्यात जीवनशैली बदलली जाते. विज्ञान व अध्यात्म हे वेगळे काढता येत नाहीत. जीवनशैलीचे प्रश्न सोडवण्याची क्षमता योगात आहे.त्यात मनोकायिक आजार दूर करता येतात. अनेक संशोधनात असे दिसून आले आहे की, योगाचे वैज्ञानिक आधारावर सिद्ध झालेले फायदे आहेत ते दाखवता येतात. रोग प्रतिबंध, व्यवस्थापन, आरोग्यवर्धन, शारीरिक व जैवरासायनिक, मानसिक व वैद्यकीय घटक यांच्यात योगामुळे बदल होतात. अभ्यासात असे दिसून आले की, योगामुळे चेतासंस्था व रसपरिपोष यंत्रणेच्या माध्यमातून शरीरातील पेशींवर चांगला परिणाम होतो. योगामुळे मानसिक रोगातील चढउतारांना सहज सामोरे जाता येते, वार्धक्य लांबवता येते. ताणाच्या नियंत्रणासाठी योग हाच एक उपाय आहे. शारीरिक व बोधनात्मक स्थितीही यात सुधारते. शरीराची लवचिकता, वातावरणातील तपमानाच्या चढउतारांना तोंड देण्याची क्षमता वाढते. योग हा पारंपरिक उपचार पद्धतींना पूरक म्हणून काम करताना रक्तदाब नियंत्रित ठेवतो, मधुमेहावर नियंत्रण मिळवता येते.

***योगसाधना हा अर्थपूर्ण जीवनाचा रामबाण उपाय आहे. आजच्या काळात लाखो लोकांना योगाचा फायदा होत आहे. ही योगसाधना आपल्या ऋषीमुनींनी जपली ती आजही टिकून आहे. आज योग हा जगाच्या जीवनशैलीचा एक भाग बनला आहे. योगसाधनेत यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधी, बंध व मुद्रा, शाक्त कर्म, युक्त आहार, युक्त कर्म , मंत्रजप यांचा समावेश आहे.***

**योगाचे फायदे खालीलप्रमाणे**

१ लवचिकता वाढते

२ स्नायूंची शक्ती वाढून शरीरास घाटदारपणा येतो.

३ श्वसनाचे विकार दूर होऊन शरीराची उर्जा वाढते.

४ चयापचयाच्या क्रियेत समतोल येतो

५. वजन कमी करता येते.

६. हृदयाचे आरोग्य सुधारते

७. क्रीडापटूंची लवचिकता स्थिती सुधारते.

८. रोगप्रतिकारशक्ती वाढते.

योगाचे काही मानसिक व अध्यात्मिक फायदे आहेत.

१. ताणमुक्तीचा अनुभव मिळतो.

२. मनातील निराशा जाऊन आशा निर्माण होते व प्रत्येक क्षण आनंदाने जगण्याची कला साध्य होते.

३. मनाचे नियंत्रण सोपे होते व विचारांचे नियंत्रणही करता येते.

४. मानसिक व वैचारिक स्पष्टता येते.

५. एकाग्रता वाढते

६. स्वयंशिस्त वाढते.

७. सर्जनशीलता वाढते.

८. माणसाचे मूड बदलतात व समाधानाची भावना निर्माण होते.

९. स्वजागृती वाढते

१०. आत्मविश्वास वाढतो

११. आशावाद निर्माण होतो.

१२. मानसिक क्षमता व इच्छाशक्ती वाढते.

१३. स्किझोफ्रेनिया, एडीएचडी या रोगांच्या उपाचार फायदा होतो.

१४. नैराश्य व अवसाद दूर होतो.

१५. आत्मज्ञान वाढते.

१६. शरीरातील ऊर्जा केंद्रे चांगली काम करतात.

१७. जीवनातील सकारात्मक अनुभवाचा विस्तार होत जातो.

१८. जीवनाचा अर्थ समजण्यास व त्याचा आनंद घेण्यास मदत होते.

१९. अबोध मनाशी सुसंगतता व संवाद साधता येतो.

२०. इतर लोकांशी असलेली आपली वागणूक सुधारत जाते. त्यांच्याशी आपण जोडले जातो. एकटेपणा कमी होतो.

**निष्कर्ष-** भारत हा जास्त लोकसंख्येचा देश आहे. त्यात युवकांची संख्या अधिक आहे, ते आरोग्याच्या गोष्टीत रस घेऊ लागले आहेत, व्यक्तीमत्व विकासाला त्यामुळे चालना मिळत आहे. तरूणपिढीला योगासनांच्या मदतीने जीवनशैली बदलण्यास आवडते कारण त्यामुळे जीवनातील ताण कमी होतो, कामगिरी सुधारते. योगाच्या प्रसारासाठी सरकारने अनेक उपाययोजना केल्या आहेत. आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्याने योगाच्या प्रसारास उत्तेजन मिळाले आहे. योग दिनाच्या निमित्ताने जगातील योग शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा फायदा सर्वांनाच मिळतो. आयुष मंत्रालयाने 'क्वालिटी कंट्रोल ऑफ इंडिया'च्या माध्यमातून योग व्यावसायिकांना प्रमाणपत्रे देण्यास सुरूवात केली आहे. आयुष मंत्रालयाने देशातील सर्व रूग्णालये जोडण्याचे ठरवले आहे. लष्कर, निमलष्करी दले, पोलिस यांना योगाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. योग प्रशिक्षण कार्यक्रम नवी दिल्लीत गृह कल्याण केंद्रात कार्मिक व प्रशिक्षण केंद्राने सुरू केला आहे. योगाच्या सहा केंद्रीय संशोधन संस्था असून

***आयुष मंत्रालयाने देशातील सर्व रूग्णालये जोडण्याचे ठरवले आहे. लष्कर, निमलष्करी दले, पोलिस यांना योगाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. योग प्रशिक्षण कार्यक्रम नवी दिल्लीत गृह कल्याण केंद्रात कार्मिक व प्रशिक्षण केंद्राने सुरू केला आहे. योगाच्या सहा केंद्रीय संशोधन संस्था असून जागतिक आरोग्य संघटना योगासारख्या प्राचीन विद्येवर आरोग्याच्या दृष्टिकोनातून भर देत आहे.***

जागतिक आरोग्य संघटना योगासारख्या प्राचीन विद्येवर आरोग्याच्या दृष्टिकोनातून भर देत आहे. काळाच्या कसोटीवर खऱ्या उतरलेल्या योग पद्धतीवर भर देणे महत्वाचे आहे, केवळ पुरावे नाहीत म्हणून त्याकडे दुर्लक्ष करता येत नाही. योगाची क्षमता व सामर्थ्य यात विचारात घेणे महत्वाचे आहे, धोरणात्मक उपाय व वापर यामुळे योगाच्या वापरात सातत्य येत आहे. योगाच्या प्रसारासाठी प्रशासकीय यंत्रणाही सज्ज आहे व सरकारचा योगाला शाश्वत पाठिंबा आहे. ज्यांचे मन शांत आहे असे लोक शांत व प्रगती करणारी कुटुंबे निर्माण करू शकतात. योगसाधना कुटुंब, समाज, देश यांच्यात सुसंवाद निर्माण करीत असते.

■■■

*लेखक आयुष मंत्रालय, भारत सरकारच्या मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्थेचे संचालक आहेत.*
*email : ibasavaraddi@yahoo.co.in*



# योग प्रशिक्षकांचे मूल्यमापन आणि प्रमाणीकरण

डॉ. रवी पी. सिंह, डॉ. मनीष पांडे



***योग हा भारतीय संस्कृतीचं कोंदण लाभलेला अध्यात्म व संन्यस्त शिस्त यांचा संगम आहे. योगाचे काही प्रकार असे आहेत ज्यात श्वास नियंत्रण, साधी ध्यानधारणा व काही शारीरिक रचना म्हणजे आसने यांचा वापर केला जातो. जगात योगाचा वापर मानसिक शांती व आरोग्य सुधारणेसाठी केला जातो.***

भारतातील प्राचीन लेखनात योग विद्येचा उल्लेख दिसून येतो. काही शतकांपूर्वी योग ही एक विद्याशाखा म्हणून उदयास आली. योगाबाबतचे साहित्य अनेक वर्षांपूर्वीचे असून त्यात भारतातील प्राचीन ग्रंथांचा उल्लेख आहे. योगाची सार्वत्रिकता, लोकप्रियता व त्याचे मानवी मनावरील चांगले परिणाम हे जगात मान्य केले गेलेले आहेत. पण योग हा जीवन बदलून टाकणारा एक अनुभव म्हणून कसा विकसित होत गेला याविषयी फारसे कुणाला माहिती नाही.मानवी संस्कृतीच्या कल्याणाची ताकद या योगविद्येत आहे.

योग हा शब्द संस्कृतातील युज या शब्दापासून तयार झाला आहे. युज म्हणजे एकात्मकता. योग हा भारतीय संस्कृतीचं कोंदण लाभलेला अध्यात्म व संन्यस्त शिस्त यांचा संगम आहे. योगाचे काही प्रकार असे आहेत ज्यात श्वास नियंत्रण, साधी ध्यानधारणा व काही शारीरिक रचना म्हणजे आसने यांचा वापर केला जातो. जगात योगाचा वापर मानसिक शांती व आरोग्य सुधारणेसाठी केला जातो. पतंजली ऋषींनी योगाची व्याख्या चित्त वृत्ती निरोध: अशी केली आहे. त्याचा अर्थ योग म्हणजे मनाचा विचलितपणा थांबवणे. चित्त म्हणजे मन व वृत्ती म्हणजे आवेग किंवा प्रेरणा. निरोध म्हणजे थांबवणे.

योग कधी सुरू झाला किंवा त्याचा इतिहास काय आहे याबाबत अनेक तर्कवितर्क केले जातात पण योग परंपरा फार जुनी आहे. जेवढी आपण समजतो त्यापेक्षाही जुनी. महाभारत, भगवदगीता या प्राचीन ग्रंथात योगाचा उल्लेख सापडतो. गीता योगाचे तीन प्रकार सांगते त्यात कर्मयोग, भक्तीयोग व ज्ञानयोग यांचा समावेश आहे. योग हा जीवनाचा एक मार्ग आहे व त्याचा उल्लेख ख्रि.पू १९०० ते ११०० दरम्यान वेदांमध्ये आढळतो. शास्त्रोक्त योगाचा उल्लेख पंतजलीच्या योगसूत्रात आहे त्यात आठ मार्ग सांगितले असून यम, नियम,आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधी यांचा समावेश आहे.योगात राजयोग महत्वाचा असून त्यात अष्टांग योगाचा समावेश होतो. योगाचा तत्त्वज्ञानाधिष्ठित पाया कपील ऋषींच्या सांख्य तत्वज्ञानाशी संबंधित आहे. योगात मनावर लक्ष केंद्रित हवे, पंतजली यांच्या मते योग म्हणजे मानसिक आंदोलन रोखणे व विचारांचे भरकटणे थांबवणे. योगसूत्रात मनावर लक्ष केंद्रित केले आहे तर नंतरच्या परंपरेत हठयोग म्हणजे शरीराच्या अवघड रचना म्हणजे आसनांवर भर दिला आहे. आजकाल योग हा वैश्विक प्राणशक्ती वाढवण्यासाठी वापरला जातो ज्याला कुंडलिनी असे म्हणतात.

मानसिक व शारीरिक व्यायामातून हे साध्य होते. शारीरिक पातळीवर योगासने हे शरीर आरोग्यदायी ठेवतात. मानसिक पातळीवर श्वसनाचे व्यायाम, प्राणायाम, ध्यानधारणा किंवा ध्यान यांना महत्व आहे. योग जगात लोकप्रिय ठरला आहे. चांगले जीवनमान मिळवण्यासाठी योगसाधनेचा वापर केला जातो. योगसाधनेवर लोकांचा विश्वास टिकवण्यासाठी त्याची पार्श्वभूमी माहिती असणे गरजेचे आहे व त्यासाठी योग प्रशिक्षक घडवणे महत्वाचे आहे. योगसाधकही तयार करणे महत्वाचे आहे. जगभरात ही प्रक्रिया घडणे आवश्यक आहे. त्यासाठी योगप्रशिक्षण देणाऱ्या गुरूंची फळी तयार करणे गरजेचे आहे, नवे साधक तयार करणे गरजेचे आहे, किंबहुना त्यासाठी अनुकूल स्थिती असली पाहिजे. त्यामुळे जगातील या प्राचीन परंपरेचा फायदा सगळ्यांना होईल. योगाच्या प्रसारासाठी अनुकूलता निर्माण करण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे त्यासाठी योग शिक्षकांचे मूल्यमापन करून त्यांना प्रमाणपत्रे देणे गरजेचे आहे. योगासने का करायची आणि कशी करायची याचे ज्ञान असलेल्यांना योगासने शिकवण्याची परवानगी दिली पाहिजे. त्याला प्रमाणीकरणाचे अधिष्ठान असावे. जागतिक पातळीवर मान्य पद्धतींचा वापर करून योगप्रशिक्षकांचे मूल्यमापन झाले पाहिजे.त्यांचे योगज्ञान, कौशल्य, परिपक्वता ही तपासली गेली पाहिजे. योग प्रशिक्षक, योगशिक्षक, योगाचार्य असे तीन प्रकार यात करता येतील. प्रशिक्षक ते आचार्य ही चढती कमान यात असेल, त्यात अनुभवालाही महत्व असेल.योगप्रशिक्षणासाठी संस्थात्मक पायाभूत यंत्रणा महत्वाची आहे त्यातून पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे देता येतील. सर्व संस्था सारख्या गुणवत्तेच्या नसतात त्यात योगाचे ज्ञान व प्रात्यक्षिके शिकवली जातील त्यात पातळी कमी जास्त असू शकेल पण अचूक साधनेला पर्याय नसेल.योगात जीवन बदलून टाकण्याची ताकद आहे, शाश्वत जीवनमूल्ये यात जपली जातील. केवळ भौतिक सुखांना महत्व दिले जाणार नाही. या संस्थांना मान्यता मिळाल्यानंतर त्यांना प्रशिक्षण देण्याची परवानगी राहील. योगशाळा प्रमाणपत्र योजना चार पातळ्यांवर राबवता येईल त्यात मूलभूत योग शिकवणे ही पहिली पातळी असेल त्यात प्रशिक्षक

---

***योगासने का करायची आणि कशी करायची याचे ज्ञान असलेल्यांना योगासने शिकवण्याची परवानगी दिली पाहिजे. त्याला प्रमाणीकरणाचे अधिष्ठान असावे. जागतिक पातळीवर मान्य पद्धतींचा वापर करून योगप्रशिक्षकांचे मूल्यमापन झाले पाहिजे.त्यांचे योगज्ञान, कौशल्य, परिपक्वता ही तपासली गेली पाहिजे. योग प्रशिक्षक, योगशिक्षक, योगाचार्य असे तीन प्रकार यात करता येतील.***

---

व शिक्षक या दोन पातळ्यांवर योग व्यावसायिकांसाठी स्वयं प्रमाणीकरण योजना असेल. दुसऱ्या पातळीवर योग शाळा मूलभूत प्रशिक्षणसह जास्त काळासाठी योग शिक्षणाचे निकष पूर्ण करतील. पन्नास टक्के योगसंस्थांसाठी शिक्षण व प्रशिक्षणाचे परवाने देता येतील यात आयएसओ २९९९०-२०१० चा समावेश असेल. तिसऱ्या पातळीवर बरीच परिपक्वता राहील. त्यात विशिष्ट अपेक्षेनुसार योग शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रम आखले जातील . आश्रम पातळीवर सर्वोच्च प्रशिक्षणाचा बिंदू राहील. त्यात २०० तास किंवा त्याहून अधिक कालावधीचे अभ्यासक्रम असतील . प्रत्येक पातळीवरचे निकष वेगळे असतील. विद्यार्थ्यांना योगाचा फायदा व्हावा यासाठी मान्यता प्राप्त शाळातून बाहेर पडताना योग प्रशिक्षक प्रमाणपत्र दिले जाईल व त्यात त्यांच्या मुलाखती घेतल्या जातील. त्याशिवाय त्यांना प्रात्यक्षिकांचे ज्ञान किती आहे हे पाहिले जाईल.

**आव्हाने**

योगप्रशिक्षकांचे मूल्यमापन हे एक आव्हान आहे, एखाद्या विद्यार्थ्याने गुरूकडून मिळवलेल्या ज्ञानात पारंगतता संपादन केली की नाही हे ठरवणे सोपे नाही. संबंधित व्यक्तीचे मनावर नियंत्रण कितपत प्रस्थापित झाले आहे हे बाहेरून समजू शकत नाही किंवा ते मोजता येत नाही. मनोवृत्तींचे परीक्षण अवघड आहे. योग प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र देताना प्रायोगिक अनुभव, ज्ञान, योगकौशल्ये यांचा विचार करावा लागेल. यात वस्तुनिष्ठता तपासणे अवघड आहे, ज्ञानाची खोली व त्याचा लावलेला अर्थ महत्वाचा आहे. दुसरे महत्वाचे आव्हान म्हणजे योग ही प्रयोगात्मक विद्याशाखा असल्याने योगकौशल्यांचे प्रमाणीकरण करावे लागेल त्यात योगसाधना वस्तुनिष्ठ करण्याचा प्रयत्न होऊ शकतो पण प्रत्यक्षात योग वस्तुनिष्ठ नसतो. योग संस्था जे शिक्षण किंवा प्रशिक्षण देतात त्यातही अनेक बाबी महत्वाच्या आहेत. देशात व जगात अनेक चांगल्या योग संस्था आहेत त्या लहान मोठ्या आहेत. ते सध्या योग प्रशिक्षण देत आहेत. योग शिक्षकही घडवत आहेत. या संस्थांचे अभ्यासक्रम वेगवेगळे असतात, त्यांचा आशय निराळा असतो, त्यामुळे त्यात सर्वसमावेशकता येते असे म्हणता

येत असले तरी साधकांच्या मनात खरा योग कोणता याबाबत प्रश्न निर्माण होऊ शकतात. शिक्षकांची तज्ञता व कौशल्ये तसेच ज्ञान वेगळे असू शकते त्यामुळे संस्थेनुसार त्यात फरक होतात. जेव्हा योगासारखी एखादी गोष्ट लोकप्रिय होते तेव्हा समाजातील विविध घटकात त्याचा वेगवेगळा अर्थ लावला जाऊ शकतो त्यामुळे त्याचे शिक्षण व प्रशिक्षण यात गुणवत्ता बाजूला पडू शकते पण गेली अनेक शतके जोपसल्या गेलेल्या योगक्षेत्रात असे घडणे घातक ठरू शकते. त्यात गुणवत्तेशी अजिबात तडजोड होता कामा नये. गेली काही वर्षे भारतातील योगगुरू हे देशात व परदेशात योगाचा अर्थ सांगत आहेत. तो अर्थ अनुयायी स्वीकारत आहेत. या योगपरंपरेतून मनशांती मिळत आहे. काहीवेळा हे शिकवणे स्वानुभवावर आधारित असू शकते, वेगवेगळ्या आश्रम किंवा संस्थात योग वेगळा असू शकतो. पण योगसाधना ही तंत्रशुद्ध असली पाहिजे, एकसमान असली पाहिजे तरच योगाची एकसमान छबी तयार करता येईल, हा मुद्दा महत्वाचा आहे. त्यात प्रमाणीकरण करण्यासाठी वैज्ञानिक तंत्रशुद्धता महत्वाची आहे. ही सगळी आव्हाने पाहिली तर प्रमाणीकरणासाठी योगाचा आत्माच बदलणे योग्य नाही विविध शाळा आश्रमांची वैशिष्ट्ये काढण्याची गरज नाही, त्यातील वैज्ञानिक, तात्विक, प्रायोगिक व अध्यात्मिक गोष्टी गमावल्या जाणार नाहीत हे पाहिले पाहिजे. प्रायोगिकता यात महत्वाची आहे योगाला विश्वात्मक पातळीवर समान प्रतिसादासाठी त्यातील काही गोष्टी वगळणे चुकीचे आहे. मूलभूत बाबींना फाटा देता कामा नये.

**उपाय-** योगाची लोकप्रियता जगात वाढत आहे. एकवीस जून हा संयुक्त राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय योग दिन जाहीर केला आहे. भारत हा जगात योगक्षेत्रात प्रमुख देश आहे. त्यामुळे आपल्यावर योगाच्या जपणुकीची व प्रसाराची जबाबदारी आहे. आंतरराष्ट्रीय योग दिनी २०१५ मध्ये एक जाहीरनामा प्रसारित केला होता त्या अनुषंगाने आयुष मंत्रालयाने योग प्रशिक्षक व योग संस्था यांच्या प्रमाणीकरणासाठी भारतीय दर्जा नियंत्रण मंडळाची (क्यूसीआय) मान्यता आवश्यक केली आहे. दर्जात्मक नियंत्रणासाठी ही संस्था जगातील उत्कृष्ट मापदंड वापरत असते. स्वयंसेवी योग व्यावसायिक प्रमाणन योजनेत योग प्रशिक्षकांच्या क्षमता तपासल्या जाणार असून ते देत असलेले योग प्रशिक्षण, शिक्षक म्हणून त्यांना मिळालेले प्रशिक्षण, त्यांचा योगाभ्यास यांचे मूल्यमापन औपचारिक व अनौपचारिक माध्यमातून करता येईल. योगाचा वैद्यकीय उपचार म्हणून वापर करण्याचे ज्ञान, संबंधित व्यक्तींच्या गरजा ओळखून प्रशिक्षण देण्याची हातोटी महत्वाची आहे.

***गेली काही वर्षे भारतातील योगगुरू हे देशात व परदेशात योगाचा अर्थ सांगत आहेत. तो अर्थ अनुयायी स्वीकारत आहेत. या योगपरंपरेतून मनशांती मिळत आहे. काहीवेळा हे शिकवणे स्वानुभवावर आधारित असू शकते, वेगवेगळ्या आश्रम किंवा संस्थात योग वेगळा असू शकतो. पण योगसाधना ही तंत्रशुद्ध असली पाहिजे, एकसमान असली पाहिजे तरच योगाची एकसमान छबी तयार करता येईल, हा मुद्दा महत्वाचा आहे. त्यात प्रमाणीकरण करण्यासाठी वैज्ञानिक तंत्रशुद्धता महत्वाची आहे.***

आयएसओ १७०२४-२०१२ अन्वये प्रमाणीकरणासाठी काही गरजांची पूर्तता करणे आवश्यक आहे. क्यूसीआयच्या योग प्रशिक्षण प्रमाणीकरण निकषांची अंमलबजावणी विविध पातळ्यावर करता येईल त्यात योग कौशल्ये व ज्ञान यासाठी योग प्रशिक्षकांकरता कोणत्या गोष्टी त्यांची संस्था कुठली आहे हे न बघताही आवश्यक आहेत हे ठरवता येईल. त्यांनी शिक्षण कुठूनही घेतलेले असो त्यांना काही गोष्टींचे ज्ञान असलेच पाहिजे अशा बाबी ठरवता येतील. प्रमाणीकरण हे योगाच्या सैध्दांतिक व प्रायोगिक प्रशिक्षकांसाठी आवश्यक आहे. त्यामुळे कौशल्ये व ज्ञान याबाबत योगाची पातळी राखली जाईल. योगाच्या प्रमाणीकरणातही काही पातळ्या ठरवता येतील. योग संस्थांचे प्रमाणीकरण ही मूलभूत तत्वांची सांगड घालण्याचा एक प्रयत्न असेल. योग प्रशिक्षण हे काही घटकांवर आधारित असले पाहिजे. त्यात संस्थात्मक पातळीवरही काही घटक समान असू शकतात. सरावावर आधारित अशा योगविद्येत मानवी शरीर व मनाच्या पातळीवर भर दिला जातो. त्याचे नियम निश्चित करताना बाजारपेठीय शक्तींचा त्यात शिरकाव होता कामा नये. तसे झाले तर योगाची शुद्धता व परिणामकारकता राहणार नाही, त्याचा मूळ आत्माच हरवून बसल्यासारखे होईल. योग प्रमाणीकरणात अभ्यासक्रम ठरवताना योगाच्या अस्सलतेवर भर दिला पाहिजे. योग संस्थांचे प्रमाणीकरण हे प्रमाणित निकषांवर करताना साधक व संस्थेने अवलंबलेल्या प्रक्रिया यांचे महत्व आहे. प्रमाणके ही प्रशिक्षण सेवा सुविधांवर आधारित असतील किती पर्याय उपलब्ध आहेत यालाही महत्व राहील. संस्थेच्या कार्यक्षमतेला महत्व राहील त्यातून एक अभ्यासाची रचना व प्रशिक्षण यांचा

विकास करता येईल व मग मूल्यमापन शक्य होईल. त्यात कौशल्ये व ज्ञान तपासता येईल. प्रशिक्षकाने वापरलेल्या पद्धती व साधकाला त्यातून झालेला फायदा यावर भर दिला जाईल. या सगळ्या योजनेत योगाचा वारसा शास्त्रोक्त पद्धतीने जपला जाईल हे महत्वाचे आहे. जे प्रशिक्षण दिले त्याचा परिणाम काय झाला हे तपासणे महत्वाचे ठरेल. विविध व्यक्ती व संस्था यांना योग प्रशिक्षकांची किंवा योग संस्थांची निवड करण्यास मदत करणे हा यातील एक हेतू आहे व त्यात क्षमता विकास व सक्षमता महत्वाची आहे. क्यूसीआय ही संस्था योग व्यावसायिक व योग संस्था यांना जागतिक तत्वांच्या आधारे त्रयस्थ मूल्यमापनासाठी प्रमाणन योजना उपलब्ध करून देईल. योग प्रशिक्षण सक्षमतेच्या गरजा ठरवणे यात महत्वाचे आहे. एखाद्या योगसंस्थेतील योग शिक्षकाकडे कोणती पात्रता असावी याचबरोबर संस्थेत कुठली साधनसामुग्री व किती जागा असावी यावरही बरेच काही अवलंबून आहे. प्रमाणीकरण प्रक्रिया निश्चित करावी लागेल. क्यूसीआयने यासाठी एक समिती स्थापन केली असून त्यात योजनेचा आराखडा तयार केला जाईल. या समित्यात योग प्रशिक्षक, योगशाळा, आयुष मंत्रालय, व्यापार मंत्रालय, शैक्षणिक संस्था, ग्राहक संघटना व प्रमाणन संस्था यांच्या प्रतिनिधींचा समावेश असेल. याबाबत एक सल्लागार समितीही असेल. क्यूसीआयने प्रमाणन योजनेसाठी काही गोष्टी निश्चित केल्या आहेत.

**संचालन यंत्रणा-** घटक, भूमिका, संबंधित संस्था व समित्यांची जबाबदारी.

**प्रमाणन प्रक्रिया-** प्राथमिक मूल्यमापन, परीक्षणाचा कालावधी व परीक्षकांच्या पात्रता

**प्रमाणन निकष-** तांत्रिक समिती व तज्ज्ञांशी सल्लामसलतीनंतर निकष ठरवणे.

प्रमाणन संस्थांच्या पात्रता- यासाठी एक संकेतस्थळ तयार करण्यात आले आहे त्यावर सर्व माहिती www.yogacertification.qci.org.in.

**संधी-** प्रमाणित योगशिक्षकांना प्रोत्साहन

भारत सरकारने क्यूसीआय योजनेला पाठिंबा दिला आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर या योजनेचा वापर केला जाईल. ज्या योगशिक्षकांना प्रमाणपत्र दिले जाईल त्यावर आयुष मंत्रालयाचे चिन्ह राहील व त्यामुळे या प्रमाणपत्राला विश्वासार्हता राहणार आहे. सरकार योग प्रशिक्षकांना प्रोत्साहन देईल व त्यात सरकारी नोकरभरतीत त्यांना प्राधान्य दिले जाणार असून सध्या जे योगप्रशिक्षक आहेत त्यांना क्यूसीआय योग व्यावसायिक प्रमाणन घ्यावे लागणार आहे. सीबीएसइ, केंद्रीय विद्यालय संघटन यात या प्रमाणपत्राला महत्व देण्यास सांगण्यात आले आहे. गृहमंत्रालय, परराष्ट्र मंत्रालय यांनी योग प्रशिक्षकांना व्हिसा देताना सवलती द्याव्यात असे सांगण्यात आले आहे. भारतीय सांस्कृतिक संबंध मंडळास परदेशातील योग नेमणुका किंवा त्यासंबंधी कामाकरिता जाताना योग योजनेनुसार प्रमाणन करण्यास सांगण्यात आले आहे. आयुष मंत्रालयाने पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण होणाऱ्या पहिल्या दोन हजार जणांना क्यूसीआय शुल्काची प्रतिपूर्ती करून देण्याचे जाहीर केले आहे. क्यूसीआयच्या मते योग व्यावसायिक योजना जागतिक पातळीवर सुरू झाली आहे. क्यूसीआयच्या चमूने जपानला भेट देऊन १३ योग प्रशिक्षक किंवा व्यावसायिकांना मूल्यमापनानंतर प्रमाणपत्रही दिले आहे. कालांतराने ही विद्यापीठे योग अभ्यासक्रम चालू करतील, ज्या योग संस्था, शाळा, हेल्थ स्पा, योग स्टुडिओ योग प्रशिक्षण सुरू करतील तेव्हा त्यांना क्यूसीआयने योग योजनेत प्रमाणित केलेल्या व्यावसायिकांना किंवा प्रशिक्षकांनाच कामावर ठेवता येईल मग ते प्रशिक्षण औपचारिक किंवा अनौपचारिक असले तरी त्यात ही अट लागू राहील.

डॉ. रवि पी. सिंग क्वॉलिटी कौन्सिल ऑफ इंडियाचे महासचिव असून केंद्र सरकारच्या अनेक योजनांमध्ये त्यांची महत्वाची भूमिका आहे.

■■■

*डॉ. रवि पी सिंग क्वॉलिटी कौन्सिल ऑफ इंडियाचे महासचिव असून केंद्र सरकारच्या अनेक योजनांमध्ये त्यांची महत्वाची भूमिका आहे.*

*डॉ. मनिष पांडे हे क्वॉलिटी कौन्सिल ऑफ इंडियाचे संयुक्त सचिव असून केंद्र सरकारच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीत त्यांचा सहभाग आहे.*

*email: sg@qcin.org,manish/pande@qcin.org*

**प्रकाशन विभागाची नवी पुस्तके**

१. छत्रपती शिवाजी महाराज (हिंदी) ₹ ९५/-

**अन्य काही पुस्तके**

१. भारतेंदू हरिश्चंद्र (हिंदी) ₹ ११०/-

२. आपला राष्ट्रीय ध्वज (मराठी) ₹ ११०/-

# भारताच्या आश्वासक वाटचालीचे विविध पैलू

डॉ. शिवाजी भ. यादव



***जागतिक मंदीचा फटका भारतीय अर्थव्यवस्थेला मोठया प्रमाणात बसला नाही. येणाऱ्या पंधरा वर्षात जगातील सर्वात मोठी तिसरी अर्थव्यवस्था म्हणून भारताकडे पाहिले जाते. देशातील विविध घटकात होणाऱ्या बदलावरून भारतीय अर्थव्यवस्था तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून उदयाला येऊ शकते.***

जगातील कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्था वाढीवर देशांतर्गत व देशाबाहेरील घटकांचा परिणाम होत असतो. मागील दोन वर्षात केंद्र सरकारने राबविलेल्या जनकल्याणकारी योजनामूळे देशात आशादायी वातावरणाची निर्मिती झाली आहे. हे ब्रिटन मधील सेंटर फॉर इकॉनॉमिक बिझनेस अँन्ड रिसर्च या संस्थेने नूकताच एक अहवाल प्रकाशित केला यावरून दिसते. सीईबीआरने अहवालात म्हटले आहे की पंधरा वर्षानंतर सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून चीनच्या अर्थव्यवस्थेचा पहिला क्रमांक तर भारतीय अर्थव्यवस्थेचा तिसरा क्रमांक जीडीपीनुसार होणार असून पहिल्या क्रमांकावर असणारी अमेरिका दुसऱ्या क्रमांकावर येणार आहे. सध्या भारतीय अर्थव्यवस्थेचा सातवा व चीनचा दूसरा क्रमांक आहे.

पंधरा वर्षात चीनची अर्थव्यवस्था ३४३३८ अब्ज डॉलर, अमेरिका अर्थव्यवस्था ३२९९६ अब्ज डॉलर व भारताची अर्थव्यवस्था १०१३३ अब्ज डॉलरची असणार आहे. यामध्ये चीन अर्थव्यवस्थेचा जीडीपी ३ पटीने, अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेचा जीडीपी जवळपास २ पटीने व भारतीय अर्थव्यवस्थेच्या जीडीपीत साडेचार पटीने वाढ होईल असे अहवालात नमूद करण्यात आले आहे. यावरून आर्थिक महासत्ता असणाऱ्या अमेरिका व महासत्ता होऊ पाहणाऱ्या चीनच्या जीडीपीपेक्षा भारताच्या जीडीपीतील वाढ वाखण्याजोगी ठरणार आहे. मागील दोन वर्षात आर्थिक विकासाच्या दरातील वाढ पुढील काळात टिकून राहिल असे वाटते. जागतिक अस्थिरता, आंतरराष्ट्रीय व्यापारात चढ-उतार, शेती उत्पादनातील चढ-उतार अशी अनेक आव्हाने पेलून मेक इन इंडिया, स्मार्ट सिटी, अटल पेन्शन योजना, थेट गॅस सबसिडी या योजना राबवून सरकार करत असलेली कार्ये लोकांपर्यंत पोहचविली जात आहेत. परकिय गुंतवणूकीच्या ओघाने देशाच्या विकासाला चालना मिळाली आहे.

जागतिक मंदीचा फटका अमेरिका, चीन, जपान, ग्रीस आदी देशांना इतर विकसनशील देशापेक्षा जास्त बसला. मंदीमूळे जगामध्ये नैराश्याचे वातावरण तयार झाले आहे. यातून बाहेर पडण्यासाठी प्रत्येक देशाला प्रयत्न करणे आवश्यक आहे. जागतिक मंदीचा फटका भारतीय अर्थव्यवस्थेला मोठया प्रमाणात बसला नाही. येणाऱ्या पंधरा वर्षात जगातील सर्वात मोठी तिसरी अर्थव्यवस्था म्हणून भारताकडे पाहिले जाते. देशातील विविध घटकात होणाऱ्या बदलावरून

भारतीय अर्थव्यवस्था तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून उदयाला येऊ शकते. सन २०१२-१३ व २०१३-१४ या वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास दर ५ टक्क्यांपेक्षा जास्त राहिला नाही पण २०१४-१५ व २०१५-१६ या वर्षात आर्थिक विकासाचा दर ५ टक्क्यांपेक्षा जास्त राहिला आहे. चालु वर्षी 'मुडीज' ने भारतीय अर्थव्यवस्थेचा विकासदर ७.५ टक्के राहिला असा अंदाज व्यक्त केला आहे. हे भारताची आश्वासक वाटचाल दर्शविणारे आहे. बहुतांश आशियाई बाजारपेठेमध्ये उत्पादनाची स्थिती सुधारत असून त्यात मोठे बदल घडून येत आहेत. शिवाय त्यासंबंधीत सरकारकडून उद्योगांसाठी पुरक वातावरण निर्मिती करण्यात येत आहे. त्याचाही सकारात्मक परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेत दिसून येतो. देशांतर्गत वस्तूंना वाढती मागणी हे प्रामुख्याने कारणीभूत असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. उद्योगांना पूरक धोरणांची निर्मिती केल्याने उद्योजक सुखावला आहे. जगभरातील एकूण मागणीच्या ४० टक्के उत्पादन एकट्या आशिया खंडात केले जाते. मात्र जागतिक संपत्तीपैकी केवळ दोन तृतीयांश संपत्तीची निर्मिती होते. यावरून आशिया खंडाला आयात निर्यातीच्या माध्यमातून संपत्तीमध्ये वाढ करता येऊ शकते. आशिया खंडात भारत आणि चीन हे दोन देश आर्थिकदृष्टया शक्तीशाली आहेत. गेल्या दोन वर्षात सत्तेत आलेल्या सरकारने परकीय गुंतवणूकीला प्रोत्साहन, स्मार्ट सिटी, मेक इन इंडिया, अटल पेन्शन योजना, थेट गॅस सबसिडी, गोल्ड मॉनिटायझेशन, पंतप्रधान सुरक्षा विमा योजना, दळणवळणाच्या वाढत्या सोयी, अशा अनेक योजना राबविल्याने देशाची शाश्वत विकासाकडे वाटचाल सुरू झाली आहे.

**आश्वासक वाटचालाचे विविध पैलू**

**मेक इन इंडियामूळे एफडीआयमध्ये वाढ :**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मेक इन इंडिया या महत्वाकांक्षी मोहिमेचा प्रभाव दिसण्यास सुरूवात झाली आहे. या विषयाचे प्रमाणपत्र जागतिक रेटिंग एजन्सी मुडीज ने दिले आहे. केंद्र सरकारने आर्थिक सुधारणांच्या संदर्भात उचललेली पावले आणि विदेशी गुंतवणूकीला दिलेले प्रोत्साहन या पार्श्वभूमीवर २०१६-१७ या आर्थिक वर्षात देशातील थेट परकीय गुंतवणूक ३८ अब्ज डॉलरवर जाण्याची शक्यता आहे. २०१५-१६ मध्ये परकीय गुंतवणूक ३६ अब्ज डॉलर इतकी होती, तर २०१४-१५ मध्ये हीच गुंतवणूक ३१ अब्ज डॉलरवर स्थिरावली होती. असे कोटक इन्स्टिटयुशनल इक्विटिजच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. केंद्र सरकारने आर्थिक क्षेत्रात आरंभलेल्या सुधारणा आणि विदेशी ऊद्योगांना दिलेले प्राधान्य यामुळे थेट परकीय गुंतवणूकीत वाढ होत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. चालू वर्षात देशाचे स्थान आशियामध्ये वरचे राहिले. आगामी दोन ते तीन वर्षात फॉक्सकॉन तर्फे पाच अब्ज डॉलर व अल्स्टॉम ५.९ अब्ज डॉलर गुंतवणूक होणार आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा परकीय गुंतवणूकीत साडेचार टक्क्यांनी वाढ होण्याची शक्यता आहे. परकीय गुंतवणूकदार इतर देशांच्या तुलनेत भारताला अधिक पसंती दर्शवितात. यावरून केंद्राने राबविलेल्या 'मेक इन इंडिया' या महत्वपूर्ण योजनेची फलश्रूती लक्षात येते.

**बचतीमुळे अर्थव्यवस्था मजबूत**

केंद्रात मोदी सरकार आल्यापासून देशाच्या आर्थिक आघाडीवर आशेचे किरण दिसू लागले आहेत. देशात बचत ३० टक्क्यापर्यंत वाढलेली आहे आणि त्यात घरगुती बचतीची एक ट्रिलीयन डॉलरची भर पडणार आहे. चीनमध्ये बचतीचे प्रमाण केवळ ९ टक्के तर अमेरिकेत हेच प्रमाण उणे ८ टक्के आहे. देशात बचतीचे प्रमाण केंद्राच्या बचत प्रोत्साहन धोरणामुळे वाढत चालले आहे. भारताला जागतिक मंदीचा फटका लोकसंख्या जास्त असल्याने बसला नाही असे म्हटले जाते. पण चीनची लोकसंख्या भारतापेक्षा जास्त असतानाही जागतिक मंदिचा मोठा फटका बसला. यावरून देशाची धोरणे अर्थव्यवस्थेला मजबूत करण्यासाठी कारणीभूत ठरत असतात हे सिध्द होते.

***आशिया खंडात भारत आणि चीन हे दोन देश आर्थिकदृष्टया शक्तीशाली आहेत. गेल्या दोन वर्षात सत्तेत आलेल्या सरकारने परकीय गुंतवणूकीला प्रोत्साहन, स्मार्ट सिटी, मेक इन इंडिया, अटल पेन्शन योजना, थेट गॅस सबसिडी, गोल्ड मॉनिटायझेशन, पंतप्रधान सुरक्षा विमा योजना, दळणवळणाच्या वाढत्या सोयी, अशा अनेक योजना राबविल्याने देशाची शाश्वत विकासाकडे वाटचाल सुरू झाली आहे.***

**रिझर्व्ह बँकेचा अहवाल आशावादी :**

दोन वर्षाच्या अगोदर अत्यंत अस्थिर वातावरणातून गेलेल्या भारताच्या अर्थव्यवस्थेत अलिकडील दोन वर्षापासून सरकारने घेतलेल्या निर्णयामूळे स्थिरता आली आहे.पुढील काळात विकासाला गती मिळेल असा आशावाद रिझर्व्ह बँकेने आपल्या वार्षिक अहवालात व्यक्त केला

आहे. २०१३-१४ यावर्षी विकासदर ५.५ टक्क्यांच्या आसपास राहील तर केंद्र सरकारच्या अंदाजानुसार ५.८ टक्क्क्यापर्यंत जाईल हे गेल्या वर्षीच्या तूलनेत अर्थव्यवस्था सुधारणेचे द्योतक आहे. २०१२-१३ या वर्षीच्या आर्थिक विकास वाढीचा दर ४.७ टक्के होता. दशकभरात पहिल्यांदा सलग दोन वर्ष विकास वाढीचा दर ५ टक्क्यांपेक्षा कमी राहिला होता. २०१४-१५ व २०१५-१६ या दोन वर्षात देशाचा आर्थिक विकासाचा दर सर्वाधिक राहिलेला आहे. अलीकडे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आंतरराष्ट्रीय पातळीवर आमचा आर्थिक विकासाचा दर सर्वात जास्त आहे असे म्हटले होते. जागतिक स्तरावर भारतीय अर्थव्यवस्थेकडे उभरती अर्थव्यवस्था म्हणून पाहिले जाते. यावरून भारतीय अर्थव्यवस्थेची आर्थिक महासत्तेकडे वाटचाल सुरू आहे हे लक्षात येते.

**तेलाची गटागंळी फायदयाची:**

जगातील अनेक देशांनी खूल्या अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला आहे. आयात-निर्यातीच्या माध्यमातून प्रत्येक देश फायदा करून घेण्याचे धोरण राबवितो. आंताराष्ट्रीय स्तरावर वस्तूंच्या किंमती होणाऱ्या बदलाचा कमी अधिक परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होतो. सध्या आंतरराष्ट्रीय पातळीवर इंधनाच्या किंमती मोठया प्रमाणात गडगडल्या त्याचा मोठा फायदा भारताला झाला. खनिज तेलाच्या ऑईलच्या एकूण गरजेपैकी ८० टक्के गरज आयातीतून भागविली जाते. म्हणजेच फक्त २० टक्केच तेलाची गरज देशी उत्पादनातून पूर्ण करता येते. म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेवर इंधनाच्या किंमतीत होणाऱ्या बदलाचा परिणाम होतो. मागील दोन वर्षात तेलाच्या किंमती मोठया प्रमाणात घसरल्या आहेत. याचा फायदा निश्चित भारतीय अर्थव्यवस्थेला मोठया प्रमाणात झाला. भारताच्या एकूण आयातीत ३६ टक्के हिस्सा इंधन आणि ऊर्जा यांचा असल्याने कच्चे तेल, कोळसा आणि एलएनजीच्या कमी झालेल्या किंमतीचा देशाला मोठा दिलासा मिळाला आहे. १०० डॉलर प्रति बॅरल असणारा भाव दोन वर्षापासून ५० डॉलर प्रति बॅरलपेक्षा कमी झालेला आहे. क्रिसिलच्या पतमानांकन संस्थेच्या मते २००९-१४ या पाच वर्षात ऊर्जाक्षेत्रातील आयातीवर १६१ अब्ज डॉलर (१४ टक्के) खर्च करावा लागला. स्वस्त इंधनामूळे पुढील

*दशकभरात पहिल्यांदा सलग दोन वर्ष विकास वाढीचा दर ५ टक्क्यांपेक्षा कमी राहिला होता. २०१४-१५ व २०१५-१६ या दोन वर्षात देशाचा आर्थिक विकासाचा दर सर्वाधिक राहिलेला आहे. अलीकडे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आंतरराष्ट्रीय पातळीवर आमचा आर्थिक विकासाचा दर सर्वात जास्त आहे, असे म्हटले होते. जागतिक स्तरावर भारतीय अर्थव्यवस्थेकडे उभरती अर्थव्यवस्था म्हणून पाहिले जाते.*

पाच वर्षात फक्त १.६ टक्के ऊर्जेवरील खर्चात वाढ होईल असे म्हटले आहे.

**विकासात्मक कर्ज:**

देशाला विकासात्मक कामांसाठी पैशाची नेहमी चणचण भासते. तेव्हा देशी व विदेशी कर्ज खर्च भागविण्यासाठी घेतले जाते. इंटरनॅशनल डेटा स्टॅटास्टिक २०१५ नुसार बाहय कर्जाच्या बाबतीत २० विकसनशील देशामध्ये भारताचा क्रमांक चौथा आहे. आर्थिक वर्ष २०१४-१५ मध्ये देशावर विदेशी कर्ज ४७५.८ अब्ज डॉलरवर पोहचले. ते सन २०१३-१४ मधील ४४६.३ अब्ज डॉलरपेक्षा ६.६ टक्के जास्त आहे. मार्च २०१४ च्या शेवटपर्यंत विदेशी कर्ज जीडीपीच्या २३.६ टक्के होते. ते मार्च २०१५ मध्ये २३.८ टक्के झाले आहे. २०१४-१५ या आर्थिक वर्षात दरडोई कर्जामध्ये २ हजार ९६६ रूपयांनी म्हणजे ४४ हजार ९५ रूपयांपर्यंत वाढ झाली. आर्थिक वर्ष २०१३-१४ मध्ये हे प्रमाण ४१ हजार १२९ रूपये होते. दरडोई कर्जात अंतर्गत व बाहय कर्जाचा समावेश असतो. भारताचे विदेशी कर्ज निश्चित वाढले आहे. हे सत्य असले तरी यामुळे देशाच्या कामगिरीत झालेली वाढ गौरवण्याजोगी आहे. जीडीपी तूलनेत कर्जाच्या टक्केवारीवरून फोर्ब्जने यादी तयार केली होती. त्यामध्ये भारताचा ३५ वा नंबर होता. सकल देशांतर्गत उत्पादनाच्या अर्थात जीडीपीच्या तूलनेत प्रत्येक देशावर किती टक्के कर्ज आहे याचा आढावा फोर्ब्जने नियतकालीकातून घेतला असून त्यात अशा कर्जबाजारी देशांमध्ये पहिला क्रमांक जपानचा आहे. जपान जास्त कर्जबाजारी असला तरी त्याची निर्यात सक्षम असल्याने ग्रीससारखी दिवाळखोरीची वेळ जपानवर येणार नाही असे फोर्ब्जने आपल्या निरिक्षणातून व्यक्त केले आहे. भारताकडे विदेशी कर्ज वाजवी असल्याने आश्वासक वाटचाल देशाची दिसते.

**जीडीपीमधील वाढ :**

कोणत्याही देशाच्या जीडीपीत होणारी वाढ ही तेथील सरकारने घेतलेल्या निर्णयावर अवलंबून असते. प्रत्येक देशाच्या आर्थिक वाढीचा दर जीडीपीच्या वाढीवर पूर्णत: अवलंबून आहे. २०३० मध्ये जीडीपीत होणाऱ्या बदलांच्या अंदाजावरून देशाच्या अर्थव्यवस्थेची दिशा लक्षात येते.,

| टॉप १० देशांचा जीडीपी | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.नं. | देश | २०१५ मध्ये जीडीपी (डॉलरमध्ये) | अ.नं. | देश | २०३० मध्ये जीडीपी (अंदाज) |
| (डॉलरमध्ये) | | | | | |
| १ | अमेरिका | १७.९६८ | १ | चीन | ३४.३३८ |
| २ | चीन | ११.३८५ | २ | अमेरिका | ३२.९९६ |
| ३ | जपान | ४.११६ | ३ | भारत | १०.१३३ |
| ४ | जर्मनी | ३.३२५ | ४ | जपान | ५.०८७ |
| ५ | इंग्लड | ३.०३९ | ५ | जर्मनी | ४.७२० |
| ६ | फ्रान्स | २.४१८ | ६ | इंग्लंड | ४.६२२ |
| ७ | भारत | २.१८३ | ७ | द.कोरिया | ३.५३२ |
| ८ | इटली | १.८१६ | ८ | ब्राझील | ३.३६८ |
| ९ | ब्राझील | १.८०० | ९ | फ्रान्स | ३.३११ |
| १० | कॅनडा | १.५७३ | १० | कॅनडा | २.७५० |

वरिल आकडेवारीवरून चीन व भारत व ब्राझील या देशाच्या क्रमवारीत वाढ होताना दिसते. यानंतर नविन द.कोरियाचा टॉप १० देशात समावेश होणार आहे. जगातील १० टॉप जीडीपी असणाऱ्या देशापैकी २०३० मध्ये जीडीपीतील बदलाने चीन, भारत व ब्राझील या देशांचा क्रमांकात सुधारणा होणार आहे तर अमेरिका, जपान, जर्मनी, इंग्लड, फ्रान्स यांच्या क्रमांकामध्ये घसरण होण्याचा अंदाज आहे.

**परकीय गंगाजळीत वाढ:**

आंतरराष्ट्रीय व्यापार कोणत्याही देशाच्या दृष्टीने महत्वाचा झाला आहे. हा व्यापार परकीय गंगाजळीवर अवलंबून असतो. म्हणून देशाकडे असणारा परकीय गंगाजळीचा साठा उपयूक्त असतो. देशातील परकीय गंगाजळीत सर्वोच्च वाढ होऊन ती ऑगस्ट २०१५ पर्यंत ३५५ अब्ज डॉलरवर गेली आहे. विकासाच्या गतीमध्ये वाढ करण्यासाठी प्रत्येक देशाच्या दृष्टीने परकीय गंगाजळी महत्वाची आहे. कोणत्या देशाकडे किती परकीय गंगाजळीचा साठा आहे यावरून देशाची आश्वासक वाटचाल लक्षात येण्यास मदत होते. परकीय गंगाजळी साठयाच्या बाबतीत जगातील टॉप १० देशांमध्ये भारताचा क्रमांक आठवा आहे. जागतिक बँकेच्या माहितीनूसार चीनकडे ३८८० अब्ज डॉलर्ससह जगातील सर्वात मोठा परकीय गंगाजळीचा साठा आहे.

**आंतरराष्ट्रीय नाणे निधीमध्ये भारताचा कोटा:**

कोटा निश्चित करण्यासाठी वेगवेगळया घटकाचे गुणांकन केले जाते. कोणत्याही देशाच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमध्ये जास्तीत जास्त अधिकार मिळणे फार महत्वाचे असते. हा कोटा जीडीपीच्या आकारावरून ५० टक्के, अर्थव्यवस्थेचा खुलेपणा ३० टक्के, आर्थिक बदलाची स्थिती १५ टक्के, आंतरराष्ट्रीय रिझर्व्ह ५ टक्के हे त्याचे मुख्य घटक आहेत. सध्या आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा सर्वात जास्त अधिकार अमेरिकेकडे आहेत. अमेरिका दरवर्षी आयएमएफला ५८ अब्ज डॉलर देते. सर्वात कमी निधी तूवालू नावाच्या देशाकडून मिळतो. हा देश फक्त २४.७ लाख डॉलर एवढाच निधी देतो. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीत अमेरिका, जपान, जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड, चीन, इराण, कॅनडा, रशिया व भारत असा क्रम सर्वात जास्त अधिकाराकडून कमी अधिकाराकडे आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने निधीच्या तूलनेत अमेरिकेला १७.६८ टक्के तर भारताला २.४४ टक्के अधिकार दिलेले आहेत. येणाऱ्या काही वर्षात भारताचा कोटा वाढून अधिकारात वाढ होईल, हे देशाच्या विकासाच्या दृष्टीने फार महत्वाचे आहे.

**समारोप:**

जगात मंदीची स्थिती असल्याने अमेरिका, चीन, जपान, जर्मनी, इंग्लड या मोठया अर्थव्यवस्थेवर कमी अधिक परिणाम झालेले आहेत. आर्थिक महासत्ता होऊ पाहणाऱ्या चीनचा विकासदर भारतापेक्षा कमी राहण्याची शक्यता वर्तविण्यात आलेली आहे. जगात भारतीय अर्थव्यवस्थेकडे जगातील तिसरी मोठी होऊ पाहणारी अर्थव्यवस्था म्हणून पाहिले जाते. मेक इन इंडिया या योजनेमूळे देशात परकीय गुंतवणूक ३६ अब्ज डॉलर पेक्षा जास्त झाली आहे. मूडीज या रेटिंग संस्थेने भारतीय अर्थव्यवस्था चालू वर्षी ७.५ टक्क्यांनी वाढण्याची शक्यता वर्तविली आहे. यावरून नरेंद्र मोदी सरकारने दोन वर्षात राबविलेल्या योजनांचा परिणाम देशात दिसायला सुरूवात झाली आहे.

■■■

*लेखक शिवछत्रपती महाविद्यालय पाचोड, जि.औरंगाबाद येथे अर्थशास्त्राचे सहायक प्राध्यापक आहेत.*

*email id : shivajiyadav84@gmail.com*

# उद्योगाची गरूडझेप:

रमेश झवर



***एकात्मिक विकास हे भारतीय अर्थव्यवस्थेचे सुरूवातीपासून वैशिष्ट्य आहे. खनिज संपत्ती, वनसंपत्ती आणि शेतीयोग्य उत्कृष्ठ जमिनीची संपत्ती तर भारताला लाभलेली आहेच; त्याखेरीज भारताला आणखी एक वेगळीच संपत्ती लाभलेली आहे. ती म्हणजे धडाडीबाज उद्योजक आणि कुशल कामगार! भारताची ही संपत्ती अतुलनीय आहे ह्याबद्दल कुणाचे दुमत नाही. हे सगळे लाभूनही बदलत्या जागतिक परिस्थितीत धडाकेबाज औद्योगिक विकासात अडथळ्यांची मालिका संपत नव्हती.***

गेल्या दोन वर्षांत 'मेक इन इंडिया', 'स्टँड अप इंडिया' तसेच 'स्टार्ट अप इंडिया' ह्या तीन योजना जाहीर करण्यात आल्या. ह्या तिन्ही योजना औद्योगिक धोरणात क्रांती घडवून आणणाऱ्या ठरू शकतात. मात्र ह्या तिन्ही योजनांची अमलबजावणी यशस्वीरीत्या व्हायची असेल तर सरकार आणि उद्योगजगात चांगल्या प्रकारे हातमिळवणी झाली पाहिजे. ह्या योजनांचे स्वरूप पाहिले तर असे लक्षात येईल की माहिती तंत्रज्ञान आणि संचारसाधनात झालेली क्रांती हा ह्या योजनांचा पाया आहे. ई गव्हर्नन्स हे सरकारचे एक चाक आहे तर धडाडीबाज उद्योजक हे दुसरे चाक आहे. ही दोन्ही चक्रे एकसाथ फिरू लागली तर औद्योगिक क्षेत्रात भारत आघाडीवर यायला वेळ लागणार नाही.

दोन वर्षांपूर्वी मोदी सरकार अधिकारावर आले तेव्हापासून उद्योगझेप घेण्याच्या दृष्टीने सरकार कोणती पावले टाकणार ह्याबद्दल औद्योगिक विश्वात तीव्र उत्सुकता निर्माण झाली. तसे पाहिले तर स्वातंत्र्योत्तर काळात औद्योगिक विकासास प्रोत्साहन दिले गेले. ह्याचा अर्थ कृषी धोरणास महत्त्व दिले गेले नाही असा मुळीच नाही. एकात्मिक विकास हे भारतीय अर्थव्यवस्थेचे सुरूवातीपासून वैशिष्ट्य आहे. खनिज संपत्ती, वनसंपत्ती आणि शेतीयोग्य उत्कृष्ठ जमिनीची संपत्ती तर भारताला लाभलेली आहेच; त्याखेरीज भारताला आणखी एक वेगळीच संपत्ती लाभलेली आहे. ती म्हणजे धडाडीबाज उद्योजक आणि कुशल कामगार! भारताची ही संपत्ती अतुलनीय आहे ह्याबद्दल कुणाचे दुमत नाही. हे सगळे लाभूनही बदलत्या जागतिक परिस्थितीत धडाकेबाज औद्योगिक विकासात अडथळ्यांची मालिका संपत नव्हती. काही अडथळे राज्यकर्त्यांच्या अंगभूत विचारसरणीमुळे तर काही अडथळे हे कालबाह्य धोरणांमुळे. त्या अडथळ्यात औद्योगिक विकासास नोकरशाहीदेखील मारक ठरली.

इथे कोणा धोरणकर्त्याला दोष देण्याचा मुद्दा नाही. मुळात धोरण कुठलेही असले तरी परिस्थितीनुसार त्यात बदल हे करावेच लागतात. ते बदल झपाट्याने केले नाही तर धोरणात गतिरोध निर्माण होतो. औद्योगिक प्रगतीच्या संदर्भात कालोचित बदल न करण्यात आल्यामुळे किंवा करण्यात आलेले बदल अपुरे ठरले तरी ते तसेच पुढे रेटण्यात आल्यामुळे कधी गोळी पुढे हरीण मागे तर कधी हरीण पुढे तर गोळी मागे असे काहीसे झाले आहे हे नाकारता येणार नाही. शिकारी तर उत्तम, परंतु उत्तम आणि मनाजोगी शिकार मात्र नाही! परिणामी असमाधानाची भावना

बळावत गेली. औद्योगिक प्रगतीत भारत मागे पडतोय की काय असे चित्र झाले हे नाकारता येणार नाही.

माहितीतंत्रज्ञान आणि संचारमाध्यमात गेल्या दोन दशकात क्रांती झाली. फार मोठा संगणक आणि भलेमोठे सॉफ्टवेअर हाताळत बसण्याऐवजी अलीकडे ॲपचा (APP) आणि क्लाऊड टेक्नॉलॉजीचा जमाना आला आहे. इंटरनेट साईटचे स्वरूपही अलीकडे खूप बदलले आहे. विशिष्ट उद्दिष्ट्यांसाठी विशिष्ट प्रकारच्या साईटस् उपलब्ध होत आहेत. थोडक्यात, ज्या प्रकारचा उद्योग असेल त्याला अनुकूल अशी साईट अल्पावधीत तयार करून मिळते. ह्या क्रांतीमुळे उपलब्ध झालेल्या सोयीसुविधांचा अचूक उपयोग करून नवे उद्योगिक धोरण आखणे गरजेचे होते. भारताचे भौगोलिक स्थान हे आशिया खंड आणि युरोप तसेच अमेरिका खंडाच्या बरोबर मधोमध आहे. औद्योगिक उत्पादनाचा धडाका भारतीय उपखंडात लावला तर भारत जगातले अग्रगण्य उत्पादन केंद्र होऊ शकते. त्यासाठी आतापर्यंतच्या काळात उद्योगपतींकडून वेगवेगळ्या अडचणी पुढे करण्यात येत होत्या. त्यात तथ्यही आहे. व्याजाचे चढे दर, भूसंपादनातल्या अडचणी, कुशल कामगारांचा अभाव, काहीसे प्रतिकूल कामगार कायदे आणि मुख्य म्हणजे सरकारच्या उद्योग खात्यांकडून समोर ठेवण्यात आलेले नियमांचे जंजाळ ह्या सगळ्या अडचणी होत्याच. ह्या खऱ्याखुऱ्या अडचणींत लक्ष घालण्याचे प्रयत्न कॅबिनेटपासून मंत्रालय तसेच सबार्डिनेट उद्योगखात्याच्या कार्यालयापर्यंत सर्व स्तरावर सुरू झाले. त्यातूनत भारत हे जगातले सर्वात मोठे उत्पादन केंद्र होऊ शकते हेही सरकारच्या लक्षात आले.

कारखानदारी चालवणे जास्तीत जास्त सोपे कसे करता येईल ह्याचा प्रयत्न सरकारी पातळीवर सुरू झाला. त्याखेरीज देशातल्या उद्यमी युवावर्गास संधी उपलब्ध करून देणेही महत्त्वाचे होते. नवे काही करण्याच्या उद्देशाने उद्योग सुरू करून स्वयंरोजगाराचा मार्ग शोधणाऱ्या प्रतिभावंतास निश्चित स्वरूपाची मदत करण्याची एखादी योजना आखणेही तितकेच गरजेचे होते. भारत हे अव्वल जागतिक उत्पादन केंद्र व्हावे म्हणून आखण्यात आलेल्या योजनेसे 'मेक इन इंडिया' तसेच 'मेक इन महाराष्ट्र' नामाभिधाने देण्यात आली तर उद्यमी युवावर्गासाठी आखण्यात आलेल्या योजनेस 'स्टार्टअप इंडिया' असे नाव देण्यात आले. तिसऱ्या आणि अत्यंत महत्त्वाच्या योजनेस 'अटल इनोव्हेटिव्ह मिशन अँड सेल्फ एम्प्लॉयमेंट अँड टॅलेंट युटिलायझेशन इन नीती आयोग' ह्या योजनेला 'एम' आणि 'सेटअप' अशी अन्वर्थक नावे मिळाली. हया योजना या ना त्या स्वरूपात अस्तित्वात होत्या हे खरे आहे. पण त्यांचे स्वरूप मात्र एकदम नवे कोरे आहे हे मान्य केलेच पाहिजे.

***भारतात कारखाना स्थापन करणाऱ्यांना जमीन उपलब्ध करण्याच्या प्रयत्नात अजूनही काही अडचणी आहेत. त्यांना जमीन उपलब्ध करून देण्यासाठी अटी किती शिथील कराव्यात, कितपत करू नये ह्याबद्दल मतभेद आहेत. पण त्यातून मार्ग काढणे अवघड वाटत असले तरी अशक्य नाही हे आंतरराष्ट्रीय कारखानदार ओळखून आहेत. त्याखेरीज रेल्वे आणि बंदर प्रकल्पात सरकार खासगी उद्योगपतींबरोबर भागीदार व्हायला तयार आहे.***

विदेशी गुंतवणूकदारांना थेट गुंतवणूक करण्याची परवानगी तर मिळालीच आहे. त्याखेरीज भूसंपादनाच्या अडचणीतून मार्ग काढण्यात आला. भारतात कारखाना स्थापन करणाऱ्यांना जमीन उपलब्ध करण्याच्या ह्या प्रयत्नात अजूनही काही अडचणी आहेत. त्यांना जमीन उपलब्ध करून देण्यासाठी अटी किती शिथील कराव्यात, कितपत करू नये ह्याबद्दल मतभेद आहेत. पण त्यातून मार्ग काढणे अवघड वाटत असले तरी अशक्य नाही हे आंतरराष्ट्रीय कारखानदार ओळखून आहेत. त्याखेरीज रेल्वे आणि बंदर प्रकल्पात सरकार खासगी उद्योगपतींबरोबर भागीदार व्हायला तयार आहे. मध्यंतरी मुंबईत 'मेक इन इंडिया' सप्ताह आयोजित करण्यात आला. ह्याच सप्ताहात 'मेक इन महाराष्ट्रा'चादेखील अंतर्भाव होता. अशाच प्रकारच्या योजना गुजरात आणि अन्य राज्यांनी जाहीर केल्या आहेत. आंतरराष्ट्रीय कारखानदारास ज्या राज्यात कारखाना स्थापन करायचा असेल त्या राज्यात तो स्थापन करण्याची सुविधा उपलब्ध आहे. केंद्र आणि राज्य ह्यांच्यात हे अनोखे सहकार्य आहे.

कारखाना चालवणे सोपे व्हावे म्हणून स्थळाची निवड करण्याची मोकळीक देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांच्या नजरेत महाराष्ट्र आणि गुजरात ही राज्ये आजही सर्वाधिक पसंतीची राज्ये आहेत. उद्योगांबद्दलच्या जागतिक परिस्थितीचा जागतिक बँकेतर्फे अभ्यास करण्यात आला. ह्या अभ्याचा निष्कर्ष धक्कादायक आहे. भारताचा जीडीपी वाढत्या गतीने प्रगती करत असला तरी भारताचे औद्योगिक वातावरण मात्र, ब्रिक देशातल्या वातावरणापेक्षा वाईट आहे असा ह्या अहवालाचा सूर आहे. ह्यासंबंधीची ताजी आकडेवारी मात्र दुर्दैवाने प्रतिकूल आहे. औद्योगिक दृष्ट्या पोषक वातावरण असलेल्या देशात जगात भारताचा

१३४ वा क्रमांक आहे. ह्याचा सरळ अर्थ असा आहे की भारतातले सध्याचे वातावरण उद्योगानुकूल करणे आवश्यक आहे. नेमका हाच प्रयत्न 'मेक इन' मार्फत करण्यात येत आहे. भारतातल्या कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज ह्या प्रमुख उद्योगांच्या संघटनेतर्फेही सखोल अभ्यास करण्यात आला. ह्या अभ्यासात भारतात उद्योग करणे कसे सोपे करता येईल ह्यासंबंधीच्या सूचनांवर भर देण्यात आला आहे.

बांधकाम परवानगी, अव्याहत वीजपुरवण्याची हमी, जमीन नोंदणीची सोपी सरळ आणि सुटसुटीत प्रक्रिया, करभरणा, आंतरराष्ट्रीय व्यापाराची सवलत, कराराची काटेकोर अमलबाजावणी होत नसेल अथवा उद्योग चालत नसेल तर त्यातून बाहेर पडण्याची सुलभ प्रक्रिया इत्यादी बाबीत आमूलाग्र बदल करण्यावर भर द्यायला सरकार तयार आहे असा संदेश सरकारकडून मिळणे आवश्यक होते. त्यादृष्टीने सरकारने टाकलेली पावले दमदार आहेत. महाराष्ट्र आणि गुजरात ह्या राज्यांनी तर अशी पावले खूप आधीच टाकली आहेत. एकाच खेपेत सर्व प्रकारच्या परवानग्या देण्याचा उपक्रम ह्या राज्यात आधीच सुरू झाला. हे काम अधिक कसे सोपे करता येईल ह्या दृष्टीने प्रयत्न करण्यास सरकार अजूनही तयार आहे. प्रशासन किती गतिमान आहे ह्याचे हे चांगले उदाहरण आहे. साहजिक "मेक इन इंडिया" आणि 'मेक इन महाराष्ट्र' ह्या दोन्ही योजनांना भरघोस प्रतिसाद मिळाला. कोका कोला सारख्या जगप्रसिध्द ब्रँडचे उत्पादन करणाऱ्या कंपनीने जैन इरिगेशनच्या सहकार्याने महाराष्ट्रात संत्र्यांच्या रसाचा प्रकल्प जाहीर केला हे 'मेक इन महाराष्ट्र'चे मोठेच यश मानले पाहिजे.

मेक इन महाराष्ट्रच्या संदर्भात आणखी काही महत्त्वाचे प्रकल्प राबवले जाण्याची शक्यता आहे. करमणूक क्षेत्र, माहिती तंत्रज्ञानात अत्यावश्यक असलेल्या हार्डवेअर निर्मितीचे कारखाने तसेच क्लाऊड टेक्नॉलॉजीवर आधारित सेवा उपलब्ध करून देणारे स्टार्टअप इंडिया उद्योगही मोठ्या प्रमाणावर सुरू होण्याची शक्यता आहे. मुंबई आणि पुण्यासारख्या शहरातच नव्हे तर नागपूर-नाशिक आणि औरंगाबादेत आता अनेक प्रकारच्या मालाची खरेदीविक्री ऑनलाईन सुरू झाली आहे. अगदी थेट कांदा-बटाटे आणि ताज्या भाज्या मोबाईलवरून मागवता

***मुंबई आणि पुण्यासारख्या शहरातच नव्हे तर नागपूर-नाशिक आणि औरंगाबादेत आता अनेक प्रकारच्या मालाची खरेदीविक्री ऑनलाईन सुरू झाली आहे. अगदी थेट कांदा-बटाटे आणि ताज्या भाज्या मोबाईलवरून मागवता येतात. शेतमालाच्या बाजारपेठेत क्रांती झाल्यासारखे चित्र आज दिसत आहे. ह्याला पूरक ठरणारा वाहतूक उद्योगही कात टाकून देऊन सज्ज होत आहे. वृत्तवाहिन्या, करमणूकवाहिन्या सिनेमे, मनोरंजन पार्क इत्यादि अनेक क्षेत्रात तर विदेशी भांडवल मोठ्या प्रमाणावर ह्यापूर्वीच आले आहे.***

येतात. शेतमालाच्या बाजारपेठेत क्रांती झाल्यासारखे चित्र आज दिसत आहे. ह्याला पूरक ठरणारा वाहतूक उद्योगही कात टाकून देऊन सज्ज होत आहे. वृत्तवाहिन्या, करमणूकवाहिन्या सिनेमे, मनोरंजन पार्क इत्यादि अनेक क्षेत्रात तर विदेशी भांडवल मोठ्या प्रमाणावर ह्यापूर्वीच आले आहे. ह्या क्षेत्रातली गुंतवणूक दरवर्षी सरासरी अकरा टक्क्यांनी वाढत आहे!

२०१५-२०१६ च्याअर्थसंकल्पात एम आणि सेटअपचा उद्देश स्पष्ट करण्यात आला आहे. देशातली आर्थिक व्यवस्था आणि देशात अस्तित्वात असलेली उपजत औद्योगिक प्रेरणा ह्यांचा मेळ घालणे हे ध्येय डोळ्यांसमोर ठेऊन "एम आणि सेटअप" ह्या योजना आखण्यात आल्या असून दोन्ही योजनांसाठी अनुक्रमे ५०० कोटी आणि १००० कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यासाठी मुद्रा आणि पेमेंट बँका सुरू करण्याचे परवाने रिझर्व्ह बँकेने नुकतेच दिले आहेत. अगदी एखादा हायटेक उद्योग सुरू करण्यासाठी तीनचार जण एकत्र आले तरी त्यांना वित्तीय साह्य मिळाले पाहिजे असे रिझर्व्ह बँकेला अभिप्रेत आहे. ह्या आधीच्या बँकांची कार्यपध्दती आणि नव्या बँकांची कार्यपध्दती ह्यात जमीनअस्मानचा फरक राहील. तुम्ही काम करा, बाकी वित्तपुरवठ्याची जबाबदारी आमच्यावर सोपवा, असे लक्ष्य ह्या बँकांसाठी ठरवण्यात आले. माहिती तंत्रज्ञानात्मक क्षेत्रात ॲप्स (Apps) निर्मितीचा ह्या बँकिंग तंत्रात पुरेपूर उपयोग करण्यात येईल हे उघड आहे. ह्या अर्थाने बँकातही क्रांती झाल्यासारखी ठरेल.

भारतात कारखानदारी सुरू करण्याच्या बाबत खरे तर कोणतीच अडचण नाही, असा ठोस निष्कर्ष उद्योगपतींनीच काढला तर वातावरण बदलण्यास मदत होईल हे लक्षात घेऊन औद्योगिक वातावरणात आमूलाग्र बदल करण्याच्या दृष्टीने तिन्ही योजनांची अंमलबजावणीची सुरूवात तर झाली आहे. अर्थात सरकारच्या ह्या धारदार धोरणाची दृश्य फळे दिसण्यास काही काळ हा जावाच लागेल.

■■■

*लेखक आर्थिक विषयांचे अभ्यासक आहेत.*
*rzawar@gmail.com*

# Subscribe Online NOW



Log on to

**http://publicationsdivision.nic.in/,**


*in collaboration with* **bharatkosh.gov.in**

**Publications Division**

Ministry of Information and Broadcasting

Government of India

website: publicationsdivision.nic.in



Prestigious

**INDIA 2016**

Reference Annual

now

available

**ONLINE**



Buy at flipkart

www.flipkart.com

Buy eBooks at kobo

www.kobo.com

# ''समकालीन भारताच्या संदर्भातील दर्जेदार शिक्षण''

दिशा नावानी




***अनेक शाळांमधे उत्तम प्रकारचं आधुनिक तंत्रज्ञान, पुरेशा पायाभूत सुविधा आणि उच्चविद्याविभूषित आणि सक्षम शिक्षक उपलब्ध असतात जे विशिष्ट सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी असलेल्या मुलांना शिकवतात. त्याचवेळी आपल्याकडे अशा देखिल शाळा आहेत ज्यांच्याकडे अत्यंत अपुऱ्या पायाभूत सुविधा आहेत, अकार्यक्षम आणि अनुत्साही शिक्षक आहेत, अशा शाळांमधले विद्यार्थी देखिल शिक्षणविषयी अनिच्छा असणारे आणि अनियमितपणे शाळेत येणारे आहेत.***

भारतीय शिक्षणव्यवस्था अत्यंत चमत्कारिक आणि वैशिष्ट्यपूर्ण रितीने बनवलेली आहे. एका बाजूला भारतातून मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी उच्च शिक्षण वा कामानिमित्त परदेशी जात आहेत आणि तिथे चांगल्या दर्जाची कामगिरी करुन दाखवत आहेत. तर दुसऱ्या बाजूला हुशार मुलांमधे आणि अक्षरओळख आणि संख्या कौशल्यासारख्या मूलभूत गोष्टी शिकण्यासाठी धडपड करणारे बहुसंख्य विद्यार्थी यांच्यात मोठी तफावत दिसते आहे. जागतिक पातळीवरच्या शिक्षणाची जाणीव त्यांच्या शैक्षणिक प्रवाहात असणे, तर दूरच राहिले. परिक्षा उत्तीर्ण होण्याच्या प्राथमिक उद्दीष्टाच्या पूर्ततेसाठी नेमून दिलेल्या पाठ्यपुस्तकातली माहिती आणि थोडीफार संदर्भहीन सत्य विधाने यांत्रिकपणे लक्षात ठेवून ती व्यवस्थितपणे उत्तरपत्रिकेत उतरविणे हाच साचा आपल्या शिक्षणपद्धतीमधे योग्य ठरत आला आहे. विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्वाचे भावनात्मक आणि इतर पैलू वा गुण आणि त्याची आकलनविषयक वा स्मरणशक्तीविषयक क्षमता यामधे ठोस तफावत आढळून येते. मात्र मुलांना अर्थपूर्ण शिक्षण देण्याची गरज भागवण्यासाठी सतत विविध प्रश्न विचारले जातात, विविध धोरणे तसेच कार्यक्रम आखून त्याचे परिणाम तपासले जातात, समाजातल्या विचारवंताकडून त्यावर सूचना मागवल्या जातात, अनेक अभ्यासक आणि शिक्षण क्षेत्रातल्या संशोधकांकडून मार्गदर्शन घेतले जाते, हे तर अजूनच मनोवेधक आहे. सध्या दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचे स्वरुप हे भारतीय शालेय शिक्षण पद्धतीसाठी एक महत्त्वाच्या चिंतनाचा विषय आहे, तर विद्यार्थ्यांना त्यांच्या समाजातल्या स्थानाप्रमाणे वेगवेगळे शिक्षण दिले जाते, ही सुद्धा चिंतेची बाब आहे. जात, वर्ग, धर्म, जमात, लिंग इत्यादींमुळे मिळालेल्या वेगवेगळ्या ओळखीमुळे त्यांना आपल्या 'भिन्न आणि असमान' समाजात विविध श्रेणींमधे विभागले जाते. विद्यार्थ्यांचे सामाजिक स्थान आणि तो शिक्षण घेत असलेली शाळा त्यामधे निश्चित संबंध असतो. अनेक शाळांमधे उत्तम प्रकारचं आधुनिक तंत्रज्ञान, पुरेशा पायाभूत सुविधा आणि उच्चविद्याविभूषित आणि सक्षम शिक्षक उपलब्ध असतात जे विशिष्ट सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी असलेल्या मुलांना शिकवतात. त्याचवेळी आपल्याकडे

अशा देखिल शाळा आहेत ज्यांच्याकडे अत्यंत अपुऱ्या पायाभूत सुविधा आहेत, अकार्यक्षम आणि अनुत्साही शिक्षक आहेत, अशा शाळांमधले विद्यार्थी देखिल शिक्षणविषयी अनिच्छा असणारे आणि अनियमितपणे शाळेत येणारे आहेत.

एकूण काय तर आपल्याकडे सरकारी आणि खाजगी अशा दोन्ही शिक्षण क्षेत्रांमधे विविध स्तरीय शिक्षणपद्धती अस्तित्वात आहे आणि हे स्तरीकरण वा श्रेणीकरण औपचारिक शिक्षणाच्या पातळीवर थांबत नाही तर त्या शिक्षणाबाहेरच्या परिघात, अनौपचारिक शिक्षणाच्या क्षेत्रातही विस्तारले आहे. आपल्या शैक्षणिक व्यवस्थेवर टीका करणारे लोक समाजात मुबलकतेने दिसून येतात यापैकी काहींची टीका योग्य आणि समर्पक संशोधनातून आलेली असते, तर बाकीच्यांची, राज्यपातळीवरच्या, केंद्र पातळीवरच्या आणि जागतिक पातळीवरच्या संस्थांनी केलेल्या, विद्यार्थ्यांच्या यशाच्या सर्वेक्षण अहवालांवरची प्रतिक्रिया असते. उच्च दर्जा, समानता आणि सामाजिक न्याय ही मूल्ये हातात हात घालून बरोबर चालतात आणि चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळणे ही विशिष्ट पार्श्वभूमीतून आलेल्या विद्यार्थ्यांची मक्तेदारी असू शकत नाही. अभ्यासक्रमविषयक चिंतन, शिक्षण तसेच पायाभूत सुविधा या सर्वच पातळ्यांवर दर्जा उत्तम असणे याला सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांसाठी आणि सर्व शाळांच्यासाठी एक सार्वत्रिक आणि विशिष्ट अर्थ असायलाच हवा. दर्जात्मक शिक्षणपद्धती सर्वसमावेशक असायला हवी. त्यामधे सर्वांनाच मानानं सामावून घ्यायला हवं. मोठ्या प्रमाणावर, बहुसंख्य विद्यार्थ्यांना काही प्रमाणात दर्जेदार शिक्षण देऊन मुख्य प्रवाहातून बाजूला काढायला किंवा दूर ठेवायला लागणारी शिक्षणपद्धती नको. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे भारतासारख्या देशात योग्य प्रकारचे, उत्तम दर्जाचे शिक्षण पुरवण्याची प्राथमिक जबाबदारी सरकारचीच असते. खासगीरित्या शाळा चालवणारे याकडे उत्तम उत्पन्न देणारा स्त्रोत म्हणूनच बघतात. सन १९९०च्या सुरुवातीला संरचनेतल्या बदललेल्या धोरणांमुळे जे उदारमतवादी वातावरण तयार झाले त्याने शिक्षणाच्या क्षेत्रातही जलदगतीने प्रवेश केला. सरकारी शाळांमधे जे विद्यार्थी कमी शुल्कात शिक्षण घेतात मात्र तिथल्या शिक्षणाच्या दर्जामुळे ज्या पालकांचा भ्रमनिरास झाला आहे अशांना तितक्याच कमी शुल्कात चांगले शिक्षण देण्याचा वायदा करत काही खाजगी शिक्षणसम्राटांनी नव्याने खुल्या झालेल्या शिक्षणक्षेत्रावर हल्ला केला आहे.

***मोठ्या प्रमाणावर, बहुसंख्य विद्यार्थ्यांना काही प्रमाणात दर्जेदार शिक्षण देऊन मुख्य प्रवाहातून बाजूला काढायला किंवा दूर ठेवायला लागणारी शिक्षणपद्धती नको. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे भारतासारख्या देशात योग्य प्रकारचे, उत्तम दर्जाचे शिक्षण पुरवण्याची प्राथमिक जबाबदारी सरकारचीच असते. खासगीरित्या शाळा चालवणारे याकडे उत्तम उत्पन्न देणारा स्त्रोत म्हणूनच बघतात.***

**शिक्षणाच्या अधिकाराचा कायदा २००९**

या संदर्भात, शिक्षणाला मूलभूत अधिकाराचा दर्जा देणाऱ्या मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण मिळण्याचा हक्क प्रदान करणाऱ्या 'शिक्षण हक्क कायदा २००९' चे कौतुक करायला हवे. हा कायदा वय वर्ष ६ ते १४ या वयोगटातल्या सर्व मुलांना मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण मिळेल याची खात्री देतो. या कायद्याचा अर्थ आणि अचूक अंमलबजावणीच्या विविध दृष्टीकोनांचा विचार व्हावा म्हणून बऱ्याच तरतुदी केल्या गेल्या आहेत. त्यात शाळांमधून दर्जेदार शिक्षण मिळण्याची खात्री करुन घेणाऱ्या काही बाबी विशेषकरुन महत्त्वाच्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे

- विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या गुणोत्तराशी संबंधित नियम आणि मापदंड निश्चित करणे
- शैक्षणिक वास्तू आणि त्यांच्या पायाभूत सुविधा
- शाळेतले कामकाजाचे दिवस
- शिक्षकांचे कामाचे तास
- अशैक्षणिक कामाला शिक्षकांना जुंपण्यापासून रोखण्यासाठी आवश्यक तरतूद
- दहा वर्षांतून एकदा होणारी जनगणना वगळता इतर जनगणना करण्यासाठी शिक्षकांची नेमणूक थांबवणे
- स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या निवडणुका
- राज्य मंत्रिमंडळ आणि संसदेसाठीच्या निवडणुका
- आपत्ती निवारण
- योग्य शैक्षणिक गुणवत्ताधारक आणि प्रशिक्षित शिक्षकांची नेमणूक करण्याची तरतूद
- शाळेत विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षा

आणि मानसिक छळवणूक होऊ नये यासाठी व्यवस्था

- विद्यार्थ्यांच्या प्रवेशप्रक्रियेतली चाळणी पद्धत
- शैक्षणिक शुल्क
- मान्यता न मिळालेल्या शाळा चालविणे आणि शिक्षकांनी शाळे व्यतिरिक्त खाजगी शिकवण्या घेणे

या सगळ्या बाबींबद्दल योग्य निकष निश्चित झाल्यानंतर ते पूर्ण जबाबदारीने आणि प्रामाणिकपणे अमलात आणणे सगळ्यात महत्त्वाचे आहे.

**राष्ट्रीय अभ्यासक्रमविषयक आराखडा २००५**

या तरतुदींबरोबरच, भयमुक्त वाटेल अशा वातावरणात अध्ययन करण्यासाठी मुलांना उद्युक्त करेल अशा संदर्भपूर्ण, लवचिक आणि अर्थपूर्ण अभ्यासक्रमाचे महत्त्व हा कायदा अधोरेखित करतो. आपली आतापर्यंतची सर्व शिक्षणविषयक धोरणे आणि नुकताच तयार केलेला राष्ट्रीय अभ्यासक्रमविषयक आराखडा २००५ हे मुलांच्या मनात शिक्षणविषयक आस्था निर्माण करुन त्यांना शाळेत शिक्षण घेण्यास प्रवृत्त करण्यात असमर्थ अशा आपल्या अभ्यासक्रमांचं अपयश ओळखण्यात यशस्वी ठरले आहेत. मुलांना शाळेत येणाऱ्या अनुभवांचा एकात्मिक विचार करुन दर्जात्मक शिक्षणाचा विचार व्हायला हवा. मुलांची सर्वांगीण प्रगती करुन त्यांना भरपूर माहिती आणि अनुभव प्राप्त करुन देण्याच्या दिशेने प्रयत्न व्हायला हवेत.

**अलीकडच्या सरकारी योजना**

राज्य सरकारच्या पाठिंब्याने चालणाऱ्या संस्थांबाबत काही चूक झाली तरी सरकारला त्यावरच्या टीकेला तोंड द्यावे लागते. शिक्षणासारख्या सामाजिकदृष्ट्या चांगल्या कामासाठी सरकारला जबाबदार धरतानाच, आपली सार्वजनिक शिक्षण प्रणाली मजबूत करण्यासाठी सरकारने घेतलेल्या पुढाकाराचे परिक्षण होणे गरजेचे आहे. प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंतच्या प्रत्येक पायरीवर शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी सरकार

***केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या 'उडान' या योजनेअंतर्गत वंचित विद्यार्थिनींना आणि अनुसूचित जाती-जमाती तसेच अल्पसंख्याक समाजातल्या इतर विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतरच्या व्यावसायिक शिक्षण घेण्यास विशेषत: शास्त्र आणि गणिताशी संबंधित विषयातल्या शिक्षणासाठी प्रोत्साहन आणि मदत दिली जाते. ईशान्येकडच्या देशाच्या भूभागाचे इतर भागापासून थोडे लांब दुर्गम असणे लक्षात घेता, तिथल्या विद्यार्थ्यांची गळती रोखण्यासाठी देखिल सरकार विशेष योजना राबवत आहे.***

अनेक योजना नि उपक्रम हाती घेत असते. या योजना सर्वसमावेशक आहेत आणि त्यात सर्व प्रकारच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल पार्श्वभूमीतल्या विद्यार्थ्यांच्या गरजा विचारात घेतल्या जातात. मग त्यात विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा सुद्धा समावेश आहे. या योजनांमुळे अध्यापन शास्त्रात सुधारणा होते आणि दर्जात्मक शिक्षण सर्वांच्या आवाक्यात येते. उदाहरणार्थ 'बेटी बचाओ, बेटी पढाओ अभियाना' अंतर्गत विविध पातळ्यांवर मुलींच्या शिक्षणात १०० टक्के यश मिळवणाऱ्या शाळा व्यवस्थापन समितीला बक्षीस देण्याची योजना आहे.

तसेच केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या 'उडान' या योजनेअंतर्गत वंचित विद्यार्थिनींना आणि अनुसूचित जाती-जमाती तसेच अल्पसंख्याक समाजातल्या इतर विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतरच्या व्यावसायिक शिक्षण घेण्यास विशेषत: शास्त्र आणि गणिताशी संबंधित विषयातल्या शिक्षणासाठी प्रोत्साहन आणि मदत दिली जाते. ईशान्येकडच्या देशाच्या भूभागाचे इतर भागापासून थोडे लांब दुर्गम असणे लक्षात घेता, तिथल्या विद्यार्थ्यांची गळती रोखण्यासाठी देखिल सरकार विशेष योजना राबवत आहे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचून अध्ययन अध्यापन कार्य जास्त प्रमाणात उत्साहाने सुरु राहण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या अधिकाधिक संधी प्राप्त करुन देण्यासाठी आता या क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे. 'स्वयम्' या प्रणालीमधे देशभरातल्या केंद्र सरकारच्या आयआयटी, आयआयम, केंद्रीय विद्यापीठे यासारख्या संस्थांमधले प्राध्यापक देशभरातल्या नागरिकांसाठी मोफत ऑनलाईन अभ्यासक्रम शिकवतात. आतापर्यंत या संस्थांमधे फक्त काही निवडक विद्यार्थ्यांनाच प्रवेश मिळण्याची परंपरा होती. मात्र 'स्वयम्' मुळे या संस्थांच्या तटबंदीला जरा सकारात्मक कलाटणी मिळाली आहे. त्याचप्रमाणे 'राष्ट्रीय ई-ग्रंथालया'मुळे ऑनलाईन पोर्टल

द्वारे माहिती मिळवता येत असल्याने केंद्रीय विद्यापीठे आणि इतर संस्थांमधे उपलब्ध असलेले अद्ययावत ज्ञान मिळवण्याच्या मार्गाचे एक प्रकारे लोकशाहीकरण झाले आहे. डिजीटल स्वरुपात या ई-ग्रंथालयात साठवून ठेवलेली माहिती सदस्यांना लॅपटॉप, स्मार्टफोन्स आणि टॅब्लेट द्वारे केव्हाही उपलब्ध होऊ शकते. तसेच एकाच 'राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टल' द्वारे विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्तींसाठी अर्ज भरण्यापासून ते लाभधारक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळेपर्यंतच्या प्रक्रियेतल्या प्रत्येक टप्प्याविषयी माहिती मिळते.

शालेय शिक्षण क्षेत्रातल्या घडामोडी जाणून घेण्यासाठी मानव संसाधन विकास मंत्रालयाने राष्ट्रीय शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण सल्लागार मंडळाच्या म्हणजे NCERT माध्यमातून दरवर्षी राष्ट्रीय आकलन सर्वेक्षण करायचा प्रस्ताव ठेवला आहे. तसेच देशातल्या शालेय शिक्षणाबाबतच्या माहितीचे स्त्रोत केंद्रीत करण्यासाठी पोर्टल विकसित करणे, याची सुद्धा खूप गरज आहे. त्याबरोबरच शिक्षक प्रशिक्षण संस्थांसाठी सुद्धा एक पोर्टल असायला हवे. ज्यामुळे प्रक्रियेत पारदर्शकता येईल आणि शिक्षकांच्या कार्यक्षमतेची वर्गवारी करता येईल. देशभरातल्या सुमारे २० कोटी मुलांच्या प्रगतीवर लक्ष ठेवण्यासाठी एक वेगळी प्रणाली सुरु केली आहे, जिच्यामुळे मुलांची वरच्या वर्गात जाण्याची प्रगती समजेलच त्या सोबत शाळेत जाणे थांबवणाऱ्या मुलांवरही लक्ष ठेवून त्यांना पुन्हा शाळेत आणणे शक्य होईल. 'राष्ट्रीय अभ्यासक्रम धोरण २००५' पासून स्फूर्ती घेऊन तसेच शाळेबाहेरचे रंगीबेरंगी जग आणि शाळेतले नीरस एकरंगी शिक्षण यांच्यात एक प्रवाह जोडला जावा म्हणून मानव संसाधन विकास मंत्रालयाने 'राष्ट्रीय अविष्कार अभियाना'ची सुरुवात केली आहे. मुलांमधे चौकसवृत्ती आणि निर्मितीक्षमता वाढीस लागावी. शास्त्र आणि गणित या विषयांविषयी ओढ वाटावी तसेच संस्थांमधे तंत्रज्ञानाच्या योग्य वापराची क्षमता निर्माण व्हावी या उद्देशाने या अभियानाच्या आराखड्याची निर्मिती केली आहे. NCERऊच्या 'ई-पाठशाला' या कल्पनेमुळे सर्व शालेय विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळण्यासाठी सोपा मार्ग उपलब्ध झाला आहे.

***मानव संसाधन विकास मंत्रालयाने 'राष्ट्रीय अविष्कार अभियाना'ची सुरुवात केली आहे. मुलांमधे चौकसवृत्ती आणि निर्मितीक्षमता वाढीस लागावी. शास्त्र आणि गणित या विषयांविषयी ओढ वाटावी तसेच संस्थांमधे तंत्रज्ञानाच्या योग्य वापराची क्षमता निर्माण व्हावी या उद्देशाने या अभियानाच्या आराखड्याची निर्मिती केली आहे.***

शालेय विद्यार्थी तसेच युवकांच्या शिक्षणाला पाठबळ मिळावे म्हणून सरकारने अशा अनेक योजना सुरु केल्या आहेत. शिक्षणाचा दर्जा वाढवण्याच्या दृष्टीनेही महत्त्वाची पावले असून त्यांचे कौतुक होणे गरजेचे आहे. या सर्व योजना मूळ शिक्षण दर्जेदार करण्यासाठी पूरक असून, त्यातल्या कल्पनांवर अंमलबजावणी करताना आपले ध्येय आणि स्त्रोत शाळा-महाविद्यालयांना मजबूत करण्यापासून विचलित होणार नाहीत, याची आपण काळजी घ्यायला हवी. हा मुद्दा समजून घेण्यासाठी आपण एक उदाहरण घेऊ या. गेली अनेक वर्ष होत आलेल्या सर्वेक्षणांमधून असे निष्कर्ष निघाले आहेत कि, आपल्या शालेय विद्यार्थ्यांच्या, विशेषत: सरकारी शाळांमधल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत सर्व गोष्टी योग्य प्रकारे होत आहेत, अशी परिस्थिती नाही. या समस्येच्या मोठ्या आवाक्याकडे लक्ष केंद्रित करण्यापेक्षा समस्येच्या मुळाशी असलेल्या चिंताजनक गोष्टी त्याला कारणीभूत असलेल्या परिस्थितीवर उपाय शोधायला हवा. खरंतर सर्वांना याची कारणे ठाऊक आहेत ती दूर करण्याकडे लक्ष द्यायला हवे. त्याचप्रमाणे आकलनासाठीची केलेल्या सर्वेक्षणांमधे फक्त अंक आणि अक्षरओळख यांच्या ज्ञानावर आधारीत प्रश्न विचारलेले असतात आणि शाळांमधे तेवढे ज्ञान तर मिळायलाच हवे. त्या पलीकडे जाऊन शाळेमधे विद्यार्थ्यांना अनेक अर्थपूर्ण अनुभव घेण्याची संधी मिळणे महत्त्वाचे आहे. यासंबंधी विचार करताना 'शिक्षण हक्क कायदा २००९' मध्ये प्रस्तावित आठवीपर्यंत सर्व विद्यार्थ्यांना नापास न करता वरच्या वर्गात पाठविण्याची तरतूद चिंताजनक आहे. कारण नापास करण्यामुळे विद्यार्थ्याला त्याच वर्गात शिकायची शिक्षा दिली जाते. मात्र, त्याला त्यांच्या शिक्षणपद्धतीतले अनेक घटक योग्य स्थितीत नसणे सुद्धा कारणीभूत असू शकतात. त्याच प्रकारे सर्व शिक्षक कोणत्या ठिकाणी वा परिस्थितीत अध्यापन करत आहेत याचा विचार न

करता त्यांच्याकडून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत जबाबदार धरले जातात. अशा शिक्षकांना सर्व बाबतीत पाठिंबा देणे आणि ते ज्या परिस्थितीत काम करतात तिथले त्यांना त्रास देणारे अडथळे दूर करुन त्यांना निर्वेध वातावरण पुरवणे सुद्धा महत्त्वाचे आहे. तसेच आपल्या देशासारख्या भिन्न सामाजिक-सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेल्या देशात तंत्रज्ञान सक्षम भूमिका निभावू शकते. तरीही ज्या वयात मुलांना हाताला धरुन शिकवण्याची गरज असते अशा वयात, प्राथमिक शिक्षणाच्या पातळीवर टॅब्लेट आणि स्मार्ट फोन हे शिक्षक आणि शाळेची जागा भरुन काढू शकत नाहीत, उलट त्यामुळे विद्यार्थ्यांचे जास्त नुकसान होऊ शकते.

आपण आतापर्यंत पाहिलेल्या सर्व योजना निर्विवादपणे महत्त्वाच्या असल्या तरी त्यांच्यामुळे सामाजिक न्याय, समता आणि दर्जाविषयीच्या काही मूलभूत बाबींकडे दुर्लक्ष व्हायला नको न्याय्य मार्गाने चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळणे हा सर्व मुलांचा हक्क आहे आणि म्हणूनच अर्थपूर्ण शिकण्या-शिकवण्याच्या अनुभवात शिक्षक आणि विद्यार्थी दोघांनाही सहभागी होता यावे याकरीता शाळांमधे पोषक वातावरणाची निर्मिती करण्यासाठी सर्व प्रकारचे प्रयत्न व्हायला हवे. शाळा या सर्व सुधारणांसाठीचे योग्य माध्यम असायला हव्या. राष्ट्रीय अभ्यासक्रम विषयक आराखडा २००५ पासून स्फूर्ती घेऊन अभ्यासक्रम, शिक्षणशास्त्र आणि परीक्षापद्धतींमधे सुधारणा करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत आणि शिक्षणाचा अधिकार कायदा २००९ द्वारे विविध पातळ्यांवर दर्जेदार शिक्षणाच्या अर्थपूर्ण अभिव्यक्तीसाठी मार्ग शोधायला हवेत. मुलांना नापास न करण्याचे धोरण पूर्णपणे हटवण्यापेक्षा त्यामधे वय वर्ष ३ ते ६ आणि वय वर्ष १४-१८ हे वयोगट या धोरणाच्या कक्षेत सामावून घेण्यासाठी सुधारणा करायला हव्या.

■■■

*लेखिका मुंबई येथील 'टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस' मधील 'सेंटर फॉर एज्यूकेशन'च्या प्रमुख आहेत.*
*email: dishanawani@yahoo.com*

## प्रकाशन विभागाची नवी पुस्तके

१. वर्ल्ड ऑफ थिन फिल्म कोटिंग्स (इंग्रजी) ₹ ९०/-
२. तिलक का मुकदमा (हिंदी) ₹ ३३५/-
३. राजभाषा (हिंदी) ₹ १००/-

१. एक देश एक हृदय (हिंदी)
२. उपभोक्ता संरक्षण (हिंदी)
३. पर्यावरण संरक्षण : चुनौतिया और समाधान

## लेखकांना आवाहन

योजना मासिकासाठी लेख पाठवितांना लेखकांनी UNICODE (Mangal) or KRUTI DEV या फॉन्ट मध्येच आपले लेख पाठवावेत,
हे नम्र आवाहन.


PUBLICATIONS DIVISION
website: publicationsdivision.nic.in
Some Prestigious Titles Now Available Online
• India 2016 (also available as eBook)
• Bharat 2016 (also available as eBook)
• Legends of Indian Silver Screen (also available as eBook)
• Abode Under The Dome
• Winged Wonders of Rashtrapati Bhavan
• Right of The Line : The President's Bodyguard
• Indra Dhanush
• The Presidential Retreats of India
• Rashtrapati Bhawan
• Belief In The Ballot (also available as eBook)
• Gandhi : Jeevan Aur Darshan (hindi)
• 1857 The Uprising
• Sardar Patel-Sachitra Jeevni(hindi) (also available as eBook)
• Sardar Patel - A Pictorial Biography (also available as eBook)
• Basohli Painting
• Kangra Painting
• Indian Women : Contemporary Essays
• Bharat Ki Ekta Ka Nirman (hindi) (also available as eBook)
• Yuva Sanyasi (hindi)
• Gazetteer of India Vol.2
• The Geet Govinda of Shri Jaydev
• Who's Who of Indian Martyrs (Vol-I)
• Who's Who of Indian Martyrs (Vol-II)
• Saga of Valour
• Some Aspects of Indian Culture
• Art & Science of Playing Tabla (also available as eBook)
• Indian Classical Dance
• Celebration of Life : Indian Folk Dance
• Nataraja
• Bengali Theatre: 200 Years (also available as eBook)
• Bihari Satsai (hindi)
• Bihari Satsai - A Commentary
• Eye In Art
• Looking Again At Indian Art
• The Life of Krishna In Indian Art
• Pahari Painting of Nala Damayanti Theme
• Ajanta Ka Vaibhav (hindi)
• Bharatiya Kala - Udhbhav Aur Vikas (hindi)
• Bharatiya Chitrakala Main Sangeet Tatva (hindi)
• South Indian Paintings
• Garhwal Chitrakala (hindi)
• A Moment In Time
• Samay, Cinema Aur Itihas (hindi)
• Indian Cinema Through The Century
• Bharatiya Cinema Ka Safarnama (hindi)
• A History of Socialism
• Lamps of India
• Bharat Ke Durg (hindi)
• Wood Carving of Gujarat
• Lawns And Gardens
• Paryavaran Sanrakshan : Chunotiyan Aur Samadhan (hindi)
eBooks
• Lokmanya Bal Gangadhar Tilak
• The Gospel of Buddha
• Introduction To Indian Music
• Sardar Vallabhbhai Patel
• Sardar Vallabhbhai Patel (Adhunik Bharat Ke Nirmata Series)
• Lauh Purush Sardar Patel
• Aise They Bapu
• Mahatama Gandhi -A Pictorial Biography
• Gandhi In Champaran
• Mahatma Gandhi And One World
Printed Books available at flipkart.com
eBooks at kobo.com

आई-वडिलांनी अभ्यासलेले अन् मुलांच्या हाती सोपविलेले,
३० वर्षांचा इतिहास असलेले के'सागरीय संदर्भ..

ही सगळी तर के'सागरचीच पुस्तके आम्ही तर तीच अभ्यासतो! पण, आम्ही ती विद्यार्थ्यांना सुचवीत नाही, असे का ? का ?

स्पर्धा परीक्षा पुस्तकांसंदर्भात योग्य मार्गदर्शन
करू शकणारे सुविद्य अभ्यासू विक्रेते...
सर्व स्पर्धा परीक्षांची सर्व प्रकाशनांची
सर्व पुस्तके असणारी महाराष्ट्रातील दोन स्वतंत्र दालने-





**K'Sagar's हाऊस ऑफ बुक्स**
'दुर्गा चेंबर्स', ३९/१ बुधवार पेठ,
अप्पा बळवंत चौक,
जोगेश्वरी मंदिराशेजारी, पुणे-४११ ००२.
९९२३९०६५००/८०८७७२२२७७
(०२०) २४४८३१६६

आज अधिकारी असलेल्या प्रत्येकानं अभ्यासलंय के'सागर!

सूट २०% ते ५०%

**K'Sagar बुक सेंटर**
'नुतन क्लासिक', नारायण पेठ,
नू. म. वि. प्राथमिक शाळेसमोर,
अप्पा बळवंत चौक, पुणे-४११ ००२.
९८२३१२१३९५/९५४५५६७८६२/६३
(०२०) २४४५३०६५

के'सागरीय पुस्तके अभ्यासा म्हणजे
क्लासेसच्या टेस्ट सेरिजमधील
सर्व प्रश्नांची उत्तरे तर तुम्हाला देता येतीलच पण
आयोगाची प्रश्नपत्रिकाही तुम्ही सहज सोडवाल!




K'Sagar आयोगाच्या वाढत्या काठिण्यपातळीनुसार अन् प्रश्नांच्या नव्या धर्तीनुसार रचना केलेले संदर्भ

**RNI No. MAHMAR/2009/32156**
Reg No.G/NMD/137/2016-18

Published Date: 12th **June,** 2016
Date of Posting : 16th **June,** 2016



# Opinion of some Successful Students
# UPSC 2015-16



**Dr. Siddheshwar Bondar**
(Rank - 124)

"सर, माझ्या अभ्यासाची सुरुवात झाली तुमच्यापासून व शेवटही झाला तुम्ही घेतलेल्या mock interview ने. सर आज निर्विवादपणे सांगू इच्छितो की, तुम्ही आमच्या अभ्यासादरम्यान सदैव आमच्याबरोबर होता. तुम्हाला एवढ्या सगळ्या गोष्टी एकट्याने उत्साहाने करीत असतांना पाहून आमचाही उत्साह द्विगुणीत होत होताच, तुम्ही खरच या क्षेत्रातील One Man Army आहात. Thank You Sir !

आपल्या संस्थेतून भविष्यात असंख्य 'भगीरथ' निर्माण होवोत, ही सदिच्छा !"



**Omkareshwar Kanchangire**
(Rank - 820)

"रंजन सर म्हणजे प्रत्यक्ष ज्ञानमुर्ती, मार्गदर्शनाबरोबर जिद्द, चिकाटी...!

रंजन सरांनी घेतलेल्या mock interview मध्ये सरांकडुन मला फार मोलाचे मार्गदर्शन लाभले. सरांनी दिलेल्या tips आणि clues मुळे माझ्या interview च्या मार्कांमध्ये निर्णायक वाढ झाली. सरांच्या सर्व पुस्तकांमुळे अभ्यासाला योग्य दिशा मिळाली हे निश्चित.

Bhagirath IAS Academy हा UPSC ची तयारी करणाऱ्यांसाठी एक मैलाचा दगडच आहे असे मला वाटते. पुढच्या वाटचालीसाठी Bhagirath IAS Academy ला माझ्याकडून खूप खूप शुभेच्छा...!"



**Yogesh Patil** (Rank - 836)

"मुख्य परीक्षा पास झाल्यानंतर शेवटच्या आणि महत्वाच्या 'मुलाखती' च्या लढाईत पहिल्यांदा रंजन सरांना भेटून मुलाखतीची दिशा स्पष्ट करुन घेतली, आणि त्याच प्रमाणे मुलाखतीची तयारी केली.

माझा सर्वात पहिला mock interview सुध्दा सरांनीच घेतला. सरांनी विचारलेल्या प्रश्नापैकी बरेच प्रश्न मला **UPSC** च्या मुलाखतीत जसेच्या तसेच विचारण्यात आले उदा: goods and service tax, छंदाबद्दलचे प्रश्न इत्यादी. विशेष व्यावसायिक दृष्टीकोन न ठेवता तळमळीने, मनापासून विद्यार्थ्यांना यश मिळावे म्हणून रंजन कोळंबे सरांचे प्रयत्न खरच मनाला भावतात, मग तो विद्यार्थी Academy चा असो किंवा नसो.

UPSC चा मराठीतून अभ्यास करणारा प्रत्येक विद्यार्थी हा सरांची सर्व पुस्तके अभ्यासतोच. मी माझ्या UPSC च्या या प्रवासात तर रंजन सरांच्या अर्थशास्त्र, विज्ञान तंत्रज्ञान, भारताचा इतिहास, भारताची राज्यघटना आणि Environmental studies या सर्व पुस्तकांची अक्षरश: पारायणे केली आहेत. रंजन सरांच्या मार्गदर्शनामुळे असेच अनेक विद्यार्थी यशस्वी होवोत हीच इच्छा !!!"



**Sanghmitra Khobragade**
(Rank - 832)

"final list मध्ये माझे नाव असल्यामुळे मला अत्यानंद झाला. मला मिळालेल्या यशाचे संपूर्ण श्रेय माझ्या कुटूंबियांना आणि सरांनी केलेल्या मार्गदर्शनास जाते. कोळंबे सरांच्या सर्व पुस्तकांचा मला माझ्या अभ्यास प्रवासात खूप फायदा झाला. specially economics साठी MPSC च्या interview साठी केलेल्या मार्गदर्शनाचा मला UPSC साठी सुद्धा प्रचंड फायदा झाला.

त्याबद्दल मी Bhagirath IAS Academy चे मनापासून आभार मानते."

# UPSC Foundation Batch 2016-17

## Prelim + Mains + Interview

**Batch Starts 1 July 2016 | Batch Time 8:00 am to 10:00 am**

***By: Ranjan Kolambe & Bhagirath Team***

**Bhagirath IAS Academy**
UPSC • MPSC

मंत्री हाईटस्, २ रा मजला, शनिवार पेठ, पुणे -३०.
फोन नं. : **020-64013450 | 9970298197 | 7378406920**
***Web :*** www.bhagirathacademy.com
***E-mail :*** bhagirathacademypune@gmail.com
***Facebook :*** Bhagirath IAS Academy


Editor - **Umesh Ujgare**
Printed and Published by **Dr. (Ms) Sadhana Rout,** Additional Director General (I/C), on behalf of Publication Division and Printed at **Onlooker Press**, 16, Sassoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.
Posted at - Mumbai - Patrika Channel Sorting Office,GPO, Mumbai - 400 001.